**पाहिजेत**

संस्थेअंतर्गत असणाऱ्या शासकीय / अशासकीय अनुदानातून सुरू असलेल्या विविध प्रकल्पामधून अकाउंटंट असिस्टंट, प्रकल्प व्यवस्थापक, प्रकल्प असिस्टंट, कौन्सिलर, जनसंपर्क प्रमुख इत्यादी विविध पदाकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत. उमेदवार पदवीधर BSW, MSW, B.Com, MBA अहर्ता प्राप्त असावा. अनुभवींनी अपेक्षित मानधनासह ही जाहिरात प्रसिद्ध झाले पासून आठ दिवसात अर्ज करावेत. सदर पदे तालुकास्तरावर, जिल्हा स्तरावर व गाव पातळीवर असून ही पदे रायगड, ठाणे जिल्ह्यातून भरावयाचे आहेत. अर्ज खालील ई-मेलवर करावेत.msvtrecrutment.com, msvt.in

रायगड, रविवार, दि. २५ जानेवारी २०२६

# कृषीवल

किंमत ४ ₹

# हातपाटी व्यावसायिकांसह कामगारांची उपासमार

■ जिल्हा प्रशासनाचा दुर्लक्षित कारभार

■ शेकापचे नेते जयंत पाटील, ॲड. उमेश ठाकूर यांच्याकडून परवानासाठी मागणी

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील आणि काँग्रेसचे ॲड. उमेश ठाकूर यांनी रायगड जिल्हा प्रशासनाच्या दिरंगाईविरोधात आक्रमक भूमिका घेतली असून, हातपाटीरेतीव्यवसायासाठीशासकीय परवाने तातडीने मंजूर करण्याची ठाम मागणी केली आहे. शासनाचे स्पष्ट आदेश असतानाही प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही न झाल्याने हातपाटी व्यावसायिक व शेकडो कामगार उपासमारीच्या संकटात सापडले आहेत.



रायगड जिल्ह्यात हातपाटी पद्धतीने रेती व्यवसाय करणाऱ्या अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह या व्यवसायावर अवलंबून आहे. महसूल व वन विभागाचे वाळू-रेती निर्गती धोरण ८ एप्रिल २०२५ रोजी लागू झाले असून, या धोरणानुसार हातपाटी रेती व्यवसायास मान्यता देत तातडीने परवाने देण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत. मात्र, धोरण लागू होऊनही रायगड जिल्हा प्रशासनाने अद्याप परवाना प्रक्रिया सुरू न केल्याने संतप्त वातावरण निर्माण झाले आहे.

परवाना न मिळाल्याचा थेट फटका हातपाटी व्यावसायिक व कामगारांना बसत असून, अनेकांवर उपासमारीची वेळ आली आहे. प्रशासनाचा कारभार 'सरकारी काम सहा महिने थांब' या म्हणीप्रमाणे सुरू असल्याची टीका जयंत पाटील यांनी करत तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली आहे.

दरम्यान, ॲड. उमेश ठाकूर यांनी प्रशासनाला स्पष्ट शब्दांत इशारा दिला असून, तातडीने शासकीय परवाने मंजूर न झाल्यास २६ जानेवारीपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण तसेच तीव्र आंदोलन छेडले जाईल, असे त्यांनी जाहीर केले आहे.

## वेधक

### वरसे येथे घरफोडी

**चणेरा :** रोहा तालुक्यातील वरसे हद्दीतील काळभैरव रेसिडेन्सी येथील शिवाजी वसाहतीमध्ये चोरीची घटना घडली आहे. येथील पहिल्या मजल्यावरील रूम नं. १ मधील बंद फ्लॅटचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने लोखंडी कडी-कोयंडा तोडून कपाटातील सोन्याचे दागिने चोरून नेले. ही घटना गुरुवारी (दि. २२) पहाटे सुमारे पाच वाजण्याच्या सुमारास घडली. घरमालक बाहेरगावी गेल्यामुळे फ्लॅट बंद होता. याच संधीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने घराच्या दरवाजाची कडी तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर कपाटातील सोन्याचे दागिने चोरून नेण्यात आले. पान २ वर

### न्यायालयातच वकिलांची मारहाण

**मुंबई :** मुंबईतील अंधेरी सत्र न्यायालय परिसरात शनिवारी धक्कादायक प्रकार घडला. दोन वकिलांमध्ये कोर्टरूममध्येच हिंसक मारहाण झाल्याने खळबळ उडाली आहे. वकील वाहिद शेख यांनी सहकारी वकील अभिषेक त्रिपाठी यांना कोर्टरूममध्ये ओढत नेत लाथा-बुक्क्यांनी मारहाण केल्याचा प्रकार समोर आला असून, या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. प्रत्यक्षदर्शींनुसार, दोघांमध्ये किरकोळ वाद झाला होता, जो काही क्षणांतच हिंसक झाल्याचे सांगितले.

# शासनाकडून ठेकेदारांची थट्टा

**|| दोन वर्षांपासून १५ लाखांचे बिल थकीत || सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह**

। रायगड । प्रतिनिधी ।

**राष्ट्रीय सण मोठ्या थाटामाटात साजरे करण्याचा गाजावाजा केला जात असला, तरी त्या कार्यक्रमांसाठी आवश्यक असलेल्या व्यवस्था करणाऱ्या ठेकेदारांचे पैसे मात्र थकवले जात असल्याचा गंभीर प्रकार अलिबागमध्ये उघडकीस आला आहे. जिल्हाधिकारी कार्यालय व पोलीस मुख्यालय येथे ध्वजारोहण व ध्वजवंदनासाठी उभारण्यात येणाऱ्या मंडप, खुर्च्या व इतर सोयीसुविधांचे सुमारे १५ लाख रुपयांचे बिल सार्वजनिक बांधकाम विभागाकडून थकीत असल्याची माहिती समोर आली आहे.**



रायगड जिल्ह्यात प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्र दिन आणि स्वातंत्र्य दिन हे तीन राष्ट्रीय सण उत्साहात साजरे केले जातात. या दिवशी जिल्ह्यातील शासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालये तसेच पोलीस मुख्यालय येथे भव्य कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. अलिबाग येथील पोलीस मुख्यालयात जिल्हास्तरीय मुख्य ध्वजारोहणाचा कार्यक्रम होतो. या कार्यक्रमासाठी मान्यवर, अधिकारी, कर्मचारी व नागरिकांसाठी भव्य मंडप व आसन व्यवस्था करण्यात येते.

> जिल्हाधिकारी कार्यालय व पोलीस मुख्यालयातील ध्वजारोहण व ध्वजवंदनासाठी मंडप व आसन व्यवस्था करण्याचे काम आम्ही सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत केले आहे. मात्र, २०२४ पासून आजपर्यंत सुमारे १५ लाख रुपयांचे बील मिळालेले नाही.
> – ठेकेदार (नाव न सांगण्याच्या अटीवर)

ही संपूर्ण व्यवस्था सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येते. संबंधित कामे ठेकेदारांकडून करून घेण्यात येतात. मात्र, गेल्या दोन वर्षांपासून म्हणजे २०२४ पासून या कामांची बिले अदा करण्यात आलेली नाहीत. मंडप उभारणी, खुर्च्या, सजावट व इतर सुविधांचे काम वेळेत पूर्ण करूनही ठेकेदारांना पैसे पान २ वर

> प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर पोलीस मुख्यालयात कार्यक्रमाच्या तयारीसाठी विविध विभागांची बैठक घेण्यात आली आहे. यामध्ये मंडप व आसन व्यवस्था ही कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत केली जातात. यापूर्वी ठेकेदारांनी केलेल्या कामांची बिले थकीत असल्याची माहिती घेऊन त्याबाबत आवश्यक कार्यवाही केली जाईल.
> – रवींद्र शेळके, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन)


## महावितरणमध्ये हजारो पदे रिक्त

। मुंबई । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी (महावितरण) आशिया खंडातील अग्रगण्य वीज वितरण कंपनी म्हणून ओळखली जाते. मात्र, सध्या राज्यभरात २७ हजार ६७५ पदे रिक्त असल्याने कार्यरत कर्मचाऱ्यांवर प्रचंड कामाचा ताण येत असल्याचे चित्र आहे.

महावितरणमध्ये एकूण ८१ हजार ४६८ मंजूर पदांपैकी केवळ ५४ हजार ७५७ कर्मचारी सध्या कार्यरत आहेत. मोठ्या प्रमाणातील रिक्त पदांमुळे वीजपुरवठा, तक्रार निवारण, देखभाल-दुरुस्ती तसेच थकबाकी वसुलीच्याकामावरप्रतिकूलपरिणाम होत असल्याचा आरोप कर्मचारी संघटनांनी केला आहे. राज्यातील ३ कोटी १७ लाखांहून अधिक कृषी, औद्योगिक, वाणिज्यिक आणि घरगुती ग्राहकांना अखंड वीजपुरवठा करण्याची जबाबदारी महावितरण पार पाडत आहे. दरम्यान, सोलर कृषी पंप बसविण्याचा जागतिक विक्रम करणाऱ्या महावितरणची कामगिरी उल्लेखनीय असली पान २ वर

## एक्स्प्रेसवेवर वाहतुकीचा खोळंबा



। खोपोली । प्रतिनिधी ।

मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवर शनिवारी सकाळपासून वाहनांच्या वेगाला अक्षरशः ब्रेक लागला असून, प्रवाशांना प्रचंड वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. सलग सुट्ट्यांमुळे पुण्याकडे निघालेल्या वाहनांच्या लोंढ्याने खालापूर टोलनाक्यावर पुणे लेनमध्ये अनेक तास लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

कोंडी वाढताच अनेक वाहनचालकांनी एक्स्प्रेसवे सोडून जुना मुंबई-पुणे महामार्ग गाठला. मात्र, यामुळे पेण-खोपोली मार्गावरील साजगाव पान २ वर

### मुंबई-गोवा महामार्गावरही कोंडी

**महाड :** मुंबई-गोवा महामार्गावरील रखडलेली कामे आणि सलग सुट्ट्यांमुळे निर्माण झालेल्या भीषण वाहतूक कोंडीचा फटका थेट भाजपाचे आमदार प्रवीण दरेकर यांनाही बसला. रायगड जिल्ह्यातील इंदापूर परिसरात ते तब्बल अडीच तास वाहतूक कोंडीत अडकले. कोंडीचा अनुभव घेतल्यानंतर आमदार दरेकरांनी संतप्त प्रतिक्रिया देत म्हटलं, ''ज्याचं जळतं, त्यालाच कळतं. रोज या महामार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांचा त्रास आज मला प्रत्यक्ष जाणवला.'' पान २ वर






# ‘घे भरारी’चे खास प्रदर्शन सुरू

। पनवेल । प्रतिनिधी ।

‘घे भरारी’ फेसबुक ग्रुप तर्फे लग्नसराईसाठी खास साड्या, कॉर्पोरेट साड्या, दागिने, आणि देण्याघेण्यासाठी असंख्य भेटवस्तूंचे भव्य प्रदर्शन पनवेलमध्ये भरविण्यात आले आहे. हे प्रदर्शन खास नवव्यावसायिक आणि स्त्री उद्योजिकांच्या सहभागातून पनवेल येथील अटलांटिक बँकवेत येथे सुरू करण्यात आले असून शुक्रवारी (दि.२३) सुप्रसिद्ध अभिनेते अभिजित केळकर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.



घे भरारी हे प्रदर्शन दि.२३ ते २५ जानेवारीपर्यंत सकाळी ११ ते रात्री ९ या वेळात नागरिकांसाठी खुले असणार आहे. पनवेलमधील अटलांटिक हॉलच्या पहिल्या आणि दुसऱ्या मजल्यावर हे प्रदर्शन भरवले आहे. यामध्ये अद्वितीय अश्या सजावटीच्या वस्तू, अत्युत्तम दागिने, विविध प्रकारचे कपडे, उत्तम परफुम्स, कुर्ती, पर्सेस, हातमागाच्या वस्तू, कालाकुसरीच्या असंख्य वस्तू, हॅन्डमेड सोप्स, हस्तकलेच्या अनेक वस्तू, पिशव्या व खाद्यपदार्थ असे अनेक स्टॉल या प्रदर्शनात पहायला मिळत आहेत. घे भरारीमध्ये ऑनलाईन आणि ऑफलाईन असे काम चालते. नवीन व्यवसायात येणाऱ्या उद्योजकांसाठी घे भरारी हे हक्काचे व्यासपीठ झाले आहे. समाज माध्यमांच्या माध्यमातून मोठा ग्राहक वर्ग याला जोडला गेला आहे. यामध्ये ८० पेक्षा जास्त छोटे व्यावसायिक व महिलांनी भाग घेतला आहे. यामधील व्यावसायिक हे ठाणे, मुंबई, पुणे व इंदूर येथून आले आहेत. या सर्व छोट्या व्यावसायिकांना आणि अनेक महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी, त्यांचे मनोबल उंचावण्यासाठी, तसेच मराठी तरुणांमध्ये व्यवसायाची आवड निर्माण व्हावी यासाठी ग्राहकांनी जरूर भेट द्यावी, असे आवाहन घे भरारी समूहाचे संस्थापक राहुल कुलकर्णी आणि नीलम उमराणी एदलाबादकर यांनी केले आहे.

> **“बाहेर बाजारात बघायला न मिळणाऱ्या अनेक प्रकारच्या एक्सकलुसिव्ह साड्या आणि कपडे येथे बघायला मिळत आहेत. तसेच, भेट वस्तुंसाठी अनेक पर्याय येथे उपलब्ध आहेत. उत्कृष्ट दर्जा, वाजवी किंमत आणि उत्तम व्यावसायिक हे या प्रदर्शनाचे वैशिष्ठ्य आहे. तरी सर्व पनवेलकरांनी आवर्जून या प्रदर्शनास भेट द्यावी आणि आपल्या उत्सवाचा आनंद द्विगुणित करावा.**
> **– मृणाल देशपांडे, अभिनेत्री”**

## शीतल पाटील यांचे यश

। पाली/गोमाशी, प्रतिनिधी ।

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था गोंदियाच्या वतीने राज्यस्तरीय शिक्षक, कर्मचारी अधिकारी यांची डॉक्युमेंट्री स्पर्धा शुक्रवार, दि. २३ रोजी आयोजित करण्यात आली होती. ही राज्यस्तरीय डॉक्यूमेंट्री स्पर्धा राज्यातील दहा विभागातून घेण्यात आली. यामध्ये मुंबई विभागामध्ये रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद नवघर शाळेच्या शिक्षिका शीतल बळवंत पाटील यांनी मुंबई विभागात अव्वल कामगिरी केली. त्याबद्दल त्यांचे ग्रामस्थ मंडळ नवघर, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, गटविकास अधिकारी सुधागड, शिक्षण विभाग यांच्यावतीने कौतुक करत अभिनंदन करण्यात आले.



## सुधाकर घारे यांना जामीन?

। नेरळ । प्रतिनिधी ।

खोपोली येथील शिवसैनिकाच्या मृत्यूप्रकरणी खोपोली पोलीस ठाण्यातील गुन्ह्यात नाव असलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष सुधाकर घारे यांना मुंबई उच्च न्यायालयाने अटकपूर्व जामीन मिळविला आहे काय? अशी चर्चा सुरू झाली आहे. २३ जानेवारी रोजी सायंकाळी कर्जत परिवर्तन आघाडीच्या बैठकीला हजेरी लावल्यानंतर २४ जानेवारी रोजी घारे हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयात उपस्थित होते.

२६ डिसेंबर रोजी खोपोली येथील शिवसेना कार्यकर्त्यांचा खून झाला होता. त्यानंतर खोपोली पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या गुन्ह्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा अध्यक्ष सुधाकर घारे यांचे नाव घेण्यात आले होते. त्या दिवसापासून सुधाकर घारे हे नॉट रिचेबल आणि कुठेही दिसून येत नव्हते. शेवटी घारे यांनी आधी पनवेल जिल्हा सत्र न्यायालयात आणि नंतर मुंबई उच्च न्यायालयात अटकपूर्व जामीन मिळविण्यासाठी प्रयत्न केले. पनवेल येथील जिल्हा सत्र न्यायालयाने ती जामीन फेटाळला होता, मात्र २३ जानेवारी म्हणजे तब्बल महिन्याने सुधाकर घारे हे खुलेआम कर्जत तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत दिसून आले. मार्केवाडी येथील कडाव जिल्हा परिषद गटाच्या आढावा बैठकीत उपस्थित राहून कार्यकर्त्यांना मार्गदर्शनदेखील केले. त्यावेळी घारे हे आपल्या महागड्या गाडीमधून नाही तर लहानशा वॅगनार गाडीमधून आले होते. बैठक संपवून ते त्याच गाडीने पुढे निघून गेले होते. आज २४ जानेवारी रोजी सुधाकर घारे हे कर्जत येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यालयात उपस्थित होते. तेथे कर्जत परिवर्तन आघाडीच्या उमेदवार यांच्याशी चर्चा करीत होते. अगदी त्याचवेळी रायगड जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक आँचल दलाल यादेखील कर्जत शहरात उपस्थित होत्या. मात्र, त्यावेळीदेखील पोलिसांनी खोपोली गुन्ह्याप्रकरणी सुधाकर घारे यांना अटक केली नाही. याचा अर्थ, घारे यांना मुंबई उच्च न्यायालयाने जामीन दिला असावा, अशी चर्चा सुरू झाली आहे.

# मुरुड शहरातील शौचालयाची दुरवस्था

। कोर्लई । प्रतिनिधी ।

‘स्वच्छ मुरुड सुंदर मुरुड’ संकल्पना असलेल्या मुरुड शहरातील कल्याणी हॉस्पिटल रिक्षा स्टँड नजीक असलेल्या शौचालयाची पार दुरवस्था झाली आहे. त्यामुळे आरोग्याचा प्रश्न लक्षात घेऊन ते तात्काळ बंद करण्यात यावे. अन्यथा याविरोधात नाईलाजास्तव जन आंदोलन छेडू, असा इशारा सामाजिक कार्यकर्ते अरविंद गायकर यांनी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांना निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.




मुरूड शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या कल्याणी हॉस्पिटल शेजारील रिक्षा स्टॅन्ड नजीक शौचालय व प्रसाधनगृहाची भयानक अवस्था झाली आहे. या ठिकाणी सातत्याने मोठ्या प्रमाणावर वर्दळ सुरू असून आजुबाजूच्या परिसरातील नागरिक बाजारहाट व विविध प्रकारच्या कामांसाठी ये-जा करीत असतात. मात्र, त्यांना शौचालयाच्या दुरवस्थेमुळे मोठी गैरसोय होत आहे. तसेच, येथील दुर्गंधीमुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. याबाबत सामाजिक कार्यकर्ते अरविंद गायकर यांनी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांना निवेदन दिले आहे. त्यात, आरोग्याचा प्रश्न लक्षात घेऊन येथील शौचालय व प्रसाधनगृहाची प्रत्यक्ष पाहणी करून येत्या आठ दिवसांत आपणाकडून योग्य तो निर्णय घेण्यात यावा. अन्यथा जन आंदोलनाच्या माध्यमातून शौचालय प्रसाधनगृह बंद करावे लागेल, असा इशारा देखील त्यांनी दिला आहे. या निवेदनाच्या प्रती नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष यांनादेखील देण्यात आल्या आहेत.

# कोटेश्वरी प्रतिष्ठानच्या ‘विघ्नहर्ता’चे थाटामाटात विसर्जन

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

चौदा विद्या व चौसष्ठ कलांचा अधिपती असलेल्या श्रीगणेशाच्या माघ गणेश जयंती उत्सवानिमित्त मुरूड शहरात कोटेश्वरी प्रतिष्ठानच्या वतीने प्रथमच श्रीगणेश मूर्तीची स्थापना करण्यात आली. दि. २२ जानेवारी रोजी सकाळी सिद्धेश मिसाळ यांच्या कारखान्यातून वाजत-गाजत मिरवणूक काढत मुरूड शहरातील गाव भैरव मंदिराच्या प्रांगणात ‘कोटेश्वरी प्रतिष्ठान विघ्नहर्ता’ची विधीवत स्थापना करण्यात आली.



यावेळी मुख्य पूजेचा मान ओम भगत यांना, तर उत्तर पूजेचा मान अर्थव सुभेदार यांना मिळाला. ही पूजा पुरोहित आशिष जोशी यांनी विधीपूर्वक सांगितली. मुरूड शहरात प्रथमच माघ गणेश जयंतीनिमित्त श्रीगणेश मूर्तीची स्थापना झाल्याने दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. उत्सव काळात कीर्तन-भजनाचे आयोजन करण्यात आले होते. भाविकांसाठी प्रसाद व महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले होते. यावेळी कोटेश्वरी प्रतिष्ठानचे अध्यक्ष अर्थव सुभेदार, उपाध्यक्ष ओम भगत, सचिव ओजस गुरव, तसेच प्रज्वल गुरव, अजिंक्य गुरव, पंकज गुरव, सर्वेश भगत, अनिकेत गुरव, धिरज भगत, अतिष भगत, प्रतीक गुरव, मिताली गुरव, श्रुती गुरव, अंकिता गुरव, अनुजा गुरव, अर्तिका गुरव यांच्यासह असंख्य श्रीगणेश भक्त उपस्थित होते.

दुसऱ्या दिवशी सायंकाळी कोटेश्वरी प्रतिष्ठानच्या ‘विघ्नहर्ता’ची विसर्जन मिरवणूक काढण्यात आली. ही मिरवणूक शहरातील भोगेश्वर नाका बाजारपेठ समुद्रकिनारा या मार्गावरून बेंजोच्या तालावर, गुलाल उधळत व फटाक्यांच्या आतषबाजीसह उत्साहात पार पडली. मिरवणुकीदरम्यान येणाऱ्या-जाणाऱ्या भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. या मिरवणुकीत महिला, युवक व युवतींचा मोठा सहभाग दिसून आला.

यावेळी मुरूड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# श्रीवर्धन न.प. विषय समित्यांची बिनविरोध निवड

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

श्रीवर्धन नगरपरिषदेच्या विविध विषय समित्यांची निवड शुक्रवार, दि. २३ जानेवारी रोजी पीठासीन अधिकारी तथा मुख्याधिकारी राठोड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. ही निवड अविरोध करण्यात आली.

श्रीवर्धन नगरपरिषदेत सध्या नगराध्यक्षपद शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) यांच्याकडे असून, पक्षीय बलाबलानुसार राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे १५, भाजपचे २ तर शिवसेना (शिंदे गट) चे ३ नगरसेवक आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (अ.प. गट) व भाजप यांची युती असून, राष्ट्रवादी काँग्रेसचे (अ.प. गट) २ स्वीकृत नगरसेवक आहेत.

दि. २३ रोजी निवड झालेल्या विविध विषय समित्या पुढीलप्रमाणे आहेत. १) सार्वजनिक बांधकाम, नियोजन व पर्यटन विकास समिती : सभापती : समीर साठविलकर, सदस्य : प्रसाद विचारे, भावेश मांजरेकर, प्रणिल बोरकर, देवेंद्र भुसाणे. २) शिक्षण, क्रीडा व युवा कल्याण सांस्कृतिक कार्य समिती : सभापती : बाळकृष्ण गोरनाक, सदस्य : शमा वैद्य, प्रविता माने, शबिस्ता सरखोत, संतोष वेश्वीकर. ३) पाणीपुरवठा व जलनिस्सारण समिती : सभापती : हरिदास वाघे, सदस्य : प्रसाद विचारे, शिवानी चौले, रुची बोरकर, देवेंद्र भुसाणे. ४) स्वच्छता, वैद्यकीय, दिवाबत्ती व सार्वजनिक आरोग्य समिती : सभापती : अनंत गुरव, सदस्य : राजपूरकर इफ्तीखार शेख, साक्षी पाब्रेकर, आराई रहमत, संतोष वेश्वीकर. ५) महिला व बालकल्याण समिती : सभापती : मुरकर राजसी रि., उपसभापती : सुप्रिया चोगले, सदस्य : गुलाब मांडवकर, प्रगती वाघे, सलोनी मोहित. श्रीवर्धन नगर परिषदेचे नगराध्यक्ष ॲड. अतुल अ. चौगुले असून, ते शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) चे आहेत.

# तळा हायस्कूलमध्ये मार्गदर्शन शिबीर

। तळा । प्रतिनिधी ।

इंटरनॅशनल इनरव्हील क्लब ऑफ बॉम्बे फिल्म सिटीच्या वतीने तळा येथील बालविकास व प्राथमिक विद्यामंदिर, गो.म. वेदक विद्यामंदिर ज्युनियर व सिनियर कॉलेजमधील विद्यार्थ्यांसाठी एक उपयुक्त व मार्गदर्शक शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचा उद्देश विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे हा होता. या कार्यक्रमात ८१ वर्षांच्या क्लबच्या उपाध्यक्षा कला कर्णिक यांनी स्पर्श कसा ओळखावा? तर कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सॉफ्ट स्किल्स अँड टाईम मॅनेजमेंट या विषयावर मार्गदर्शन केले.



डॉ. स्वाती देसाई यांनी गो. म. वेदक विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना भविष्यातील करिअरच्या विविध संधी याविषयी सविस्तर माहिती दिली. डॉ. एकता चौधरी यांनी इयत्ता ८ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांनी भावनांवर नियंत्रण कसे मिळवावे? आणि महाविद्यालयातील विद्यार्थिनींना कॅन्सर सर्वायव्हल जनजागृती आणि राजस व तामस अशी अन्नपदार्थाची ओळख करून दिली. यावेळी डॉ. ज्योती खंबाटा यांनी सैनिक होण्यासाठी आवश्यक पात्रता व तयारी याविषयी माहिती देत विविध मनोरंजनात्मक खेळांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवला. दरम्यान, आयोजित निबंध स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

यात परमेश्वरी वेदक प्रथम, जान्हवी साळवे द्वितीय, तर वफा हजवाने हिने तृतीय क्रमांक पटकावला. तसेच अलफिया खाचे, कुलसुम खाचे व श्रावणी भोसले यांनी उत्तेजनार्थ पारितोषिके मिळवली.

या कार्यक्रमाला तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मंगेश देशमुख, सचिव महेंद्र कजबजे, खजिनदार चंद्रकांत रोडे, इंटरनॅशनल इनरव्हील क्लब ऑफ बॉम्बे फिल्म सिटीच्या अध्यक्षा मधुरता देशमुख, सचिव डॉ. एकता चौधरी, खजिनदार अनिता गोएल, उपाध्यक्षा कला कर्णिक, क्लब करस्पॉंडंट डॉ. ज्योती खंबाटा सदस्या राजलक्ष्मी एन. व्ही., पद्मा गोपालकृष्णन, डॉ. स्वाती देसाई, वीणा खट्टर, प्राचार्य डॉ. नानासाहेब यादव, मुख्याध्यापक दिलीप ढाकणे, सचिन भाटे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## पान १ वरून

### ठेकेदारांची थट्टा

मिळालेले नाहीत. त्यामुळे ‘गरज सरो आणि वैद्य मरो’ असा कारभार सुरू असल्याची तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

या कामांचे नियोजन अलिबाग येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता राजू डोंगरे यांच्या देखरेखीखाली करण्यात येते. मात्र, याबाबत त्यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता तो होऊ शकला नाही.

### एक्स्प्रेसवेवर वाहतुकीचा खोळंबा

फाटा, शिळफाटा परिसरातही भीषण वाहतूक कोंडी झाली. परिस्थिती इतकी गंभीर झाली की बोरघाटात वाहनांच्या रांगा लागून अनेक वाहने बंद पडली आणि अखबा घाटच जाम झाला.

२६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त शनिवार, रविवार आणि सोमवार अशा सलग तीन दिवसांच्या सुट्ट्यांमुळे मुंबई महानगर व उपनगरातील नागरिक मोठ्या प्रमाणावर पुणे आणि लोणावळ्याकडे रवाना झाले आहेत. याचा थेट परिणाम मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवर दिसून येत आहे.

खंडाळा घाट परिसरात वाहतूक अत्यंत संथ गतीने सुरू असून, अनेक ठिकाणी चार ते पाच किलोमीटरपर्यंत वाहने अडकून पडली आहेत. नेहमी दोन ते अडीच तासांत पूर्ण होणारा प्रवास अनेक प्रवाशांना चार ते पाच तासांहून अधिक वेळ घेत आहे. वाहनांत अडकलेल्या प्रवाशांना तीव्र उष्णता, तहान आणि प्रचंड थकव्याचा सामना करावा लागत असून, अनेकांचा संयम सुटताना दिसत आहे.

महामार्ग पोलीस वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करत असले तरी वाहनांची संख्या प्रचंड असल्याने परिस्थिती नियंत्रणात आणणे अवघड झाले आहे. प्रवाशांनी अनावश्यक प्रवास टाळावा आणि पर्यायी मार्गांचा विचार करावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

**मुंबई-गोवा महामार्गावरही कोंडी**

याप्रकरणी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना तात्काळ एसएमएस करून परिस्थितीची माहिती दिली असून, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याशीही चर्चा करणार असल्याचं सांगितलं. महामार्गाचं काम लवकर पूर्ण करून नागरिकांना दिलासा देण्यासाठी ठोस उपाययोजना केल्या जातील, असं आश्वासन त्यांनी दिलं आहे. दरम्यान, सततच्या वाहतूक कोंडीमुळे चाकरमानी, पर्यटक आणि स्थानिक नागरिक प्रचंड त्रस्त असून, प्रशासनावर तातडीच्या निर्णयांचा दबाव वाढत आहे.

### महावितरणमध्ये हजारो पदे रिक्त

तरी, मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे ही यंत्रणा ताणाखाली काम करत असल्याचे स्पष्ट होत आहे. रिक्त पदे तातडीने भरण्याची मागणी कर्मचारी संघटनांकडून करण्यात येत आहे. तसेच अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कार कंपनीच्या नावावर असले तरी, प्रत्यक्ष क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी पडत आहे. तांत्रिक संवर्गात मंजूर ४५ हजार ८०३ पदांपैकी १८ हजार ५०६ पदे रिक्त आहेत. यामध्ये मुख्य तंत्रज्ञ १९९, प्रधान तंत्रज्ञ ९१२, वरिष्ठ तंत्रज्ञ सहा हजार ६०१ आणि तंत्रज्ञ १२,३१३ पदांचा समावेश आहे.

### वरसे येथे घरफोडी

चोरीस गेलेल्या दागिन्यांमध्ये गळ्यातील सोन्याचे छोटे मंगळसूत्र (अंदाजे रु. १९,८००), दोन ग्रॅम वजनाची छोटी अंगठी (रु. ६,६००), सोन्याचे दोन छोटे नट (रु. १,६५०), दोन ग्रॅम वजनाची कानातील सोन्याची कर्णकुले (रु. १५,४००) तसेच तीन ग्रॅम वजनाची कानातील सोन्याच्या साखळीचा एक जोड (रु. १५,६००) असा एकूण सोन्याच्या दागिन्यांचा समावेश आहे.

याप्रकरणी रोहा पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी प्रसाद गोकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांच्या सूचनेनुसार सुरू आहे. दरम्यान, परिसरात सलग चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## किराणा दुकान फोडणारा चोरटा अटकेत

**रसायनी :** पाताळगंगा अतिरिक्त एमआयडीसी परिसरातील चावंढोली गावात अज्ञात चोरट्यांनी रात्रीच्या वेळेस किराणा दुकान फोडल्याची घटना घडली. चांवढोळी येथील श्रीराम किराणा सुपर मार्केटच्या छतावरील सिमेंटचा पत्रा तोडून अज्ञात चोरट्यांनी आत प्रवेश केला. दुकानातील रोख रक्कम व इतर मुद्देमाल असा एकूण ३१ हजार ७०० रुपयांचा माल चोरून नेण्यात आला.

सकाळी दुकान उघडण्यास आल्यावर दुकान मालक रमेशकुमार सिर्वही याने रसायनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. यावेळी रसायनी पोलिसांनी तात्काळ तपास चक्र फिरवत सीसीटीव्हीच्या माध्यमातून अखिलेशकुमार परदेशी राम (वय २४) व त्याचा साथीदार यांना ताब्यात घेतले व अटक केली आहे. त्यांच्याकडून दुकानात असणारा ३१ हजार ७०० रूपयाचा माल ताब्यात घेतला आहे. रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली पोहवा शशांक पिंगळे अधिक तपास करीत आहेत.



## वीर वाजेकर महाविद्यालयात मतदार जनजागृती रॅली

। चिरनेर । प्रतिनिधी ।

वीर वाजेकर महाविद्यालयात मतदार जागृती २५ जानेवारीच्या राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्ताने रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कॉलेज, फुंडे येथे मतदार जागृती भित्तीपत्रकाचे उद्घाटन उपजिल्हाधिकारी तथा मतदान अधिकारी आवीष कुमार सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आले. ही भित्तिपत्रके इलेक्ट्रोल लिटरसी क्लब व राज्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी तयार केली आहेत.

याप्रसंगी तहसीलदार कदम यांनी मतदानाची शपथ वाचून नव मतदार विद्यार्थ्यांनाही शपथ घ्यायला लावली. तसेच उपजिल्हाधिकारी सोनवणे यांनी उपस्थित नवमतदार विद्यार्थी यांना मतदानाचा हक्क सर्वांनी बजावला पाहिजे, असे आवाहन केले. या अनुषंगाने महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. २५ जानेवारी रोजी साजरा होणाऱ्या १६ व्या राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त ही रॅली आयोजित करण्यात आली होती.

या रॅलीत उपजिल्हाधिकारी तथा मतदान अधिकारी सोनवणे, तहसीलदार तथा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी डॉ. उद्धव कदम, नायब तहसीलदार प्रभाकर नवाळे यांच्यासह कॉलेजचे प्रभारी प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर, प्रा. राम गोसावी, डॉ. राजकुमार कांबळे, डॉ संदीप घोडके, उपप्राचार्य गजानन चव्हाण, डॉ. चिंतामण दिंधळे, प्रा. श्रीकांत गोतपागर, डॉ. सुजाता पाटील प्रा. भूषण ठाकूर प्रा प्रांजल भोईर या सर्वांनी सहभाग घेतला. रॅलीत २१० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

## भिवंडीतील विद्यार्थ्यांचा प्रेरणादायी आदर्श

। ठाणे । प्रतिनिधी ।

ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यातील केंद्र राहनाळ अंतर्गत जिल्हा परिषद शाळा कालवार येथील इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या खाऊचे पैसे जमा करून सैनिकांच्या कुटुंबासाठी मदत केली आहे. विद्यार्थ्यांनी साठवलेली ११,१७० रुपयांची रक्कम ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत सैनिक कल्याण निधीत जमा करण्यात आली.

शिक्षक प्रशांत भोसले यांच्या संकल्पनेतून आणि मुख्याध्यापिका अनिला काबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. सैनिकांचे त्यागमय जीवन समजून घेतल्यानंतर विद्यार्थ्यांनी स्वयंस्फूर्तीने या उपक्रमात सहभाग घेतला. पालक, शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांनीही उपक्रमाला भरभरून पाठिंबा दिला.

या राष्ट्रप्रेमपूर्ण उपक्रमाचे ठाणे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी विशेष कौतुक केले असून, बालवयातच देशभक्ती आणि सामाजिक जबाबदारीची भावना रुजविणारा हा उपक्रम ठरत आहे.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे खाड्याचापाडा, ता. कर्जत, जि. रायगड येथील सर्व्हे नं १०/१३, क्षेत्रफळ ०-४०-००, आकारणी ०.१७ रू.पै. ही जमिन मिळकत श्री.चंद्रशेखर रामचंद्र राणे, राहणार- बी/१०१, योगमुद्रा, न्यू लिंक रोड, सेंट मेरी स्कुलजवळ, परागनगर, दहिसर पूर्व, मुंबई, ४०००६८ यांचे मालकीची व प्रत्यक्ष कब्जेवहिवाटीची असुन सदर जमिन मिळकत जमिन मालक यांनी मंगल राजेंद्र भडांगे, राहणार - कालिकामाता अपार्टमेंट, १ ला मजला, महादेव कर्पे मार्ग, लोकग्राम, न्यु जिम्मी बाग, कल्याण पूर्व, काटेमानिवली, ता. कल्याण, जि. ठाणे, ४२१३०६ याना कायमस्वरूपी खरेदीखताने देण्याचे ठरले असुन सदर मिळकती संदर्भात कोणाही व्यक्ती, संस्था, कंपनी यांचे हक्क, अधिकार, गहाण, दान, बोजा अधिकार, तारण, बक्षीस, साठेकरार, खरेदीखत, कुलमुखत्यारपत्र या अगर इतर स्वरूपात हक्क व अधिकार असतील तर त्या व्यक्ती संस्था, कंपनी यांनी लेखी हरकती खालील नमुद पत्त्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ दिवसांच्या आत नमुद पत्त्यावर/भ्रमणध्वनी वर संपर्क साधुन नोंदवाव्यात.

मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास जमिन मालक आमचे अशील व्यवहार पूर्ण करतील, मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

**- मिळकतीचे परिशिष्ट -**

| गावाचे नाव | सर्व्हे नं | क्षेत्रफळ | पो. ख. | आकारणी |
| --- | --- | --- | --- | --- |
| मौजे-खाड्याचापाडा ता.कर्जत जि.रायगड | १०/१३ | ०-२६-०० | ०-१४-०० | ०.१७ रू. पै. |

**ॲड. गणेश बंधु विशे**
(कार्यालयीन पत्ता-शॉप नं ०५, नानी अप्पा मार्केट, विराट ग्रीनवूड जवळ, कराव पाषाणे रोड,मु.पो.पाषाणे, कर्जत, रायगड, ४१०१०१)
मो. नं ८८०६६११५६७

राजकीय फेरफटका

# ॲड. पूजा भगत जनतेतून आलेलं नेतृत्व




आंबेपूरची भूमी संघर्षाची भूमी आहे. ही तीच भूमी आहे जिथे स्व. नारायण नागू पाटील यांनी शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी कर्मयज्ञ उभा केला. अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची ताकद जनतेला दिली. त्या संघर्षशील विचारांच्या परंपरेतूनच शेतकरी कामगार पक्षाचा लाल बावटा उभा आहे. आज तोच लाल बावटा खांद्यावर अभिमानाने पेलण्याचे काम ॲड. पूजा भगत करत आहेत. त्यांचा लढा व्यक्तीविरोधात नाही, तर विचारांसाठी आहे. सत्तेसाठी नाही, तर समाजासाठी आहे. संपत्ती मोजक्यांच्या हातात साठू नये, तर ती जनतेच्या हातात यावी हा त्यांचा ठाम विचार आहे. आज ॲड. पूजा भगत हे नाव आंबेपूर गटात आशेचे आणि परिवर्तनाचे प्रतीक बनत आहे. जनतेसोबत चालणारे, विचारांशी निष्ठावान आणि संघर्षाची परंपरा जपणारे हे नेतृत्व या निवडणुकीत केवळ मतांचा नव्हे, तर विचारांचा कौल मागत आहे.

आंबेपूर गटातून जिल्हा परिषद निवडणुकीच्या मैदानात उतरलेल्या ॲड. पूजा भगत या केवळ उमेदवार नाहीत तर जनतेतून घडलेले आणि जनतेसाठी उभे राहिलेले नेतृत्व आहेत. सुशिक्षित, जागरूक आणि समाजाच्या प्रश्नांशी थेट जोडलेली ही उमेदवार राजकारणाकडे सत्तेच्या माध्यमातून नव्हे तर सेवेच्या दृष्टीने पाहत असल्याची सर्वत्र चर्चा आहे. शेकापच्या पूजा भगत स्कुटीवरून येतात. थेट घराघरात जातात. हातात हात घालून संवाद साधतात. कारण त्यांना जनतेत आणि स्वतःत कुठलीही दरी नको आहे. जनतेला त्या आपल्यातीलच एक वाटल्या पाहिजेत हीच त्यांची भूमिका आहे.

जनता फक्त मतदानासाठी उपयोगाची नसते. जनता सक्षम झाली पाहिजे. जनता समृद्ध झाली पाहिजे. त्यासाठी रोजगार मिळाला पाहिजे. विकास फक्त रस्ते आणि इमारतीपुरता मर्यादित न राहता तो माणसाच्या आयुष्याशी जोडलेला असला पाहिजे. विकासासोबत शाश्वत समृद्धी मिळाली पाहिजे. हीच पूजा भगतच्या विचारांची दिशा आहे. सुशिक्षित नेतृत्व समाजाला योग्य दिशा देऊ शकतं याचा विश्वास त्या निर्माण करत आहेत. विचारांशी निष्ठा ठेवून जनतेसोबत चालणारी ही वाट आंबेपूर गटाला नवी दिशा देणारी ठरेल अशी भावना जनतेतून व्यक्त होत आहे.

निवडणूक आली की राजकारणात अचानक गाड्यांचा ताफा वाढतो, घोषणा मोठ्या होतात आणि नेते जनतेपासून अधिकच दूर जातात. सत्ता मिळवणे हेच अंतिम ध्येय असल्यासारखे चित्र उभे राहते. अशा काळात आंबेपूर गटातून जिल्हा परिषद निवडणुकीच्या मैदानात उतरलेल्या ॲड. पूजा भगत मात्र या सत्ताकेंद्रित राजकारणाला थेट छेद देताना दिसत आहेत.

### शेती, पाणी आणि न्यायाचा लढा

आंबेपूर गटातील ग्रामीण वास्तव ॲड. पूजा भगत यांना जवळून माहित आहे. शेतीमालाला योग्य दर न मिळणे, पाण्याची टंचाई, रस्त्यांची दुर्दशा, आरोग्य व शिक्षण सुविधांचा प्रश्न केवळ कागदावर मांडून संपत नाहीत, तर त्यासाठी सातत्याने पाठपुरावा करावा लागतो, याची त्यांना जाणीव आहे. शेतकरी कामगार पक्षाच्या परंपरेप्रमाणे शेती, जमीन आणि पाणी हे प्रश्न केंद्रस्थानी ठेवूनच त्यांची भूमिका राहिली आहे. विकासाच्या नावाखाली शेतकऱ्यांचे नुकसान होता कामा नये, तर शेतकरी हा विकासाच्या केंद्रस्थानी असला पाहिजे, ही त्यांची ठाम भूमिका आहे. ग्रामीण भागातील मूलभूत सुविधा सक्षम झाल्याशिवाय खरा विकास शक्य नाही, असा ॲड. पूजा भगत यांचा स्पष्ट आग्रह आहे. ग्रामीण प्रश्नांची जाण, महिलांच्या सशक्तीकरणाची स्पष्ट भूमिका आणि युवकांना संधी देणारी विकासदृष्टीया तिन्हींचा संगम म्हणजे ॲड. पूजा भगत यांचे नेतृत्व. म्हणूनच ही निवडणूक केवळ सत्तेची नाही, तर समाजाच्या भविष्यासाठी योग्य दिशा निवडण्याची ठरणार आहे.

### युवकांना रोजगार हवा

ॲड. पूजा भगत यांच्या मते विकास असा हवा की, युवकांना आपल्या गावातच रोजगार मिळावा. कौशल्य प्रशिक्षण, स्थानिक उद्योग, शेतीपूरक व्यवसाय आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून युवकांना संधी उपलब्ध करून देणे महत्वाचे आहे. युवकांच्या हाताला काम मिळाले, तर गाव टिकते, समाज टिकतो आणि भविष्य सुरक्षित होते. युवक केवळ मतदार नसून परिवर्तनाची शक्ती आहेत, हा त्यांचा ठाम विश्वास आहे.

### सशक्तीकरण कागदावर नव्हे, प्रत्यक्षात

महिला सशक्तीकरणाच्या घोषणा अनेकदा फक्त भाषणांपुरत्याच मर्यादित राहतात. मात्र ॲड. पूजा भगत या स्वतः एक सुशिक्षित महिला नेतृत्व असल्याने महिलांच्या प्रश्नांकडे केवळ सहानुभूतीने नव्हे, तर ठामपणे पाहतात. महिलांना रोजगार, स्वयंरोजगाराच्या संधी, सुरक्षितता, आरोग्य सुविधा आणि निर्णयप्रक्रियेत सहभाग मिळाला पाहिजे, यावर त्यांचा भर आहे. बचतगट, स्थानिक उद्योग, प्रशिक्षण आणि कायदेशीर जागरूकता या माध्यमातून महिलांना स्वावलंबी करण्याचा त्यांचा दृष्टिकोन आहे. महिला सशक्त झाली, तर कुटुंब सशक्त होते आणि कुटुंब सशक्त झाले, तर समाज बदलतो हा त्यांचा ठाम विश्वास आहे.







# रामराजमध्ये शेकापच्या प्रचाराचा धमाका

## ।। मोहन धुमाळ, अंजली पाटील यांचा प्रचार जल्लोषात ।। महिलांसह असंख्य कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

। रायगड। जिल्हा प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील कावीर जिल्हा परिषद मतदार संघातील उमेदवार मोहन धुमाळ आणि रामराज पंचायत समिती मतदार संघातील उमेदवार अंजली पाटील यांच्या प्रचाराचा शुभारंभ शनिवारी (दि.२४) रामराज येथे झाला. श्री हनुमानाचे दर्शन घेऊन नारळ वाढवून प्रचाराला सुरुवात करण्यात आली. यावेळी रामराजमध्ये शेकापच्या प्रचाराचा धमाका दिसून आला. शेकापच्या उमेदवारांना महिलांसह असंख्य कार्यकर्त्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. मोहन धुमाळ आणि अंजली पाटील यांचे मतदारांकडून देखील जल्लोषात स्वागत करण्यात आले.

यावेळी शेकाप तालुका पुरोगामी युवक अध्यक्ष विक्रांत वार्डे, नवशाद मुजावर, अशोक खोत, अलिबाग पंचायत समितीच्या माजी सभापती प्रिया वेटकोळी, मधुकर ढेबे, संजय पाटील, माजी सरपंच सुरेखा झावरे, देवयानी पाटील, महेश झावरे, जयवंत तांबडकर, सुडकोलीच्या माजी सरपंच प्रिती तांबडकर, सुधीर पाटील, हरिश्चंद्र भोनकर, बाळू पाटील, यशवंत भगत, रामचंद्र गुंड, अनिता पाटील, नंदकुमार गावडे, मनिषा धुमाळ आदी पदाधिकारी, कार्यकर्ते व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.







कावीर जिल्हा परिषद मतदार संघामध्ये सहाणपासून कावीर, बामणगांव, खानाव, बेलोशी, चिंचोटी, रामराज, बोरघर, सुडकोली इत्यादी ग्रामपंचायतीमधील अनेक गावांचा समावेश आहे. या मतदार संघात २९ हजारहून अधिक मतदार आहेत. जिल्हा परिषदेच्या निवडणूकीचे मतदान ५ फेब्रुवारीला पार पडणार आहे. त्या पार्श्वभूमीवर शेकाप व महाविकास आघाडीचे उमेदवार मोहन धुमाळ कावीर जिल्हा परिषद मतदार संघातून उभे राहिले आहेत. तसेच, रामराज पंचायत समिती मतदार संघातून अंजली पाटील आणि कावीर पंचायत समिती मतदारसंघातून अनिल पाटील निवडणूकीच्या रिंगणात उतरले आहेत. शेकाप व महाविकास आघाडीच्यावतीने प्रचाराला सुरुवात झाली. कावीर जिल्हा परिषदेचे शेकाप, महाविकास आघाडीचे उमेदवार मोहन धुमाळ व रामराज पंचायत समितीच्या उमेदवार अंजली पाटील यांच्या प्रचाराचा शुभारंभ शनिवारी (दि.२४) सकाळी मोठ्या जल्लोषात झाला. यावेळी हातात लाल बावटा घेऊन महिला व अन्य कार्यकर्ते प्रचार रॅलीत सहभागी झाले होते. सर्वप्रथम रामराजमधील हनुमान मंदिरात जाऊन दर्शन घेण्यात आले. त्यानंतर प्रचाराला सुरुवात करण्यात आली.

यावेळी रामराज बाजारपेठांसह गावांतील घरोघरी जाऊन मतदान करण्याची भावनिक साद देण्यात आली. मोहन धुमाळ व अंजली पाटील यांच्या प्रचारार्थ शेकडो कार्यकर्ते रस्त्यावर उतरले होते. स्वंयस्फुर्तीने कार्यकर्ते प्रचारात सामील झाले होते. मोहन धुमाळ यांचे गावात आगमन होताच, अनेकांकडून औक्षण करण्यात आले. एक वेगळा उत्साह या निमित्ताने पहावयास मिळाला. यादरम्यान, शेतकरी कामगार पक्षाचा विजय असो, अशा घोषणा देत असताना मोहन धुमाळ तसेच अंजली पाटील यांना निवडून देण्याचे आवाहनही करण्यात आले.

# चौलमध्ये शेकापची ताकद एकवटली

## महाविकास आघाडीच्या विजयासाठी निष्ठावंतांनी रणशिंग फुंकले

। चौल । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील चौल येथे शेतकरी कामगार पक्षाच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांची महत्त्वपूर्ण बैठक बुधवारी (दि.२१) चौलभोवाळे येथील अमित फुंडे यांच्या निवासस्थानी पार पडली. या बैठकीस चौल मतदारसंघातील शेकापचे निष्ठावान कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीत शेकापचे ज्येष्ठ नेते सुरेश खोत यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी व्यासपीठावर ज्येष्ठ कार्यकर्ते शरद फुंडे, चौलचे माजी उपसरपंच काशिनाथ घरत, शेकाप जिल्हा चिटणीस मंडळाचे सदस्य शरद वरसोलकर, रेवदंडा शहर चिटणीस निलेश खोत तसेच चौल पंचायत समिती गणाच्या आघाडीच्या उमेदवार अनया अमित फुंडे उपस्थित होत्या. बैठकी दरम्यान मार्गदर्शन करताना सुरेश खोत यांनी, शेतकरी कामगार पक्षाची विचारधारा, ध्येय आणि धोरणे स्पष्ट केली. चौल जिल्हा परिषद मतदारसंघात शेकाप महाविकास आघाडीचा घटक पक्ष म्हणून निवडणूक लढवत असून, आघाडीच्या तिन्ही उमेदवारांना भरघोस मताधिक्य मिळवून देण्यासाठी कार्यकर्त्यांनी एकजुटीने कामाला लागावे, असे आवाहन त्यांनी केले. तसेच, एक-एक मत महत्त्वाचे असून, मतदारांच्या घरोघरी पोहोचून मतदानासाठी आवाहन करण्याचेही त्यांनी सांगितले.



यावेळी रेवदंडा शहर चिटणीस निलेश खोत यांनीही आपले विचार मांडले. शेतकरी कामगार पक्ष हा स्व. ना.ना. पाटील, स्व. प्रभाकर पाटील आणि स्व. दत्ता पाटील यांच्या विचारांवर चालणारा पक्ष असून, पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील व राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या नेतृत्वावर कार्यकर्त्यांचा ठाम विश्वास असल्याचे त्यांनी सांगितले. अनेक प्रयत्न करूनही चौलमध्ये पक्ष फोडता आला नाही, याचे कारण म्हणजे चौलमधील शेकापचा कार्यकर्ता आजही पक्षाशी एकनिष्ठ असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

शेकाप जिल्हा चिटणीस मंडळाचे सदस्य शरद वरसोलकर यांनी, महाविकास आघाडीच्या तिन्ही उमेदवारांच्या विजयासाठी सर्वांनी झोकून देऊन काम करावे, असा विश्वास व्यक्त करत कार्यकर्त्यांमध्ये जोश निर्माण केला. तसेच, रोहिदास म्हात्रे यांनीही एकदिलाने काम करण्याचे उपस्थित कार्यकर्त्यांना आवाहन केले.

या बैठकीला रोहिदास म्हात्रे, विजय ठाकूर, आर.डी. म्हात्रे, शैलेश नाईक, राजेंद्र नाईक, महेश पाटील, प्रशांत वर्तक, आशिष पाटील, अमित फुंडे यांच्यासह अनेक ज्येष्ठ व निष्ठावंत कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीचे सूत्रसंचालन राजेंद्र ठाकूर यांनी केले. यावेळी त्यांनी शेतकरी कामगार पक्षाचा इतिहास, चौलमध्ये पक्षाच्या माध्यमातून करण्यात आलेली कामे याचा आढावा घेतला. शेवटी आभार प्रदर्शनाने बैठकीची सांगता झाली.

### जनतेची सेवा हाच उद्देश : अनया फुंडे

मला उमेदवारी दिल्याबद्दल शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील, राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील तसेच सर्व नेते व पदाधिकाऱ्यांचे मी मनापासून आभार मानते. निवडून आल्यानंतर सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी प्रामाणिकपणे काम करेन. चौल मतदारसंघातील जनतेने मला सेवा करण्याची एक संधी द्यावी, असे आवाहन चौल पंचायत समिती गणाच्या आघाडीच्या उमेदवार अनया फुंडे यांनी केले.

रोटरी क्लब ऑफ पुणे मेट्रो
यांच्या निधीतून आयोजित
भारत विकास परिषद कोथरूड व दिव्यांग केंद्र पुणे तर्फे
मोफत दिव्यांग शिबीर-माणगाव (जि. रायगड) रविवार दि. १ फेब्रुवारी

रु. 50 हजाराचा पाय मोफत
दिव्यांगांसाठी मोफत आधुनिक कृत्रिम मॉड्युलर पाय आणि हात व कॅलिपर शिबीर
दिव्यांग पूर्व नोंदणी आवश्यक
98811 38052 / 98230 24232
रविवार दि. 1 फेब्रुवारी 2026 (सकाळी 9 ते 2)
शिबिर स्थळ : वनवासी कल्याण आश्रम शाळा
उत्तेखोल, दत्त नगर जवळ, माणगाव (जि. रायगड)
आधुनिक कृत्रिम मॉड्युलर पाय ज्याची बाहेर कमर्शियल किंमत रु. 50 हजारापेक्षा जास्त आहे असा पाय मोफत देणार आहे
पूर्व नोंदणी शिवाय प्रवेश नाही. दिव्यांग व एक सोबतीसाठी मोफत भोजन

# श्रीवर्धनची एसटी माणगावच्या भरवशावर

## बसमध्ये इंधन भरण्यासाठी करावा लागतो ८० किमीचा प्रवास; प्रवासी वर्गासह बसचालकाची डोकेदुखी

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

विविध कारणांनी कायम चर्चेत असलेले श्रीवर्धन आगार पुन्हा एकदा इंधन पुरवठा समस्येच्या कारणाने चर्चेत आला आहे. श्रीवर्धन आगारात एकिकडे इंधन बचाव अभियान सुरू असतानाच मुंबई व पुणे विभागात ये-जा करणाऱ्या एसटी बसेसना इंधनासाठी तब्बल ८० किमीचा प्रवास करत माणगाव आगारात जावे लागत आहे. आधिच लांब पल्ल्याच्या एसटी बसेसना अधिक थांबे देण्यात आले आहे. त्यातच माणगाव आगारात इंधन भरताना प्रचंड वेळ वाया जातो. याचा नाहक त्रास प्रवासी वर्गाला होत असून श्रीवर्धन आगारातील एसटी बसेसला मोठी डोकेदुखी ठरत आहे. त्यामुळे एसटी महामंडळाची इंधन बचाव मोहिम इंधना अभावी कागदावरच राहिल्याचे प्रवासी वर्गातून बोलले जात आहे.



श्रीवर्धन स्थानकातून पहाटे ४ वाजल्यापासून रात्री साडेनऊ वाजेपर्यंत म्हसळा व बोर्लीपंचतन मार्गे मुंबई विभाग आणि काही एसटी बसेस पुणे विभागात मार्गस्थ होत असतात. त्याचप्रमाणे श्रीवर्धन-माणगाव अशा बसेसच्या फेऱ्या सुरू आहेत. श्रीवर्धन आगारातून मार्गस्थ होण्याअगोदर या सर्व एसटी बसेसमध्ये इंधन भरले जाते. मात्र, सद्यस्थितीत आगारातील इंधन पंप बंद अवस्थेत असल्याने श्रीवर्धन आगाराच्या बसेसना माणगाव आगारातून इंधन पुरवठा केला जात आहे. त्यामुळे लांब पल्ल्याच्या एसटी बसेस माणगाव आगारात इंधनासाठी थांबत असल्याने त्याचा नाहक त्रास प्रवासी वर्गाला सहन करावा लागत आहे.

इंधन भरण्याच्या प्रक्रियेला किमान ३० मिनिटे अवधी लागतो. त्यातही इंधनाकरीता पंपावर अगोदरच एखादी एसटी बस उभी असल्यास आणखी कालावधी लागत असल्याने बसचालकाला प्रवासी वर्गाच्या रोषाला सामोरे जावे लागते.श्रीवर्धन आगाराच्या मुंबई विभागात ये-जा करणाऱ्या बसेसना नागोठणे ते खारपाडा या मार्गावर अनेक थांबे दिले आहेत.त्यातच माणगाव आगारात इंधनासाठी वेळ जात असल्याने श्रीवर्धन आगारातून निघणाऱ्या एसटी बसेसची डोकेदुखी ठरत आहेत. श्रीवर्धन ते मुंबई हा प्रवास ५ तास ५० मिनिटांचा आहे. परंतु, सध्या हा प्रवास ७ तासांच्या वर झाला आहे.

### इंधन बचाव अभियान कागदावरच

**भविष्यात इंधन दरवाढीचे मोठे संकट समोर असताना महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या चालकांना इंधन बचत अभियानातून डिझेल वाचविणे, पर्यायाने इंधनावरील अनावश्यक खर्च टाळण्याचे समुपदेशन करण्याबरोबरच पारंपरिक इंधनाच्या ज्वलनामुळे होणारे वातावरणातील प्रदूषण कमी करण्याच्या दृष्टीने सुरक्षित व सुव्यवस्थित वाहन चालविण्याचे आवाहन करण्यात येत आहे. या अभियान कालावधीत आगाराकडून 'इंधन बचत करणाऱ्या चालकांचा सत्कार' या अभियानांतर्गत करण्यात येणार आहे. परंतु, श्रीवर्धन आगाराचे 'इंधन बचाव अभियान' हे इंधन अभावी कागदावर राहिल्याचे चित्र आहे.**

> **श्रीवर्धन आगारातील डिझेल पंपाचे काम सुरू आहे. त्यामुळे तात्पुरत्या स्वरूपात माणगाव आगारातून डिझेल घेण्यात येत आहे. आगारातील सेवा लवकरच पुर्ववत होईल.**
> **– महिबूब मणेर, श्रीवर्धन आगारप्रमुख**

## निवडक



### आरोग्य शिबिराचे यशस्वी आयोजन

**पनवेल :** डॉक्टर ३६५ व डीआरव्ही चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने अंधेरी (प) येथील चित्रकूट मैदानानात आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे अध्यक्षस्थान डॉक्टर ३६५ चे डॉ. धर्मेंद्र कुमार यांनी भूषविले होते. शिबिराचे आयोजन आयएनओचे अध्यक्ष डॉ. अनंत बिरादार यांच्या मार्गदर्शनाखाली व सहकार्याने करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या अभिनेत्री शिल्पा शेट्टी, अभिनेता तुषार कपूर यांची विशेष उपस्थिती लाभली. तसेच, डॉ. प्रतिभा बागवे, डॉ. मुकेश दिल्ली व त्रिभुवन यांच्या प्रेरणादायी उपस्थितीमुळे कार्यक्रमाची शोभा वाढली. पनवेल तालुक्यातील स्नेहलता निसर्गोपचार आश्रम शांतिवन यांच्यावतीने या शिबिराचे नेतृत्व डॉ. कमल सिंह कटारा यांनी केले. त्यांना डॉ. सोनिया वर्मा, डॉ. शुभदा शर्मा व डॉ. अश्विनी वाघमारे यांच्या अनुभवी वैद्यकीय पथकाने सहकार्य केले. या आरोग्य शिबिराचा मुख्य उद्देश चित्रपटसृष्टीतील कलाकार व कर्मचारी यांना निसर्गोपचाराद्वारे प्रतिबंधात्मक व उपचारात्मक सेवा देणे हा होता. या शिबिरात दीपक पराशर, गुलशन राणा, अरमान, कुर्शाद, उपासना तसेच इतर चित्रपट क्षेत्रातील मान्यवरांना उपचार व वैद्यकीय सल्ला देण्यात आला. एकूण १२० रुग्णांनी या आरोग्य शिबिराचा लाभ घेतला. सर्व रुग्णांनी उपचारांबाबत समाधान व्यक्त केले व शिबिरास भरभरून प्रतिसाद मिळाला. हे आरोग्य शिबिर यशस्वीरीत्या पार पडले असून, भविष्यातही अशा प्रकारचे उपक्रम राबविण्याची बांधिलकी डॉक्टर ३६५, डी आर व्ही चारीटेबल ट्रस्ट व स्नेहलता निसर्गोपचार आश्रम यांनी व्यक्त केली.



### पनवेलमध्ये दहशतवादविरोधी मॉकड्रिल

**पनवेल :** प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर दहशतवादी कारवाया व कायदा-सुव्यवस्थेच्या दृष्टीने सज्जता तपासण्यासाठी पनवेल रेल्वे पोलीस ठाण्याच्यावतीने पनवेल रेल्वे स्थानकातील नवीन बुकिंग हॉल येथे मॉकड्रिलचे आयोजन करण्यात आले होते. ही मॉकड्रिल मुंबई लोहमार्ग हार्बर विभागोच सहाय्यक पोलीस आयक्तांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यामध्ये पनवेल रेल्वे पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी, जलद प्रतिसाद पथक, तसेच नवी मुंबई व पनवेल तालुका पोलीस, अग्निशामक दल आणि होमगार्ड यांचा सहभाग होता. सकाळी ११.३० वाजता सुरू झालेली ही मॉकड्रिल दुपारी १२.४० वाजता यशस्वीरीत्या संपन्न झाली. मॉकड्रिल दरम्यान संशयित इसमाच्या बॅगची पथकाकडून तपासणी करण्यात आली. तपासणीअंती कोणतीही संशयास्पद वस्तू आढळून आली नाही. ही मॉकड्रिल पूर्णतः शांततेत व नियोजनबद्ध पद्धतीने पार पडली असून आपत्कालीन परिस्थितीत तत्पर प्रतिसाद देण्याच्या दृष्टीने ही मॉकड्रिल उपयुक्त ठरली, अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय तायडे यांनी दिली.



### रस्ता सुरक्षा अभियान कार्यशाळा

**पनवेल :** रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरीता रस्ता सुरक्षा विषयक कार्यशाळा खारघर येथील भारती विद्यापिठात संपन्न झाली. या कार्यक्रमाच्या सुरूवातीला महाविद्यालयातील उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना प्रोजेक्टरद्वारे नवी मुंबई सारथी सुरक्षा सेवा संस्थेचे विनय मोरे यांनी रस्ता सुरक्षा विषय सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाची प्रस्तावना पृथ्वीराज काकडे यांनी केली. या कार्यक्रमाकरीता कोकणचे विभागीय आयुक्त विजय सुर्यवंशी, अभिनेता हार्दिक जोशी, प्रादेशिक परिवहन अधिकारी जयंत चव्हाण, प्रा. मोहन अवस्थी, सहा. प्रादेशिक परिवहन अधिकारी हरिभाऊ जेजुरकर, निलेश धोटे, विनय मोरे, विवेक खाडे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी मोहन अवस्थी यांनी, सर्व विर्द्यार्थ्यांना महाविद्यलयाच्या परिसरात व रस्त्यावर वाहन चालवितांना वाहतुक नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले. मराठी सिने सृष्टीतील प्रसिद्ध अभिनेते हार्दिक जोशी यांनी त्यांच्या भाषणात खास शैलीत सर्व उपस्थितांचे मागर्दशन केले. तसेच, सिने सृष्टीतील कलाकार शुटींग करतांना व वास्तविक जीवनात वाहतुकीच्या नियमांचे पालन करीत असल्याचे नमूद केले. विजय सुर्यवंशी यांनी, सर्व उपस्थितांना अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी दुचाकी चालवितांना हेल्मेट परिधान करावे, चारचाकी वाहन चालवितांना सिटबेल्टचा वापर करावा व वाहतुक नियमांचे काटेकोरपणे करण्याचे आवाहन केले. तसेच, विद्यार्थ्यांना इनरव्हिल या संस्थेच्यावतीने हेल्मेटचे वितरण करण्यात आले.

### सिलिंडर ट्रकचा भीषण अपघात

**श्रीवर्धन :** बोडणीची डाग या घाट रस्त्यावरील तीव्र वळणावर सिलिंडर वाहतूक करणाऱ्या ट्रकचा शुक्रवारी (दि.२३) भीषण अपघात झाला. मिळालेल्या माहितीनुसार, हा गॅस सिलिंडरने भरलेला ट्रक नवी मुंबई येथून श्रीवर्धनकडे जात होता. हा ट्रक श्रीवर्धन-म्हसळा मार्गावरील बोडणीची डाग या घाट रस्त्यावर आला असता येथील तीव्र उतारावर ट्रकचा ब्रेक निकामी झाला. त्यामुळे या मार्गावरील अवघड वळणावर ट्रक पलटी झाला. ट्रक चालकाने व क्लीनर यांनी प्रसंगावधान दाखवून उडी मारल्याने दोघे बचावले. या रस्त्यावर अनेक ठिकाणी तीव्र उतार व वळणावर रस्ते असून या मार्गावर अनेक अपघात झाले आहेत.



### देहेन येथे गणेश जयंती उत्साहात

**। भाकरवड । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील श्रीगांव-देहेन येथे जगन्नाथ महाराज यांच्या निवासस्थानी गुरूवारी (दि.२२) श्री गणेश जयंती उत्सव सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या सोहळ्याला यंदा २२ वे वर्षे पूर्ण झाली असून यावेळी विविध आध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. गुरूवारी सुरू झालेल्या या आध्यत्मिक पर्वाची सुरुवात सकाळी अभिषेक, ध्वजारोहण, कीर्तन असे कार्यक्रमांनी झाली. यावेळी माजी जिल्हा परिषद अध्यक्षा सुप्रिया पाटील यांनी भेट दिली. या कार्यक्रमासाठी ग्रामस्थांचा मोठा सहभाग लाभला.






खांदा वसाहतीमध्ये गुरूवारी (दि.२२) माघी गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानंतर या दीड दिवसाच्या बाप्पाला ढोल-ताशांच्या गजरात विसर्जनासाठी निरोप देण्यात आला. (छायाचित्र : राजेश डांगळे)

### श्रींच्या पालखी मिरवणुकीत तरूणांचा सहभाग

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील चिरनेर येथील प्रसिद्ध महागणपती मंदिरात गुरुवारी (दि.२२) माघी गणेशोत्सव साजरा करण्यात आला. यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दिवसभर भजन, कीर्तन व महाप्रसादाच्या कार्यक्रमाबरोबर रात्री संपूर्ण गावातून श्रींची पालखी मिरवणूक काढण्यात आली होती. या पालखी मिरवणुकीत तरुण-तरुणींचा मोठा सहभाग दिसून आला. यावेळी बॅन्जो पथकाच्या गाण्यांवर तरुण-तरुणींचा बेबंद बेधुंद नृत्य अविष्कार पहायला मिळाला. संपूर्ण गावात जागोजागी श्रींच्या पालखी मिरवणुकीचे स्वागत करून श्रींना पंचारतीने औक्षण करण्यात आले. श्री गणपती देवस्थानच्या विश्वस्तांसह ग्रामस्थ व पाहुणे मंडळीसह सर्वांनी विशेष सहकार्य करून श्रींच्या जन्मोत्सवाचा व पालखी मिरवणुकीचा आनंद घेतला.



### चिरनेरमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील चिरनेर महागणपती माघी गणेशोत्सवाचे औचित्य साधून, गणपती देवस्थान व ग्रामस्थ मंडळाच्यावतीने येथील माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाच्यागुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. माघी गणेशोत्सवाच्या निमित्ताने श्रींचा जन्मोत्सव, पालखी मिरवणूक असे विविध धार्मिक कार्यक्रम भव्य स्वरूपात पार पडले. याला येथील नागरिकांनी उत्तम प्रतिसाद देऊन सहकार्य केल्याची माहिती श्री गणपती देवस्थानचे सचिव अमर ठाकूर यांनी दिली. तसेच, रसिक प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी स्टेप ऑफ आर्टच्या सादरीकरणातून नृत्य अविष्काराचा कार्यक्रम सादर करण्यात आला होता. गणेश जयंतीच्या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमर ठाकूर यांनी केले. गणेश जयंती सोहळा यशस्वी करण्यासाठी चिरनेर ग्रामस्थांनी मोलाचे सहकार्य केले. यावेळी सरपंच भास्कर मोकल, माजी विश्वस्त सुरेश पाटील, नाट्यदिग्दर्शक संतोष ठाकूर, उपसरपंच अरुण पाटील, माजी उपसरपंच सचिन घाबडी यांच्यासह श्री गणपती देवस्थानचे विश्वस्त व गाव कमिटीचे सभासद उपस्थित होते.

### दौलत गडावर गणेशोत्सव साजरा

**। महाड । प्रतिनिधी ।**

दौलतगड प्रतिष्ठान दासगांवच्यावतीने गुरुवारी (दि.२२) दुर्ग दौलतगडावर पहिल्यांदाच गणेश जन्मोत्सव सोहळा मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. सामाजिक परिवर्तनाची जाणीव म्हणून दौलतगडावर स्वच्छता मोहिम करत असतानाच श्री गणेशाची पाषाणातील शिवकालीन मूर्ती सापडली होती. दौलतगड प्रतिष्ठान संस्थेने या मूर्तीची गडावर स्थापना करून एक मंदिर बांधले. गुरूवारी पहाटे अभिषेक, पूजन, महाआरती, सायंकाळी महिलांसाठी हळदी कुंकू, तसेच स्वरांकित भक्ती संगीताचा कार्यक्रम झाला. या संगीतमय कार्यक्रमात गायन व बासरी वादनाच्या जुगलबंदीने सर्व भक्तगण या भक्तिमय वातावरणामुळे मंत्रमुग्ध झाले. दौलतगड प्रतिष्ठानच्यावतीने श्रींच्या महाप्रसादाचे आयोजन देखील करण्यात आले होते.



### आपले चित्त शुद्ध ठेवा : प्रिया निकम

**। कोलाड । प्रतिनिधी ।**

आपल्या हाताने स्वतःच्या आयुष्याचा नाश करू नका. या जीवनाचा सार्थक करण्यासाठी आपले चित्त शुद्ध ठेवा. चित्त शुद्ध नसेल तर त्या घरात गोपाळ कसा येईल, आणि त्या घरात शांतता कशी नांदेल, असे मत प्रिया निकम यांनी स्पष्ट केले. डोलवहाळ येथील गणेश जयंती उत्सवाच्या निमित्त किर्तन सेवेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संत श्रेष्ठ जगद्गुरू तुकाराम महाराज यांच्या अभंगाच्या आधारे त्या बोलत होत्या. श्री गणेश जयंती उत्सव निमित्त डोलवहाळ येथे गेल्या २० वर्षांपासून हा कार्यक्रम सुरु असुन या निमित्ताने सकाळी श्री गणेश व गावदैवतांचे अभिषेक विधी करण्यात आले. त्यानंतर राम आंबेकर यांचे गणेश जन्माचे किर्तन, ज्ञानेश्वरीचे पारायण, श्रींची मिरवणूक, हरिपाठ व किर्तन असे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. यावेळी ऐनघर आमडोशी पायी दिंडीचे अध्यक्ष नाना शिरसे, राम आंबेकर, जयराम जांभेकर आदींसह असंख्य महिला, ग्रामस्थ, महिला मंडळ व शिवप्रेमी मित्रमंडळ उपस्थित होते.

### विविध कार्यक्रमांचे आयोजन

**। उरण । प्रतिनिधी ।**

सालाबाद प्रमाणे यंदाही शिवराज युवा प्रतिष्ठान तर्फे माघी गणेशोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. दि.२२ ते २६ जानेवारीपर्यंत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहेत. त्यात भजन, आरोग्य शिबीर, होम मिनिस्टर, पाककला, संसृतिक कार्यक्रम, मनोरंजनाचा कार्यक्रम व श्रींची भव्य विसर्जन मिरवणूक इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या माघी गणेशोत्सवाचे आयोजक मनसे रायगड जिल्हाध्यक्ष तथा शिवराज युवा प्रतिष्ठानचे संस्थापक संदेश ठाकूर हे आहेत. त्यांच्यासह कार्याध्यक्षा संगीता ढेरे, सरचिटणीस पूजा प्रसादे, सरचिटणीस मंगेश वाजेकर, खजिनदार उमेश वैवडे, कविता म्हात्रे, योगेश म्हात्रे, धनंजय भोरे, दिनेश हळदणकर, सुभाष तांबे, राजेश सरफरे, हितेश साळुंखे व कार्यकारी मंडळ आदि सहकार्य करीत आहेत.

### अज्ञात वाहनाची दुचाकीला धडक

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

उलवे येथील सुमित झा (२५) हे दुचाकीवरून कुंडेवहाळ येथील जेएनपीटी रोडवरील जेडब्ल्यूआर कंपनीच्या समोर असलेल्या काळुबाई मंदिराजवळ आले असता, त्यांच्या दुचाकीला एका वाहनाने जोरदार धडक दिली. या धडकेत सुमित झा गंभीर जखमी झाले. त्यांना त्वरीत मुंबईतील जे.जे. हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

### पनवेलमध्ये रेशनकार्ड शुद्धीकरण मोहीम

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

सुधार अभियान अंतर्गत शिधापत्रिकांचे शुद्धीकरण मोहीम राबवली जात आहे. मोहिमेत मृत, दुबार आणि संशयास्पद लाभार्थ्यांची नावे वगळण्याचे काम सुरू आहे. पनवेल तालुक्यातही अभियानाला सुरुवात झाली असून दुबार व संशयित नावे वगळण्याची शक्यता आहे. प्राधान्य गट आणि अंत्योदय शिधापत्रिकांमधील अपात्र, मृत आणि दुबार नावे हटवणे.

पुरवठानिरीक्षक घरोघरी जाऊन आधार आणि धान्य उचलीची पडताळणी करत आहेत. राज्यातील ८८ लाखांहून अधिक लाभार्थी संशयास्पद आढळले असून, त्यात १०० वर्षांवरील व्यक्तींचाही समावेश आहे. पनवेल तालुक्यात १ लाख ९ हजार १४७ लाभार्थी आहेत. त्यात ६ हजार ९४ अंत्योदय आहेत. तर, ६२ हजार ३६० प्राधान्य कुटुंब लाभार्थी आहेत. त्यांना स्वस्त दरात धान्य मिळत आहे. या मोहिमेमुळे खऱ्या लाभार्थ्यांना धान्याचा लाभ मिळण्यास मदत होणार आहे; मात्र, अनेकांचे रेशनकार्ड रद्द होण्याचे गंडांतर ओढवले आहे.

> **मिशन सुधार अभियानांतर्गत शिधापत्रिका शुद्धीकरण काम सुरू आहे. लवकरच ते पूर्ण होईल.**
> **– अश्विनी धनवे, पुरवठा अधिकारी, पनवेल**

**सर्वांगीण विकास साधण्यासाठी महोत्सवाचे आयोजन | एकूण ३८० विद्यार्थ्यांचा सहभाग**

## उडान महोत्सव ठरला आकर्षणाचा केंद्रबिंदू

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरणचे कोकण ज्ञानपीठ महाविद्यालय तसेच यूईएस महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने व मुंबई विद्यापीठाच्यावतीने उडान महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. हा महोत्सव सरस्वती मंडपाच्या आवारात जल्लोषात संपन्न झाला.

मुंबई विद्यापीठाच्या अजीवन अध्ययन व निरंतर शिक्षण विभागाच्यावतीने आयोजित करण्यात आलेला हा उडान महोत्सव तरुणाईचे आकर्षण ठरला. या महोत्सवात नवी मुंबई व उत्तर रायगड जिल्ह्यातील एकूण २१ महाविद्यालयाच्या एकूण ३८० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. हा महोत्सव विद्यापीठाच्या अजीवन अध्ययन व निरंतर शिक्षण विभागाचे संचालक प्रा. डॉ. बळीराम व एन.गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. या महोत्सवातील उद्घाटनीय कार्यक्रम युईएसचे चेअरमन चंद्रकांत ठक्कर, कोकण ज्ञानपीठ संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप चंद्र सिंगारपुरे, मिलिंद पाडगावकर, डॉ. कुणाल जाधव, प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जे, प्रा. मीनाक्षी गुप्ता, फील्ड कॉर्डिनेटर डॉ. देविदास बामणे, प्रा. व्हि.एस. इंदुलकर, प्रा. डॉ. ए.आर. चव्हाण व डॉ. पी.आर. कारुळकर आदी मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी बोलताना प्रा. डॉ. बळीराम एन. गायकवाड यांनी, विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देणे व विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी उडान महोत्सव आयोजित केला जातो, असे प्रतिपादन केले.



या महोत्सवात वक्तृत्व, पोस्टर मेकिंग, पथनाट्य, पोवाडा व क्रियेषण लेखन इत्यादी स्पर्धा आयोजित केल्या गेल्या. या स्पर्धेचे परीक्षण सुनंदा मनोज कुमार, विजयकुमार कालवले, संजय शेटे, संजीव पाटील, अशोक शिर्के, भीमराव खेत्रे, प्रा. सुशील ससाने आदी आपापल्या क्षेत्रातील तज्ज्ञ परीक्षकांनी केले. यावेळी विद्यार्थ्यांनी अतिशय दर्जेदार व पूर्ण क्षमतेने आपली कला सादर केली व प्रेक्षकांची मने जिंकली. त्यामुळे हा उडान महोत्सव तरुणायचे आकर्षण ठरला. स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना समारोपीय कार्यक्रमात विद्यापीठाच्यावतीने पदक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.

या कार्यक्रमादरम्यान, युईएस संस्थेचे उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी युईएसचे माजी चेअरमन तनसूक जैन हे उपस्थित होते. समारोप कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. हन्नत शेख यांनी केले. तर, कोकण ज्ञानपीठ महाविद्यालयाच्या अजिवन अध्ययन व निरंतर शिक्षण विभागाचे प्रमुख सहयोगी प्रा.व्हि. एस.इंदुलकर यांनी आयोजक या नात्याने उपस्थित सर्व मान्यवर व विद्यार्थ्यांचे आभार व्यक्त केले. या महोत्सवाच्या यशस्वी आयोजनात दोन्ही महाविद्यालयाच्या एकूण ४० शिक्षकांनी व ६० स्वयंसेवकांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली. या महोत्सवाच्या यशस्वी आयोजनामुळे मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू तथा प्रो. कुलगुरू व पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**२५ जानेवारी**

१) श्री.मनोहर गजानन वैद्य
मु.आक्षी, अलिबाग,
दि.२५-१-१९४४

२)श्री.सुरेश मोरू पाटील
मु.कार्ले, ता.अलिबाग
दि.२५-१-१९५६

३)श्री.केशव गोपाळ टिळू
मु.थळआगार, अलिबाग
दि.२५-१-१९५६

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

## मध्य रेल्वेचा ब्लॉक

**पनवेल** : डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉरच्या (डीएफसीसी) पनवेल ते कळंबोलीदरम्यान ओपन वेब गर्डरची उभारणी करण्यात येणार आहे. यासाठी मध्य रेल्वेने १८ जानेवारी ते १५ फेब्रुवारीदरम्यान प्रत्येक आठवड्याच्या शनिवारी रात्री २ ते ५ तासांचा ब्लॉक घोषित केला आहे. तो पनवेल ते कळंबोलीदरम्यान अप आणि डाऊन मार्गावर असणार आहे.

# काँक्रिटीकरणामुळे वाहतूककोंडी दूर

## • चालकांना मिळाला दिलासा; ५० किलोमीटर अंतर झाले कमी

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

सिडकोच्या सागरी महामार्गावरील खोपटे चौकात खड्डे मुक्तीसाठी सिडकोने पाऊल उचललेले आहे. रस्त्याचे काँक्रिटीकरण केल्याने प्रवास सुखकर होत असून वाहतूक कोंडी दूर झाली आहे. चार महिन्यात हे काम पूर्ण झाले. या कामामुळे वाहतूक पर्यायी मार्गाने वाळविण्यात आली होती.

मात्र, आता काम पूर्ण झाल्याने वाहन चालकांना दिलासा मिळाला आहे. खोपटे जंक्शन वरून जे एन पी टी, द्रोणागिरी, मुंबई, पळस्पे तसेच चिरनेर, खोपटे, पेण, अलिबाग येथे जाणारी वाहने देखील ये-जा करत आहेत.



अवजड वाहनांमुळे खोपटे चौकात अपघाताची संख्या वाढली होती. कायमस्वरूपी उपाययोजना करावी अशी मागणी नागरिक सातत्याने करत होते. अखेर सिडकोने याची दखल घेत येथे रस्ता दुरुस्तीच्या कामाला सुरुवात केली. दरवर्षी याच मार्गाने गणेश उत्सवासाठी कोकणात जाणारे गणेशभक्त मुंबई-गोवा मार्गाला जोडणाऱ्या सिडकोच्या सागरी महामार्गावरून प्रवास करतात. येथे प्रचंड खड्डे असल्याने या मार्गावरून गणेशभक्तांना खड्ड्यातून प्रवास करावा लागत होता. मात्र, या मार्गावर काँक्रिटीकरण झाल्याने या मार्गावरील प्रवाशांना दिलासा मिळाला आहे. मुंबई आणि नवी मुंबईतील चालक उरणला जोडणाऱ्या नवी मुंबईतील आम्रमार्ग आणि अटल सेतू मार्गाने खोपटे पूल खारपाडामार्गे प्रवास करीत आहेत. त्यामुळे वाहनांना ५० किलोमीटरचे अंतर कमी झाले आहे. या मार्गाने नवी मुंबईतून गव्हाण फाटा उड्डाणपूल मार्गे तर अटल सेतूवरून चिरलेमार्गे सिडको सागरी महामार्ग असा प्रवास करता येतो. त्यामुळे पनवेल पळस्पे कर्नाळा या मार्गाऐवजी थेट खारपाडा येथे पोहोचता येते.

या मार्गावरून जेएनपीए बंदरावर आधारित असलेल्या गोदामातून हजारो जड कंटेनर वाहनांची ये जा होत आहे. या जड वाहनांमुळे या मार्गावर मोठमोठे खड्डे पडले होते. या चौकात वाहन नियंत्रण करणारी यंत्रणा नसल्याने हा धोका वाढला होता. यामुळे वारंवार खड्ड्यांच्या दुरुस्तीची मागणी प्रवाशांकडून केली गेली होती.

## उरण रुग्णालयास बेडशीट भेट

**। उरण । प्रतिनिधी ।**

लायन्स क्लब ऑफ उरण व मॉर्निंग कट्टा विमला तलाव उरण यांच्या संयुक्त विद्यमाने इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयास शुक्रवारी (दि.२३) रोजी ६० बेड शीट व ६० पिलो कव्हर देण्यांत आले. यावेळी इंदिरा गांधी रुग्णालयाचे वैदकीय अधीक्षक डॉ. बाबासो काळेल, लायन्स क्लबचे उरणचे अध्यक्ष डॉ. साहेबराव ओहोळ, सदानंद गायकवाड, संजय धबडे, अमोल गिरी, उल्हास मोकाशी, सुनील घरत, सुबोध दर्णे, अभय वेदपाठक, प्रवीण म्हात्रे, सुरेश घरत, श्रीकांत दर्णे, अशोक वेंगुर्लेकर, अशोक म्हात्रे, देवचंद कोळी, रुग्णालयाचे कर्मचारी उपस्थित होते. रुग्णालयाचे अधीक्षक डॉ.बाबासो काळेल यांनी सर्वांचे आभार मानले.

# फुंडे महाविद्यालयात नर्सिंग प्रशिक्षण




**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींना स्वतःच्या पायावर उभे राहता यावे, या उद्देशाने प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर तसेच पनवेल येथील प्रथम संस्थेच्या नर्सिंग सेंटरच्या मार्गदर्शिका जयवंती गोंधळी यांच्या पुढाकाराने फुंडे महाविद्यालयात नर्सिंग प्रशिक्षण नुकतेच सुरू करण्यात आले आहे. प्रशिक्षण मोफत असून त्याचा कालावधी ५० दिवसांचा आहे. यामध्ये दहा दिवस फुंडे महाविद्यालयात प्रशिक्षण दिले जाईल. तर दहा दिवस पनवेल नर्सिंग सेंटर येथे प्रॅक्टिकल तसेच ओजेटी अंतर्गत रुग्णांवर ३० दिवस प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाईल. यामध्ये प्रशिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थींची पात्रता दहावी पास किंवा त्यापेक्षा अधिक असली तरी चालेल. तर प्रशिक्षणार्थींची वयोमर्यादा १८ ते ३५ पर्यंत असावी. प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर १०० टक्के प्लेसमेंट देण्यात येईल. त्याचबरोबर या कोर्स अंतर्गत काही सुविधाही मोफत दिल्या जातील. यामध्ये स्किल इंडिया प्रमाणपत्र, पुस्तके, नर्सिंग टूल किट, युनिफॉर्म देण्यात येईल. प्रवेशासाठी, पासपोर्ट साईज फोटो चार, आधारकार्ड, शाळा सोडल्याचा दाखला, शैक्षणिक गुणपत्रिका आदी आवश्यक कागदपत्रे झेरॉक्स प्रतींसह महाविद्यालयात जमा करावी असे आवाहन मार्गदर्शिका जयवंती गोंधळी यांनी केले आहे.



## शिवजयंती अध्यक्षपदी अभिषेक भोईर

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरणमध्ये शिवजयंतीच्या उत्सव साजरा करण्याबाबत शिवसेना शहर शाखेमध्ये नुकतीच बैठक बोलवण्यात आली होती, या बैठकीत शिवजयंती उत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी अभिषेक भोईर यांची व उपाध्यक्षपदी हर्षद शिंदे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. याप्रसंगी अभिषेक भोईर व हर्षद शिंदे यांचे माजी आ. मनोहर भोईर यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी नरेश राहळकर, गणेश शिंदे, परमानंद करंगुटकर, सूर्यकांत दरणे, विनोद म्हात्रे, गणेश म्हात्रे, रमाकांत म्हात्रे व पदाधिकारी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी परसबागेतुन केले पक्षीनिरीक्षण

**। उरण । प्रतिनिधी ।**

निसर्गाबद्दल प्रेम आणि कुतूहल जागृत करण्याच्या उद्देशाने उरण तालुक्यातील मोठीजुई येथील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत अनोख्या पक्षीनिरीक्षण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शाळेच्या स्वतःच्या परसबागेत राबवण्यात आलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना वर्गाबाहेर पडून निसर्गाचे जवळून निरीक्षण करण्याची संधी मिळाली. या उपक्रमाला विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



शिक्षकांच्या पुढाकाराने हा अभिनव उपक्रम हाती घेण्यात आला होता. शाळेची परसबाग विविध प्रकारच्या भाज्या, फळे आणि फुलांनी बहरलेली असल्यामुळे तिथे अनेक स्थानिक पक्ष्यांचा वावर असतो. याच नैसर्गिक वातावरणाचा फायदा घेत, विद्यार्थ्यांना सकाळी लवकर शाळेच्या बागेत जमण्यास सांगण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी दुर्बिणीतून शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शांत राहून पक्ष्यांच्या हालचाली कशा टिपायच्या, याची माहिती दिली.

निरीक्षणादरम्यान विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे पक्षी पाहायला मिळाले. प्रामुख्याने चिमण्या, कावळे, पोपट,साळुंक्या, लाल बुडाचा बुलबुल, भारद्वाज, खाटिक, वटवट्या, व्हला, कबुतर, आणि काही फुलचुख्यांचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी पक्ष्यांचे रंगरूप, आवाज आणि त्यांच्या खाण्याच्या सवयींचे बारकाईने निरीक्षण केले. काही विद्यार्थ्यांनी तर त्यांच्या निरीक्षणांची नोंद वहीत करून ठेवली.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये निसर्गाविषयी अधिक गोडी निर्माण झाली असून, भविष्यात असे आणखी उपक्रम राबवण्याचा मानस व्यक्त केला आहे.

सदर उपक्रम यशस्वी होण्यासाठी अविनाश नवाले, कौशिक ठाकूर, विश्वनाथ गावंड, यतीन म्हात्रे, दर्शन पाटील, अंकुश पाटील, काजल पाटील यांनी मेहनत घेतली.

# साप्ताहिक राशिभविष्य २५ ते ३१ जानेवारी २०२६

**ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग**
**मोबा.९४०४७९१७९८**

### आशावादी राहू नका

**मेष :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुम्ही त्या व्यक्तीचे कौतुक किंवा त्यांच्या साठी छोटा कार्यक्रम करू शकतात. तुम्हाला प्रत्येक परिस्थितीत साथ दिली. हा कालावधी प्रेम आणि रोमांसच्या बाबतीत एक उत्तम वेळ सिद्ध होईल कारण, यावेळी तुम्ही आपल्या पार्टनर सोबत आपल्या मनातील गोष्ट सागण्यासाठी सक्षम व्हाल. जे तुमच्या नात्यामध्ये दोघांना जवळ आणण्यास मदत करेल. तथापी, प्रवासाच्या बाबत जोपर्यंत आवश्यक नसेल यात्रा स्थगित करणे उत्तम असेल. अन्यथा, तुम्हाला अनावश्यक खर्च आणि मानसिक तणावातून जावे लागू शकते. याच्या व्यतिरिक्त, ही वेळ आरोग्याच्या प्रति सचेत आणि सतर्क राहण्याचा ही आहे. कारण, यावेळी थोडा ही निष्काळजीपणा नुकसानात बदलू शकतो. **महिलांना:** ही वेळ तुमच्यासाठी ब्रेक घेणे, आराम करणे आणि भविष्यातील पुढील योजना बनवण्यासाठी अनुकूल असेल. साप्ताहाच्या शेवटच्या चरणात या काळात अधिक आशावादी आणि सकारात्मक होण्यासोबतच हे तुमच्यासाठी आतापर्यंतचे सर्वात उत्तम चरण सिद्ध होईल. **शुभ दिनांक** : २६,२७

### प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करा

**वृषभ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात या काळात ग्रहस्थिती तुम्हाला आत्मविश्वास आणि मजबूत करेल ज्यामुळे तुमच्या कार्य आणि प्रदर्शनावर याचा बराच चांगला प्रभाव पडेल. तुम्ही समाजावर चांगला प्रभाव सोडू शकतात आणि आपल्यासाठी चांगले नाव आणि प्रसिद्धी प्राप्त करू शकतात. याच्या व्यतिरिक्त , या ग्रह स्थितीमुळे तुम्हाला या काळात पुढे जाण्याची बरीच संधी मिळेल. या सप्ताहात कुठल्या ही महत्वाचे काम करण्यासाठी जाण्याच्या वेळी केशराचा टिळा कपाळावर लावा. हाती घेतलेल्या कामांचा निपटारा करा. आर्थिक बाजू ठीक राहील. **महिलांना:** मुलांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करावा. प्रकृतीची पथ्ये पाळा. जोडीदाराची साथ मिळेल. मकर राशीतील जातकांचे आरोग्य उत्तम स्थितीमध्ये असेल कारण, मागील काही काळापासून तुमच्या आणि तुमच्या पार्टनरमध्ये उध्दभवणारी समस्या दूर करण्यासाठी ही तुम्ही या काळात चांगले सिद्ध होऊ शकतात. मनाचा ताण हलका झाल्यामुळे आरोग्य चांगले राहील. या सप्ताहाच्या वेळी हा कालावधी आपणास सामान्यापेक्षा अधिक व्यस्त ठेवेल. **शुभ दिनांक** : २८,२९

### गरजू लोकांना मदत करा

**मिथुन :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात व्यवसायात तुम्ही चर्चेत राहाल तसेच कार्य क्षेत्रात काही महत्वाच्या गोष्टी सांभाळण्याची जबाबदारी दिली जाऊ शकते. याच्या व्यतिरिक्त तुम्हाला नवीन कार्य आणि आर्थिक लाभ मिळण्याची प्रबळ शक्यता आहे. सप्ताहाच्या शेवटी या काळात तुम्ही अधिक दयाळू, अध्यात्मिक आणि समाजात काही प्रकारची मदत करतांना दिसाल. या काळात दान-पुण्य करण्याकडे तुमचा अधिक कल असेल आणि गरजू लोकांना ही तुम्ही मदत करतांना दिसाल. तुम्ही शांती आणि संतोष प्राप्त करण्यासाठी या काळात तीर्थ यात्रा ही करू शकतात. तुम्हाला तुमच्या आरोग्याची पूर्णपणे काळजी घेण्याचा सल्ला दिला जातो. शनिवारच्या दिवशी गरजू लोकांना तिळीचे दान करा. **महिलांना:** सप्ताहाच्या सुरवात या राशीसाठी चांगली असेल. जे परदेश यात्रा करण्याच्या शोधात आहे. कारण, त्यांना हा योग चालून येणार आहे. ग्रहाच्या प्रभावाने या काळात तुम्हाला काही सकारात्मक वार्ता मिळू शकते तथापी, या काळात तुम्हाला आपल्या आरोग्याची चांगली काळजी घेण्याचा सल्ला दिला जातो आहे. **शुभ दिनांक** : ३०, ३१

### आत्मविश्वासात वाढ होईल

**कर्क :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात या काळात तुमचे आरोग्य नाजूक राहील यामुळे तुम्हाला काही संक्रमण होण्याची शक्यता राहू शकते. तरीही या काळात लांब वेळापासून चालत आलेली काही समस्यांना तुम्हाला आराम मिळण्याची शक्यता आहे. या काळात तुम्हाला आपल्या जीवनसाथीचा भरपूर साथ मिळेल जे तुमच्या आत्मविश्वासाला वाढवण्यास मदत करेल. ज्यामुळे तुमच्या नोकरी व व्यवसाय क्षेत्रात तुमच्या प्रदर्शनात सकारात्मक बदल पहायला मिळतील. काही मूळ निवासींना या काळात आपल्या जुन्या गोष्टीतून निपटण्याची संधी मिळू शकते. हा कालावधी विद्यार्थ्यांसाठी बरेच चांगले सिद्ध होऊ शकते म्हणून, जर तुम्ही कुठल्या परीक्षा किंवा वाद विवादात हिस्सा घेण्याची इच्छा ठेवतात तर नक्की घ्या कारण, या काळात तुम्ही त्यात नक्कीच विजयी व्हाल. **महिलांना** : या काळात तुम्हाला तुमचे विचार अत्याधिक महत्वाकांक्षी बनवतील आणि तुम्हाला समाजात चांगली सामाजिक व आर्थिकस्थिती देण्यात आणि तुमच्या प्रयत्नात लाभप्रदान करण्यात तुमची मदत करेल. हा काळ तुम्हाला बऱ्याच स्तोत्रांनी कमाई प्रदान करू शकतो. **शुभ दिनांक** : २५, २६

### मान-सन्मान मिळेल

**सिंह :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात हा काळ तुम्हाला आपल्या असलेल्या कौशल्यात भर पडण्यास मदत करेल त्याचा उपयोग करण्यात सक्षम करेल ज्यामुळे भविष्यात तुम्हाला सकारात्मक परिणाम नक्कीच मिळतील. सकाळच्या वेळी नियमित शनि मंत्राचा जप करा. सप्ताहाच्या सुरुवातीमध्ये या राशीतील जातक आपल्या मुलांच्या उत्तम यशामुळे आनंदित आणि उत्साहित दिसतील. हा कालावधी सर्वच गोष्टीतून लाभ देणारा ठरू शकतो यामुळे याचा सकारात्मक प्रभाव वाढतांना दिसेल. या काळात तुम्हाला आर्थिकलाभ मिळण्याची शक्यता आहे. या राशीतील काही जातकांना यावेळी त्यांनी कुणाला दिलेले धन परत मिळू शकते अडकलेले धन मिळवण्यास ह उत्तम कालावधी आहे. एकूणच, ही वेळ प्रत्येक दृष्टीने फळदायी असेल. **महिलांना:** या सप्ताहात तुमची मुले तुम्हाला भरपूर प्रेम आणि सन्मान देतील. या काळात तुमच्या मोठ्या भाऊ बहिणींसोबत तुमच्या संबंधात सुधारणा होण्याची शक्यता आहे कारण, ते तुम्हाला आपले समर्थन आणि स्नेह प्रदान करतील. या काळात तुमच्या सांसारिक सुख-सुविधेत वृद्धी होईल. **शुभ दिनांक** : २८,३१

### वाद विवाद टाळा

**कन्या :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात आपण थोडी काळजी घेणे जरुरी आहे. तुम्हाला कुठल्या प्रकारच्या वाद विवाद आणि ताण घेणाऱ्या विचारापासून दूर राहण्याची आवश्यकता असेल. याच्या व्यतिरिक्त सर्व अंडरहॅन्ड डिलींग आणि गैर कायद्याच्या गोष्टींपासून सावध राहा. जे सरकारच्या कायद्याचे उल्लंघन करते अथवा तुम्हाला नंतर समस्या येऊ शकतात. या पासून चार हात दूर राहा. या बाबतीत कुणालाही मदत करू नका. सप्ताहाच्या शेवटच्या कालावधीत ग्रहस्थिती तुमच्यासाठी आराम घेऊन येईल. जे तुम्हाला आपल्या दृष्टिकोन, दिशा आणि विचारांत स्पष्ट बनण्यास मदत करेल कारण, या काळात तुमचा व्यवसाय आणि करिअरच्या घरात आराम दायक कालावधी राहणार आहे. या काळात तुमचे सर्व काम शांततेने होतील. **महिलांना:** आरोग्याच्या दृष्टीने हा काळ चांगला राहणारा आहे त्यामुळे कुठेही बाहेर जाण्याचे ठरवणार असाल तर हरकत नाही. या काळात तुम्ही स्वतःवर अधिक लक्ष देतांना दिसाल. रविवारी सकाळी सूर्याला पाण्याचे अर्घ्य अर्पण करा. यामुळे तुमच्यासाठी लाभदायक परिणाम प्राप्त होतील. **शुभ दिनांक** : २७,३०

### रागावर नियंत्रण ठेवा

**तुळ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात ग्रहमान पाहता आपण आपल्या खर्चावर योग्य नियंत्रण ठेवल्यास बऱ्याच गोष्टी साध्य करता येतील. आर्थिक बाजू ठीक असली तरी अनावश्यक खर्चावर मात्र कटाक्षाने निर्बंध ठेवणे हितकारक राहील. आपल्या रागावर नियंत्रण ठेवणे योग्य राहील. वादविवादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. आर्थिक गुंतवणूक सध्या नको. व्यवहारात चढ-उतार संभवतात. हाती घेतलेल्या कामात सफलता मिळेल. नोकरदारांना काहीसा दिलासा मिळेल. प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः मोसमी आजारांपासून सावध राहा. जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. या सप्ताहात आपणास घेत असलेल्या श्रमाचा योग्य परतावा मिळाल्याचे समाधान मिळू शकेल. कलाक्षेत्राला उत्तम काळ असून महिलांना त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. प्रवासाचे योग संभवतात. **महिलांना:** आपल्या बोलण्यावर मात्र योग्य नियंत्रण ठेवणे म्हणजे इतरांची नाराजी होणार नाही. प्रकृतीस्वास्थ्या बाबत अधिक दक्ष राहा, विशेषतः खाण्याची पथ्ये पाळा, उष्णतेच्या व डोळ्यांच्या विकारांबाबत सावध राहा. **शुभ दिनांक** : २५,३०

### प्रयत्न यशस्वी होतील

**वृश्चिक :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण आपल्या उद्योग-व्यवसाय क्षेत्रात काही बदल करणे महत्त्वाचे ठरणार आहे, पर्यायाने आपणावर येणाऱ्या आव्हानांना आपण सहजपणे सामोरे जाऊ शकाल. इतरांच्या मतांना जास्त महत्त्व न देता आपणास योग्य वाटणाऱ्या गोष्टींना प्राधान्य द्या. सरकारी नियमांचे पालन करा. विवाह इच्छुकांच्या आशा पल्लवित होतील आपल्याला नोकरी-व्यवसायात प्रगती करण्याची संधी प्राप्त होईल. आपल्या प्रयत्नांना चांगला प्रतिसाद मिळू शकेल. शेतीविषयक कामांना गती मिळेल. आपल्या स्वभावातील हेकेखोरपणावर मात्र प्रतिबंध करा. प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा व पोटाच्या तक्रारीबाबत सावध राहा. आर्थिक बाजू ठीक राहील.. राजकीय क्षेत्रात यश संभवते. जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. **महिलांना:** प्रलोभनांपासून दूर राहा. प्रकृतीची पथ्ये पाळा, विशेषतः मोसमी आजार व डोळ्यांच्या विकारांकडे लक्ष द्या. वैवाहिक जोडीदाराची अपेक्षित साथ मिळेल. या वेळी जोडीदाराची उत्तम साथ मिळणार असल्याने आपण अपेक्षित गोष्टी साध्य करू शकाल. **शुभ दिनांक** : २६,२९

### कलागुणांना प्रोत्साहन मिळेल

**धनु :** एकूण ग्रहमान पाहता ते आपणास पुष्कळशा बाबतीत साथ देणारे असल्याने आपले कार्य सफल करू शकाल. विरोधकांची धास्ती बाळगण्याचे कारण नाही, ते नामोहरम होतील. वेळ आपल्या बाजूची आहे तारीही नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचे धोरण स्वीकारावे. उगाच आताताईपणा करू नका. विद्यार्थ्यांना अध्ययनात अपेक्षित यश मिळू शकेल. विवाह इच्छुकांच्या आशा-आकांक्षा पल्लवित होतील. कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. प्रकृतीबाबत मात्र सावधानता बाळगा, विशेषतः उष्णतेच्या विकारांबाबत सावध राहा. सरकारी नियमांचे पालन कटाक्षाने करा. आर्थिक बाजू सांभाळा. अनावश्यक खर्च टाळा. प्रवास संभवतो. आपणास हा आठवडा बऱ्याच बाबतीत चांगला जाऊ शकेल. घरात एखादे शुभकार्य होण्याची शक्यता राहील. शेतीविषयक कामांना गती मिळेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. राजकीय क्षेत्रात जम बसवू शकाल. **महिलांना:** कुटुंबाकडून अपेक्षित सहकार्य मिळेल. कौटुंबिक वादविवाद मात्र कटाक्षाने टाळण्याचा प्रयत्न करा, आपले मत देऊ नका. प्रकृतीची काळजी घ्या, विशेषतः मोसमी आजारांपासून सावध राहा. वैवाहिक जोडीदाराशी जुळवून घ्या. **शुभ दिनांक** : २७,२८

### मनासारखी खरेदी कराल

**मकर :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात आपल्या कामकाजात अधिक लक्ष देऊन ते पार पाडण्याचा प्रयत्न करा. सामाजिक क्षेत्रात आपला दबदबा वृद्धिंगत होईल. सरकारी नियमांचे पालन करा. व्यवसायात प्रगतीची संधी मिळेल. प्रलोभने टाळा. आपले या आठवड्यात महत्त्वाची कामे हाती न घेतल्यास, पुढे ढकलल्यास सर्व दृष्टीने हितकारक ठरू शकेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. कामाची जबाबदारी वाढण्याची शक्यता राहील. कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. संगणक व तांत्रिक क्षेत्रातील व्यक्तींना प्रगतीची संधी मिळेल. आर्थिक व्यवहारात मात्र सावधानता बाळगा. मोठी गुंतवणूक करण्याचे टाळा. आपल्या मेहनतीलाच यशाची झालर प्राप्त होण्याची शक्यता असल्याने त्याचा योग्य उपयोग करणे सर्व दृष्टीने ठीक राहील. नोकरदारांनी आपल्या वरिष्ठांशी जुळवून घेण्याचे धोरण स्वीकारणे हितकारक राहील. **महिलांना:** महिलांना त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. मनासारखी खरेदी करू शकाल. प्रवास होण्याची शक्यता राहील. खर्चावर मात्र नियंत्रण ठेवा. प्रकृतीस्वास्थ्य व्यवस्थित असेल. वैवाहिक जोडीदाराची साथ मिळेल. **शुभ दिनांक** :२६,३०

### प्रलोभनात अडकू नका

**कुंभ :**एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात आपल्या श्रमाला योग्य न्याय दिला जाईल. कौटुंबिक वातावरण वादाच्या प्रसंगाने बिघडणार नाही याची दक्षता घ्या. नको त्या प्रलोभनात अडकू नका. गुरूकृपेचा लाभ घेता येईल. सरकारी नियमांचे पालन कटाक्षाने पाळा आपण प्रत्येक बाबतीत सकारात्मक विचाराने वागण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल. नोकरदारांना दिलासा मिळू शकेल. आर्थिक बाबतीत तज्ञांचा सल्ला घेतल्याशिवाय व्यवहार करू नये. विशेषतः महिलावर्गाला त्यांच्या कलागुणांना चांगला वाव मिळेल. प्रवासाचे योग संभवतात. धार्मिक कार्यात अधिक रस घ्याल. आप्तेष्टांशी सामंजस्याने वागणे योग्य राहील. खाण्याची पथ्ये पाळा व नियमित व्यायाम करा. कोणाशीही नाराजी पत्करू नका. जोडीदाराची साथ मिळेल. **महिलांना:** एकंदर ग्रहमान पाहता एकूण वातावरण चांगले राहिल्याने आपणास घरघुती वातवरणाचा आनंद घेता येईल. आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवल्यास गैर समजापासून दूर राहू शकाल. गोड बोलून आपला कार्यभाग साधण्याचे धोरण स्वीकारणे योग्य राहील. **शुभ दिनांक** :२७, ३१

### मोठी गुंतवणूक कराल

**मीन :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात शेवटी ग्रहस्थिती दर्शवते की, हा काळ मागील काळाच्या तुलनेत उत्तम वेळ सिद्ध होईल. ही गोष्ट याकडे इशारा करते की, कुटुंबातील समर्थनामुळे तुम्ही अधिक आत्मविश्वासाने काम कराल आणि या वेळात तुम्ही जास्तीत जास्त आर्थिक व सामाजिक लाभ मिळवण्यात यशस्वी होऊ शकाल. विवाह योग्य या राशीतील जातक या काळात आपल्या विवाहाची गोष्ट सुरु होतांना पाहू शकेल. विवाहित जातक आपल्या मुलांचे शिक्षणाच्या क्षेत्रात प्रदर्शन पाहून आनंदी होतांना दिसतील. कुठला ही निर्णय घेण्याच्या आधी कार्यस्थळी आपल्या वरिष्ठां सोबत समस्यांवर चर्चा करूनच निर्णय घ्या असे करणे तुमच्यासाठी फायदेशीर सिद्ध होईल. या राशीतील जातकांसाठी सप्ताहाची सुरुवात चांगली असेल. **महिलांना:** या काळात तुम्ही त्या गोष्टींकडे अधिक कल ठेवाल जे तुमच्यासाठी खरंच गरजेचे आहे मग ते तुमचे नाते असो किंवा पैसा! हेच कारण आहे की, या काळात तुम्हाला आपल्या कमाईला सुरक्षित करण्यासाठी मोठी गुंतवणूक करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.ज्यामुळे आपल्या घरात आर्थिक सुरक्षा मिळू शकेल. **शुभ दिनांक** :२९,३१

# बाजारपेठ देशभक्तीच्या साहित्यांनी सजली

**| तळा | प्रतिनिधी |**

भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपला असल्याने तिरंगी झेंडे, सदरे, रिबीन, बिल्ले तिरंगा रांगोळी, तिरंगी पताका अशा विविध देशभक्तीच्या साहित्यांनी तळा बाजारपेठ सजली आहे. पूर्वी ग्रामपंचायत, तहसील कार्यालय, पंचायत समिती कार्यालय, राष्ट्रध्वज फडकविण्याची परवानगी होती. मात्र गेल्या बारा वर्षांपासून सर्वत्र राष्ट्रध्वज फडकविण्याची परवानगी देण्यात आल्याने प्रजासत्ताक दिनी शर्टवर लावण्यासाठी, गाडीवर लावण्यासाठी लहान मुलांना रॅलीमध्ये हातात धरण्यासाठी हे साहित्य लागत असल्याने बाजारपेठेत चार दिवस आधीपासूनच साहित्य विक्रीसाठी उपलब्ध झाल्याने नागरिकांकडून खरेदी करण्यासाठी गर्दी होत असल्याचे चित्र पहायला मिळाले.



## रुग्णांसाठी वार्षिक सहल

**पनवेल :** पनवेल शहरातील नामांकित बिरमोळे हॉस्पिटलतर्फे डायलिसिसच्या रुग्णांसाठी वार्षिक सहल वरसोली–अलिबाग येथे नुकतीच आयोजित करण्यात आली. सहलीमध्ये डायलिसिसचे रुग्णांचे काळजीवाहू नातेवाईक व डायलिसिस विभागाचे कर्मचारी यांनी भाग घेतला. समुद्र किनारी भटकंती करत सर्वांनी मनमुराद आनंद लुटला. या सहलीमुळे रुग्णांमध्ये सकारात्मकता वाढवून नवी उमेद आल्याचे जाणवले. या सहलीच्या आयोजनासाठी डॉ. बी. जे. बिरमोळे, डॉ. नीलम नलावडे यांचे मार्गदर्शन लाभले. सहलीच्या यशस्वितेसाठी बिरमोळे हॉस्पिटलमध्ये रश्मी पोतनीस व डायलिसिसचे सर्व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन

**| उरण | प्रतिनिधी |**

बाळासाहेब ठाकरे यांच्या १०० व्या जयंतीनिमित शुक्रवारी (दि.२३) रोजी माजी आ. मनोहरशेठ भोईर, नरेश रहाळकर, गणेश शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत उरण शहर शाखेतर्फे अभिवादन करण्यात आले. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे जन्म शताब्दी वर्ष असल्यामुळे विविध सामाजिक, शैक्षणिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. यावेळी विनोद म्हात्रे, गणेश म्हात्रे, दिलीप रहाळकर, परमानंद करंगुटकर, सूर्यकांत दरणे, वंदना पवार, मेघा मेस्त्री, विना तलरेजा, माधुरी चव्हाण, रूपा सिंग, लता राठोड, शादाब शेख, मुमताज भाटकर, सायरा खान, सलीमा शेख, यशस्वी म्हात्रे, घनश्याम कडू, महेश वर्तक, मिलिंद भोईर, इस्माईल शेख, अनिल पाटील, कमलाकर पाटील, रमाकांत म्हात्रे, अप्पा पठारे, मेहता, उमेश गीध, शिवा म्हात्रे, ओमकार घरत, कुणाल पाटील, संदेश पाटील, अभिषेक भोईर, फतेह खान, सर्वेश गवस, सिद्धेश म्हात्रे आदी उपस्थित होते.



### जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की मौजे डोलवी दबाबा, ता.पेण, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल त्याचे नमुद विद्यमान मालक श्री.रणजीत यशवंत डाऊर व इतर यांच्याकडून रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे

| गाव | सर्व्हे नं./गट नं./ हि.नं. | क्षेत्र हे.आर | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| डोलवी दबाबा | ४९/२ | ०.६४.५०<br>पो.ख.०.०२.५०<br>०.६७.०० | ९.१९ |

वरील संपुर्ण क्षेत्रापैकी ०.२७.०० हे.आर.इतके क्षेत्र आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी रग्रवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी

टिपः सदर नोटीस ही खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

सही

ठिकाण : पेण
दि. २५/०१/२०२६

**ॲड हेमा ज.पाटील (घोडिंदे)**
पेण पोलीस स्टेशन जवळ तहसिल ऑफिस आवारात, कोटआळी पेण
मो. नं.९८२२०३०३८९

### जाहीर नोटीस

याद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे वैजनाथ, ता.कर्जत, जि. रायगड येथील खालील सविस्तरपणे नमूद केलेली जमिन मिळकत आमचे अशिल श्री.वसंत कृष्णाजी पाटील आणि सौ.मंजुषा वसंत पाटिल यांनी सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक श्री.दत्तात्रय कोंडीबा गुरव यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नं.. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकार रुपये-पैसे |
|---|---|---|---|
| ३७ | ७ | ०.१७.७०<br>पो.ख.०.०४.३०<br>एकूण ०.२२.०० | २.१२ |

वरील वर्णन केलेल्या जमिन मिळकतीचे बाबतीत कोणाचाही दान, गहाण, फरोक्त, अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, कायदेशीर हितसंबंध, करार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत योग्य त्या कायदेशीर लेखी पुराव्यासह खालील नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे.

वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असल्याचे समजून आमचे अशिल कायमस्वरूपी खरेदी करण्याचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. २५/०१/२०२६.

सही /-
**ॲड.पूजा गणेश म्हसे**
ऑफीस नं.४, रिजेन्सी प्लाझा, निर्माण नगरी, नेरळ (पू.) ता.कर्जत, जि.रायगड
मो. ८०८७४३०४४७

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमच्या अशिलांनी खाली वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. अभिजित वसंत भगत रा.मुरुड, ता.मुरुड, जि.रायगड यांचेकडून कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरविलेला आहे सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्र.व उपविभाग | क्षेत्र (चौ.मी.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| मुरुड, ता.मुरुड | २७६/५/३ | २-३०-००<br>(बिनशेती) | २५७-०० |

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स् मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (७) सात दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यांत येईल, हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दि. २४-०१-२०२६.

**ॲड.जयप्रकाश म.मिठागरी**
जुनी पेठ, राणी लक्ष्मीबाई रोड, ता.मुरुड-जंजिरा, जि.रायगड.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमूद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली बिनशेती जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मौजे पाली, ता.सुधागड, जि.रायगड येथील जमीन मिळकती.**

**मिळकतीचे वर्णन :-**

| जमिन मालकाची नांवे | गट/स.नं./प्लॉट नं. | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| १)श्री.संदेश संतोष चोरघे<br>२)श्री.समीर संतोष चोरघे | ५१/अ/प्लॉट/८ | २-७१-०० | २७-१० |

तरी वरील मिळकतींच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन त्यासंबधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबध नाही व असल्यास त्यानी ते जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

दिनांक :- २५/०१/२०२६

**खरेदीदारांचे लेखक**
**राठोड एण्ड एसोसिएट्स**
२८६ अ, राठोड सदन ऑफिस नं.७, पाली, ता.सुधागड,जि.रायगड. ४१०२०५
मो. ९०२८६३५३३७/९२७०३६७२९०

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकती त्यांच्या मालकाकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहेत.

**मौजे-आसल, तालुका-कर्जत, जि.-रायगड येथील बिनशेती मिळकती**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | प्लॉट नं | क्षेत्र आर चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| दिपक ॲकनूर राव | ८५ | १ | ३०० | ३०.०० |
| | ८५ | २ | ३७१ | ३७.१० |
| | ८५ | ३ | ३५० | ३५.०० |
| | ८५ | ४ | ३१२ | ३१.२० |
| | ८५ | ५ | ३७५ | ३७.५० |
| | ८५ | ६ | ३१२ | ३१.२० |
| | ८५ | ७ | ३१२ | ३१.२० |
| | ८५ | ८ | ३२८ | ३२.८० |
| | ८५ | ९ | ३२५ | ३२.५० |
| | ८५ | १० | ३३७ | ३३.७० |
| | ८५ | ११ | ३३७ | ३३.७० |
| | ८५ | १२ | ३१८ | ३१.८० |
| | ८५ | १३ | ३७५ | ३७.५० |
| | ८५ | १४ | ३७५ | ३७.५० |
| | ८५ | १५ | ३९० | ३९.०० |
| | ८५ | १६ | ४०० | ४०.०० |
| | ८५ | १७ | ४२५ | ४२.५० |
| | ८५ | १८ | ४५० | ४५.०० |
| | ८५ | १९ | ४९० | ४९.०० |
| | ८५ | २० | ४०० | ४०.०० |
| | ८५ | २१ | ४२५ | ४२.५० |
| | ८५ | २२ | ४५५ | ४५.५० |
| | ८५ | २३ | ३४१ | ३४.१० |
| | ८५ | २४ | ३०२ | ३०.२० |
| | ८५ | २५ | ३०५ | ३०.५० |
| | ८५ | २६ | ३२८ | ३२.८० |
| | ८५ | २७ | ३१७ | ३१.७० |
| | ८५ | २८ | ३२९ | ३२.९० |
| | ८५ | २९ | ३१८ | ३१.८० |
| | ८५ | ३० | ३२४ | ३२.४० |
| | ८५ | ३१ | ३३६ | ३३.६० |
| | ८५ | ३२ | ३५० | ३५.०० |
| | ८५ | ३३ | ३५० | ३५.०० |
| | ८५ | ३४ | ३६० | ३६.०० |
| | ८५ | ३५ | ३३० | ३३.०० |
| | ८५ | ३६ | ३०० | ३०.०० |
| | ८५ | ३७ | ३३२ | ३३.२० |
| | ८५ | ३८ | ३०० | ३०.०० |
| | ८५ | ३९ | ३०६ | ३०.६० |
| | ८५ | ४० | ३०० | ३०.०० |
| | ८५ | ४१ | ३१५ | ३१.५० |
| | ८५ | ४२ | ३१५ | ३१.५० |
| | ८५ | ४३ | ३१५ | ३१.५० |
| | ८५ | ४४ | ३४६ | ३४.६० |
| | ८५ | ४५ | ३३६ | ३३.६० |
| | ८५ | ४६ | ३१२ | ३१.२० |
| | ८५ | ४७ | ३०४ | ३०.४० |
| | ८५ | ४८ | ३०६ | ३०.६० |
| | ८५ | ४९ | ३०६ | ३०.६० |
| | ८५ | ५० | ३१२ | ३१.२० |
| | ८५ | ५१ | ३०४ | ३०.४० |
| | ८५ | ५२ | ६४४ | ६४.४० |
| | ८५ | ५३ | ३२० | ३२.०० |
| | ८५ | ५४ | ३५० | ३५.०० |
| | ८५ | ५५ | ३४४ | ३४.४० |
| | ८५ | ५६ | ३५७ | ३५.७० |
| | ८५ | ५७ | ३२८ | ३२.८० |
| | ८५ | ५८ | ३५८ | ३५.८० |
| | ८५ | ५९ | ३६४ | ३६.४० |
| | ८५ | ६० | ३५७ | ३५.७० |
| | ८५ | ६१ | ०.८३९७ | ०.०० |
| | ८५ | ६२ | ३३४ | ०.०० |
| | ८५ | ६३ | ७८० | ७८.०० |

सदरच्या बिनशेती मिळकती या वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील बिनशेती मिळकती ह्या तदंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या बिनशेती मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन, कुलमुखत्यारपत्रे ताबेकब्जा वगैरे कोणतेही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दि. २५/०१/२०२६

**स्वप्निल बाबूराव देशमूख**
ऑफिस पत्ता. शॉप नं.२४, मार्वल क्षिप्रा मुद्रे खुर्द ता.कर्जत, जि.रायगड
८८३०५६०९६२

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे मांडवणे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक नामदेव लक्ष्मण गायकवाड यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मौजे.मांडवणे, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमिन मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| ३६ | २ | ०-३०-०० | ०-२८ |

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १४(चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. २४/०१/२०२६
मो. ९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**समीर हरिश्चंद्र लाड**
शॉप नं०२, साई सावली अपार्टमेंट, कर्जत दिवाणी कोर्टासमोर, कर्जत, रायगड

### जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची सामाईक मिळकत तिचे मालक श्री.हरिश्चंद्र इसरी यादव रा नागुर्ले व इतर १ यांच्याकडुन कायमचे खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे नांगुर्ले, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं २७/३ एकुण क्षेत्र ०.८४.०० गुंठे पैकी ०.०२८.०० गुंठे विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशिलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक : २५/०१/२०२६

**ॲड देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

### निविदा सुचना

**विषय : पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि. पेण या इमारतीवर सौर लाईट लावणे.**

सदर कामासाठी सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा दिनांक ३०/०१/२०२६ पर्यंत पेण प्राथमिक शिक्षक सह. पतपेढी कार्यालय पेण येथे सायं ३.०० वाजेपर्यंत पोहचतील अशा बेताने पाठवाव्यात.

| अ.क्र. | तपशिल | कि.वॅट | इसारा | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि.पेण येथे पहिला मजला इमारतीवर सौर लाईट लावणे. | ५ किलो वॅट | ५०००/- | ३ महिने |
| २. | सौर लाईट लावणे तळमजला व दुसरा मजला. | ३ किलो वॅट | | ३ महिने |

**अटी व शर्ती**

१) सोलर लाईट कंपनीकडून परफॉरमन्स वॉरंटी किमान २५ वर्षाची असावी.
२) सोलर लाईट बसविण्यासाठी स्ट्रक्चर हॉट डीप चे असावे .
३) सोलर लाईट बसविणाऱ्या कंपनीचा किमान ५ वर्षाचा अनुभव असावा.
४) सोलर लाईट बसविण्यासाठी पेमेंट अकाउंट वर केले जाईल. बील जी.एस टी असावे
५) उच्च दर्जाचे utl कंपनीचे सोलर पॅनल असावे.

**श्री.नितिन वसंत वर्तक** सचिव, **श्री.विनोद हसूराम जोशी** मानद सचिव, **श्री.दत्ताराम अर्जून शिर्के** व्हा. चेअरमन, **श्री.महेंद्र गुणाजी शिर्के** चेअरमन

**पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि. पेण**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, श्री.तिलकधारी बीजनारायण शर्मा, (नवीन भाडेपट्टेदार/नवीन भूखंडधारक/परवानाधारक), (२२.५टक्के योजनेअंतर्गत वाटप केलेल्या भुखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे लिहिण्यात आले आहे) यांच्या मालकी हक्कातील मौजे पुष्पकनगर (वहाळ), तालुका पनवेल, जिल्हा-रायगड येथील गावठाणामधील शासन सर्वेक्षणानुसार स्थलांतरीत होणारे भुखंड, हे मे. सिडकोने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ अनुशांगिक कामासाठी संपादीत करून सदर बांधकामाबद्दल नुकसान भरपाईपोटी व पुनःस्थापनेसाठी त्यांच्या लाभांत पुर्नवसन आणि पुर्नस्थापना योजनेअंतर्गत भुमी संपादन निवाडा/ सिडको फाईल क्रं.ULV-ICOGD-१८१, दिनांकः२८/११/२०१६ रोजीच्या वाटपपत्रानुसार श्री.अनंता दशरथ मढवी आणि श्री.गोमाजी दशरथ मढवी यांना वाटप केले आणि मे. सिडकोमार्फत त्यांच्या लाभांत सदरहु भुखंडासंदर्भातील भाडेपट्टा करारनामा हा दिनांक : ०५/०९/२०१८ रोजी निष्पादित करुन सहदुयम निबंधक पनवेल यांच्या कार्यालयामध्ये दस्तऐवज अनु.क्र.पवल-४/१०८७४ /२०१८ दिनांक ०७/०९/२०१८ आणि श्री.तिलकधारी बीजनारायण शर्मा, (नवीन भाडेपट्टेवार/ नवीन भूखंडधारक/परवानाधारक) त्यांच्या लाभांत सदरहु भुखंडासंदर्भातील त्रिपक्षीय करारनामा दिनांकः३१/१०/२०२३ रोजी निष्पादित करुन सहदुयम निबंधक पनवेल यांच्या कार्यालयामध्ये दस्तऐवज अनु.क्र. पवल -२/१९१८५/२०२३ रोजी नोंदणी करण्यात आला असून सदरचा भुखंड हा नवीन भाडेपट्टेदार/नवीन भूखंडधारक/परवानाधारक यांनी सिडकोची पुर्व परवानगी घेऊन हस्तांतरित करण्याचे ठरविले आहे.

तरी या जाहीर नोटीशीने असे कळविण्यात येते की, खाली उल्लेखित भुखंडाचे आमचे अशिल मेसर्स. सुपरहोमस् डेव्हलपर्स एलएलपी आणि त्यांचे भागीदार आणि (१) श्री.जयवंत गोमाजी मढवी, (२)(अ) श्री. शेखर अनंता मढवी, (ब) श्री.तुषार अनंता मढवी, यांच्या लाभांत हस्तांतरण करुन घेण्यासंदर्भातील सिडकोमार्फत हस्तांतरण परवानगी मिळाल्यानंतर त्या क्षेत्रासंदर्भात आमचे अशिलांनी त्रिपक्षीय करारनामा करण्याचे ठरविले आहे, सदर भुखंडाचे हस्तांतरण करण्यापुर्वी, सदर भुखंड हा निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित, निजोखमी व कुठल्याही प्रकारचा न्यायालयीन दावा प्रलंबित नाही असे असणे आवश्यक आहे, उपरोक्त भुखंडावर अन्यथा कोणाचा कोणत्याही प्रकाराचा हक्क, हितसंबध म्हणजेच कोणत्याही व्यक्तिला, देवाणघेवाण, हक्क, व्याज, वाटा, लीज, उप-लीज, भाडेकरार, उप-भाडेपट्टा, परवाना, धारणाधिकार, गहाण, शुल्क, भार, व्यवसाय, करार, ट्रस्ट, आराम, भेट, वारसा, मृत्युपत्र, देखभाल, ताबा, विकास हक्क, राइट ऑफ वे, आरक्षण, करार, लिस पेंन्डस, कौटुंबिक व्यवस्था/सेटलमेंट, कोणत्याही न्यायालयाचा हुकुम किंवा आदेश, एल्एल्पी, भागीदारी किंवा इतर कोणत्याही स्वरूपाचे त्यांचे आक्षेप असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांचे आत त्यांचे आक्षेप लिखित स्वरूपात पुराव्यानिशी खालील पत्त्यावर नोंदवणे आवश्यक आहे. या मिळकतीबाबत लिखित स्वरूपात कोणतेही दावे स्वाक्षरीसह, दस्तऐवजासह प्राप्त झाले नाहीत, कोणांकडूनही, कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत आली नाही, तर वर नमूद केल्याप्रमाणे नोटीस कालावधीत त्याच्या/तिच्या/त्यांच्या दाव्याचे समर्थन केले जाणार नाही आणि त्यावर विचार ही केला जाणार नाही तर आमचे अशिल सदरहु भुखंडासंदर्भातील सिडकोची पूर्व परवानगी घेऊन व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी, कळावे,

**भूखंड/मिळकतीचे वर्णन**
**भुखंड कमांकः३२७, सेक्टर-२४, क्षेत्रफळ ४४९.८८ चौ. मी.,**
**मौजे पुष्पकनगर (वहाळ), तालुका पनवेल, जिल्हा रायगड**

**मिळकतीच्या चतुः सिमा खालील प्रमाणेः-**

| | | |
|---|---|---|
| उत्तरेस | : | भुखंड क्रमांकः ३२८ |
| दक्षिणेस | : | भुखंड क्रमांकः ३२६ |
| पुर्वेस | : | ११.०० मीटर रूंद रस्ता |
| पश्चिमेस | : | भुखंड कमांकः ३२२/३२३ |

**सही : वकील अजीत व्ही. सिंह (खरेदीदारासाठी)**
अजीत सिंह ॲण्ड असोसिएटस्
(वकील व कायदेशीर सल्लागार)
पत्ताः १६/१७, १ मजला, साई चेंबर,
प्लॉट नं.४४, सेक्टर-११, सी.बी.डी.बेलापूर,
नवी मुंबई, ता.आणि जि. ठाणे
फोन नं. ०२२- ४००२६१४२/९८२०५२३०७७
ई मेल - ajeet_advocate@yahoo.co.in
दिनांकः ../०१/२०२६

### CHANGE OF NAME

My old name was FARUKH SHAH & I have changed this name to FAROOQ BANNU SHAH from today onwards. I will be recognized by my new name i.e FAROOQ BANNU SHAH as per Notary Sr.No. 111-2026/22.01.2026 Before Notary Public, Alibag-Raiagd.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे म्हात्रोळी, ता.अलिबाग जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत संबंधित मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं | क्षेत्र(हे.आर.) | आकार (रू.पैसे) | मालकांची नावे |
|---|---|---|---|---|
| म्हात्रोळी | १२८ | जिरायत ०-२५-३०<br>पो.ख.०-००-८०<br>एकूण ०-२६-१० | ०.४७ | श्री.संजीव नारायण नायर |

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. सदर मिळकती संदर्भात आमचे आशिलांनी मिळकतीचे विद्यमान मालक यांचेसोबत खरेदी-विक्री संदर्भात बोलणी करून सदर मिळकत खरेदी करण्याचा निर्णय घेतलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा त्याचे कोणत्याही भागावर कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, रस्त्याच्या वहिवाटीचे हक्क, वारसा हक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहीत लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कोणाचेही कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व त्यांच्यावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हितसंबंध व हक्क नाही. अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभात सोडून दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कोणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि.२५/०१/२०२६

सही/-
**ॲड विक्रांत विनायक पाटील**
म्हात्रोळी, अलिबाग-रायगड
मो.नं.८३२९४६१५४०/९४०३६५१४३६

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **बोअरवेल, विहीरीसाठी** इलेक्ट्रॉनिक मशीनद्वारे अचूक भूजल संशोधन म्हात्रे - ९२२६७६६१२९/९७६५४६५६६६
- **शुभमूर्हूत विवाह मंडळ** अलिबाग शाखेत सर्वजातीय प्रथमद्वितीय वधूवंराची नावनोंदणीसाठी ९२२६७६६१२९/९७६५४६५६६६
- **प्रथम, पुर्नविवाह** सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा, पनवेल गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- **बागायती वाडी विक्री** -१३ गुंठे (घर, नारळ, सुपारी, विहीर) @ २७ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक - सुहास माळी गाव-थळ, गुंजाळ आळी, अलिबाग मो. - ८७७९८०५३५३
- **नागाव मधील हॉटेलमध्ये काम** करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे . रिसेप्शनिस्ट, कॉन्टिनेंटल, मेन्टेनन्स १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल – ७५५९१८४६१२
- **जन्नावार हॉस्पिटल अलिबागमध्ये कामासाठी मावशी** व नर्सची जागा आहे. (Vacancy) Contact No 7798034509
- **आवश्यक : सहाय्यक कर्मचारी खाजगी बंगल्याच्या** साफसफाईसाठी आणि देखभालीसाठी जबाबदार आणि विश्वासू व्यक्तींची आवश्यकता आहे. दैनंदिन घरकाम, सामान्य देखभाल आणि पाहुण्यांच्या व्यवस्थेत मदत करणे या कर्तव्यांमध्ये समाविष्ट आहे. पूर्णवेळ/राहणे पसंत. पूर्वीचा अनुभव इष्ट. स्थानः नागाव, संपर्क : ९८२०४१४८११ बैठकीची तारीख २४ ते ३१ जानेवारी २०२६ सकाळी ११ वाजल्यापासून सुरू.
- **For Sale House of Mrs Megha** Shende Plot No. 446, S.No.252, MHADA COLONY, PEN-402107 Near Goa Highway Plot Area: 104 sq mtr Construction : Stilt + 2 floors (total construction area 1040 Sq feet) House Name : "KRISHNA- PRABHA" Contact : 9167791556
- **दिशा पॅथॉलॉजी लॅब –रेवदंडा व चोंढी** येथील कलेक्शन सेंटरसाठी ब्लड कलेक्शन टेक्निशियन /नर्स/फ्लेबोटॉमिस्ट (अनुभवी)/फ्रेशर उमेदवार चालतील) संपर्क : ८९९९१६१५१९
- **अलिबागमधील शॉपमध्ये** काम करण्यासाठी मुलगा अथवा मुलगी हवी आहे. संपर्क : ९४२२६९६२३५

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी– सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५




### राशीभविष्य

- **मेष** : अपेक्षित उद्दिष्ट साध्य करू शकाल. कलाकारांच्या कला-गुणांचं कौतुक होईल. स्पर्धेत यश मिळेल.
- **वृषभ** : नव्या संधींचा लाभ घ्यावा. व्यवसायात मनाजोगी उलाढाल होईल. यंत्र, वाहनांबाबत काळजी घ्या.
- **मिथुन** : चैनीकडे अधिक ओढा राहील. आर्थिक व्यवहारात फसवणूक संभवते. बोलताना विचार करावा.
- **कर्क** : भावंडांकडून दिलासा मिळेल. विवाहाबाबत तडजोडीची भूमिका ठेवावी. अपेक्षित रक्कम हाती येईल.
- **सिंह** : महत्त्वाचे करार लांबणीवर टाकावे. मध्यस्थी वा ओळखीतून कामं होतील. व्यवसायात चिंता राहील.
- **कन्या** : स्वमताग्रह टाळायला हवा. वास्तुविषयक कामांसाठी पाठपुरावा करावा लागेल. विचारानं रहावं.
- **तूळ** : कोणावर अधिक विसंबून राहू नका. स्वकर्तृत्त्वातून अपेक्षित साध्य करू शकाल. प्रकृतीस जपावं.
- **वृश्चिक** : छोट्या-मोठ्या प्रवासाचे योग आहेत. अधिक उत्साहानं कार्यरत रहाल. अनपेक्षित घटना घडतील.
- **धनु** : भागीदारी व्यवसायात सामंजस्यानं रहावं. महत्त्वाचे करार होतील. मुलांच्या प्रश्नात दिलासा मिळेल.
- **मकर** : कौटुंबिक समस्यांचा ताण राहील. अधिक खर्च करावा लागेल. शैक्षणिक बाबतीत समाधान लाभेल.
- **कुंभ** : व्यवसायात बदलाचा विचार होईल. प्रलंबित कामं मनाजोगी होतील. ज्येष्ठांचं पुरेसं सहकार्य लाभेल.
- **मीन** : परिस्थिती पाहून निर्णय घ्यावेत. आर्थिक व्यवहारात काळजी घ्यावी. विद्यार्थ्यांची प्रगती होईल.

## २५ जानेवारी

दिनविशेष

**१९५४** : साम्यवादी चळवळीचे थोर नेते मानवेंद्रनाथ रॉय यांचं निधन.

**२००१** : स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर आणि उस्ताद बिस्मिल्ला खान यांना भारतरत्न प्रदान.

**२००२** : एअरमार्शल अर्जुनसिंग भारतीय हवाईदलाचे पहिले 'मार्शल ऑफ द एअर फोर्स' बनले.

**२०१४** : प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर आणि योगविद्येचा प्रचार-प्रसार करणारे बी.के.एस.अय्यंगार यांना पद्मविभूषण पुरस्कार जाहीर.

## आरोग्यमंत्र — उपयुक्तता लक्षात घ्या

अनेकजण अळूची भाजी, अळूच्या वड्या चवीने खाल्ल्या जात असल्या तरी हे पदार्थ दररोजच्या स्वयंपाकात नसतात. मात्र यातले औषधी गुणधर्म जाणून घेतले तर तुम्ही दररोज याच्या सेवनाला प्राधान्य द्याल. चवदार अळू आरोग्यासाठी अत्यंत लाभदायक आहे. आयुर्वेदातही याचे महत्त्व सांगतले आहे. शरीरासाठी याचे अनेक फायदे आहेत. याच्या सेवनाने आरोग्यविषयक अनेक समस्यांपासून सुटका होते. तेव्हा अळूच्या भाजी, वडीचे कोणते फायदे आहेत याविषयी जाणून घेऊ या.



* ब्लड प्रेशर – अळूची भाजी वा वड्यांच्या सेवनाने ब्लड प्रेशर नियंत्रित राहते. तणावाची समस्या कमी होते.
* वजन – यातील फायबरमुळे मेटाबॉलिज्म सक्रिय राहते. यामुळे वजन नियंत्रणात राहते.
* पोटाच्या समस्या – अळू पोटांच्या समस्यांवर गुणकारी आहे. याच्या सेवनाने पचनक्रिया सुरळीत होते.
* चेहऱ्यावरील पुरळ – अळूची पाने जाळून त्याची राख नारळाच्या तेलामध्ये मिसळून लावल्यास चेहऱ्यावरील पुरळ नाहीसे होण्यास मदत होईल.
* दृष्टी – यातील व्हिटॅमिन ए मुळे डोळ्यांचे आरोग्य चांगले राहते. डोळ्यांच्या मांसपेशी मजबूत होतात.
* सांधेदुखी – सांधेदुख असल्यास दररोज अळूच्या पानांचे सेवन केल्याने आराम मिळेल.

## थोर शास्त्रज्ञ — काय सांगतो सिद्धांत?

गॅलिलिओने गतीला गणितबद्ध केलं. इंग्लंडच्या आयझॅक न्यूटनने गॅलिलिओच्या योगदानाचं विश्लेषण केलंच, परंतु आपल्या अत्युच्च प्रतिभेद्वारे सर्व गतिशास्त्राची मूलभूत आणि सर्वकष स्वरूपात मांडणी केली. गॅलिलिओने आपल्या संशोधनात फेकलेल्या वस्तूला मिळणाऱ्या गतीचा विचार केला होता. फेकलेल्या वस्तूला मिळालेली गती हा दोन गतींचा परिणाम असतो. यातली एक गती म्हणजे वस्तू ज्या दिशेला फेकली त्या दिशेने असणारी स्थिर आणि सरळ गती तर दुसरी गती म्हणजे जमिनीच्या दिशेला असलेली वाढती गती. न्यूटनने या दोन्ही गतींचं अत्यंत मुद्देसूद आणि सविस्तर विश्लेषण केलं. न्यूटनच्या निष्कर्षांनुसार, एखाद्या वस्तूवर बलाचा वापर होत नाही तोपर्यंत तिच्या गतीत कोणताही बदल होत नाही. गतीत बदल होऊ देण्यास विरोध करणाऱ्या या गुणधर्माला वस्तूचं जडत्व म्हटलं जातं. वस्तूच्या गतीत जितका जास्त बदल करायचा असतो, तितकं त्याचं बलही अधिक असतं. तसेच जास्त वस्तुमान असणाऱ्या वस्तूच्या गतीत बदल करायला लागणारं बलही अधिक असतं. न्यूटनच्या या निष्कर्षांनी ॲरिस्टॉटलच्या तत्त्वज्ञानावर अखेरचा घाव घातला. **(क्रमश:)**

## स्टाईल स्टेटमेंट — ट्रेंडी बनारसी अनारकली

* वरचा भाग प्लेन ठेऊन प्रिंटेड घेर असणारा अनारकली शिवून घ्या. सूटची लांबी थोडी कमी ठेवा. त्यावर पलाझो घाला. कॉन्ट्रास्ट कलरच्या दुपट्टयाने हा लूक खुलवा.
* बनारसी अनारकली कुर्त्यावर त्याच रंगाचा दुपट्टा घेण्याची आवश्यकता नाही. कॉन्ट्रास्ट दुपट्टाही त्यावर खूप छान दिसतो. इतकंच नाही तर वेगळ्या फॅब्रिकचा दुपट्टाही चालून जाईल. मिक्स ॲण्ड मॅचचं तंत्र जमलं तर तुम्ही खूप छान दिसाल. बनारसी अनारकली सूट शिवून घेताना कुर्त्याच्या बाह्या फार लहान करू नका. अशा सूट्सवर लांब बाह्या शोभून दिसतात.
* बनारसी अनारकली शॉर्ट कुर्त्यावर मॅचिंग प्लेन स्कर्टही घालता येईल. त्यावर बॉर्डरवाला प्लेन दुपट्टा घ्या. स्टेटमेंट रिंग्ज, टिकली आणि मोकळे केस अशा स्टाईलने लूक खुलवा.

### पंचांग

**रविवार, २५ जानेवारी २०२६**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
माघ शु. ७ **(रथसप्तमी)**,
चंद्रराशी : मीन,
नक्षत्र : रेवती, योग : सिद्ध,
सूर्योदय ७.१६, सूर्यास्त ६.२६

### फॉरवर्डस

**एक़ हीं बात इन हाथों क़ी लकीरों में अच्छी हैं...**

**धोखा देतीं हैं मग़र रहतीं तों हाथ में ही हैं...!**

### वेगळ्या वाटा

भविष्यात सीईओ बनण्याची स्वप्नं बघणाऱ्या विद्यार्थ्यांनी स्वत:ला तयार करण्याची गरज आहे.

* कॉलेजमध्ये असताना तुम्ही स्वत:तील नेतृत्त्वगुण विकसित करू शकता. इतकंच नाही तर कॉलेजमध्ये व्यवस्थापन कौशल्याला धार आणण्याची संधीही मिळते. त्यामुळे ग्रुप प्रोजेक्ट्स, प्रेझेंटेशन करताना आपण उद्योजक असल्याचा विचार करा. व्यवसायातली एखादी परिस्थिती समोर ठेऊन प्रोजेक्ट्स करा.
* सामाजिक कार्य करा. या कामांमुळे खूप चांगला अनुभव मिळतो.

**(क्रमश:)**

## फॅशन पॅशन — लेदर जॅकेटने खुलवा लूक

दोस्तांनो, थंडीचा कडाका कायम आहे. त्यामुळे ऊबदार कपडे गरजेचे ठरत आहेत. थंडीसाठी आवर्जून लेदर जॅकेटची खरेदी केली जाते. परंतु हे महागाचं लेदर जॅकेट टिकेल ना, हा प्रश्नही पडतो. आता या टिप्स फॉलो करा आणि बिनधास्त लेदर जॅकेट विकत घ्या.



* लेदर जॅकेट घातल्यावर फुगीर होता कामा नये. त्यामुळे थोडं छोट्या साईझचं जॅकेट घ्या. लेदरच्या प्रकारानुसार साईझ ठरवा. योग्य फिटिंगवालं जॅकेट तुमचं व्यक्तिमत्त्व खुलवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतं.
* लेदर जॅकेटचा रंग तुमच्या व्यक्तिमत्त्वाला शोभणारा असावा. टॅन लेदर जॅकेट्स योग्य वाटत नसतील तर हे रंग घेऊ नका. त्याऐवजी काळं किंवा कॉफी ब्राउन रंगाचं जॅकेट घ्या. गडद रंग आवडत असतील लाल रंगाचं जॅकेट खरेदी करायला हरकत नाही.
* फॉर्मल आणि कॅज्युअल यापैकी एका जॅकेटची निवड करावी. बॉम्बर जॅकेट, बायकर जॅकेट, रेसर जॅकेट हे प्रकार बाजारात मिळतात. बायकर जॅकेटला बऱ्याच ठिकाणी चेन लावलेली असते. आकर्षक बटणंही असतात. बॉम्बर जॅकेटमुळे स्पोर्टी लूक मिळतो.

### खेचाखेची

**शोध**

खूप डोकं चालवल्या नंतर मी हा शोध लावला की,

आपण बिना चपलेचं चालू शकतो,

पण...

चप्पल आपल्याशिवाय चालू शकत नाही!

### वेगळं काही

राजस्थानातील जोधपूरमधल्या मेहरानगड या किल्ल्यातून आपण पाकिस्तानचा बराच भाग बघू शकतो. हा किल्ला ५०० वर्षं जुना असून फाळणीदरम्यान पाकिस्तानने त्यावर ताबा मिळवण्याचा प्रयत्न केल्याचं म्हटलं जातं. १९६५ च्या भारत-पाक युद्धातही सर्वात आधी मेहरानगड किल्ल्याला लक्ष्य करण्यात आलं. जोधपूरचे तत्कालीन शासक राव जोधा यांनी १२ मे १४५९ मध्ये या किल्ल्याचा पाया रचला तर महाराज जसवंत सिंह यांनी तो बांधून पूर्ण केला. किल्ल्याच्या भिंती जवळपास १० किलोमीटर लांब आहेत. त्यांची उंचीही जास्त आहे. किल्ल्याला चार दरवाजे असून आत बरेच भव्य महाल, त्यांचे नक्षीकाम केलेले सुंदर दरवाजे तसंच जाळीदार खिडक्या पहायला मिळतात.

## सौंदर्यसाधना — फेशियलचा हिट ट्रेंड

चेहऱ्याची काळजी घेणाऱ्या महिला नित्यनेमाने फेशियल करतात. फेशियलचे विविध प्रकार आहेत. त्यात भर पडली आहे 'मायक्रोकरंट फेशियल'ची. हा सौंदर्य क्षेत्रातला हिट ट्रेंड म्हणता येईल. यामुळे चेहरा उजळतो. सुरकुत्या, डाग कमी झाल्याने त्वचा नितळ, टवटवीत दिसू लागते. फेशियलच्या या प्रकारामुळे चेहऱ्याच्या स्नायूंना उभारी मिळते. त्वचेचा पोत सुधारतो.



या फेशियलची सुरूवात 'क्लिंजिंग' म्हणजे चेहऱ्याच्या स्वच्छतेने होते. यानंतर भिंग घेऊन डॉक्टर त्वचेची तपासणी करतात. मग वाफ घ्यावी लागते. वाफेमुळे त्वचा मुलायम होते आणि धूळ, घाणीमुळे बंद झालेली छिद्रं उघडतात. उपकरणांच्या सहाय्याने मृत त्वचा काढल्यानंतर चेहऱ्याला मसाज केला जातो. मग चेहऱ्यावर मास्क लावून वाळल्यावर काढून टाकतात. शेवटी चेहऱ्याला टोनर किंवा बर्फ लावला जातो. यानंतर त्वचा उजळते शिवाय त्वचेचं शुद्धिकरण झाल्याने चेहऱ्याला होणाऱ्या रक्तप्रवाहात सुधारणा होते. हे फेशियल वयाच्या पंचविसाव्या वर्षानंतर करावं. गरोदरपणात ही प्रक्रिया करू नये. या प्रक्रियेनंतर काही काळपर्यंत चेहऱ्याला 'एक्सफोलिएट' म्हणजे मृत त्वचा काढण्याची प्रक्रिया करू नये.

## सुडोकू ५८


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | | | ८ | | | | | ३ |
| २ | | ८ | | १ | | | ६ | |
| | | ९ | | | २ | १ | | ७ |
| | ५ | | | ८ | | | | |
| | ८ | | ६ | ३ | ५ | | २ | |
| | | | | ४ | | | ९ | |
| ८ | | ७ | ३ | | | ६ | | |
| | २ | | | ६ | | ४ | | ९ |
| ५ | | | | | ९ | | | २ |

टीप -
* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ५७ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | ५ | ३ | २ | ६ | ४ | १ | ९ | ७ |
| १ | २ | ४ | ३ | ९ | ७ | ६ | ८ | ५ |
| ७ | ९ | ६ | ५ | १ | ८ | ३ | २ | ४ |
| २ | ८ | १ | ४ | ७ | ९ | ५ | ६ | ३ |
| ४ | ६ | ५ | ८ | २ | ३ | ७ | १ | ९ |
| ३ | ७ | ९ | ६ | ५ | १ | ८ | ४ | २ |
| ९ | ४ | ८ | ७ | ३ | ६ | २ | ५ | १ |
| ६ | ३ | २ | १ | ४ | ५ | ९ | ७ | ८ |
| ५ | १ | ७ | ९ | ८ | २ | ४ | ३ | ६ |

## शब्दकोडे क्रमांक ५८



**आडवे शब्द :-**
१) आनंदावर विरजण घालणे (वा.प्र.)
६) एक सुगंधी वनस्पती
९) सोन्याचा धागा
१०) साटेलोटे
११) शोभणारा
१२) तेजस्वी, सतेज
१४) कालू, शिंपला
१५) किंमत
१६) कसोटी, पारख
१९) आरास, मुद्दाम केलेला देखावा
२१) कैफी पदार्थ
२२) वल्लरी
२४) मातीचा कण
२६) लहान मूल
२७) जमिनीला खड्डा पाडण्याचे एक हत्यार
२८) नूतन
२९) चुलता-चुलती
३१) बसण्याची फळी
३२) ओढ्यावरील पूल
३४) तुझा
३५) आपला परका असा भेद
३७) देशाचे नाणे
३९) चिंता
४०) रोखलेली नजर
४१) मनाला वाटणारी भीती
४३) पदर
४५) बारा महिने
४६) महिना
४८) शपथ
५०) सावध
५१) समाजातील प्रतिष्ठा, गळ्यामागील अवयव
५२) सुरक्षित
५४) मऊ
५५) पडदा सरकविण्याचा धावता दोरा
५७) गेरू
५८) अटीतील दोन शब्द
६०) सोन्याचा वेल,सोन्याची साखळी
६२) तरतूद
६४) सोन्याचा पर्वत
६५) भाजी
६६) रसवान

**उभे शब्द :-**
१) करमणूक
२) थंड
३) गणितातील दोन प्रमुख क्रिया
४) अहंकार
५) सुंदर तरुणी
६) ठोक! हाण!
७) एक आदिवासी जमात
८) तांदळाची एक जात
१०) पंख
११) सज्जन, प्रामाणिक
१२) एक चतुर्थांश भाग
१३) श्रीकृष्णाचे एक नाव
१५) स्तुती करणारा
१६) परीक्षा घेणारा, तपासनीस
१७) धुणे, स्वच्छ करणे
१८) स्वकीय नसलेला
२०) माराची उमटलेली खूण
२१) खूप मोठा
२३) खिडकीची काच
२५) आयातकर
२७) लवकर, वेगाने
३०) कावळ्याचे ओरडणे
३१) पातक
३२) सतर्क, दक्ष
३३) खेकसणारा, तोंडाळ, मूर्ख
३५) जीवंत असेतोवर
३६) जिनसांची यादी
३८) आपादमस्तक
४२) उपदेश
४४) (रोगाची) चाहूल
४७) मनाचा झालेला ग्रह
४८) वजन, बोजा
४९) पंकज
५१) वर्षाव, भडीमार
५२) सूट
५३) चपलता, नवा जोम
५४) शूर पुरुष
५६) वेलाला येणारी एक भाजी, लाडकाच्या विरुद्ध
५७) कार्य, काज
५९) दालचिनी
६०) बोलताना किंवा गाताना लांबविलेला सूर
६१) धातूचा धागा
६३) ज्या प्रमाणे.

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



**देशातील लोकशाही दीर्घकाळ अबाधित राहण्याला भारतीय जनता नेहमीच कारणीभूत ठरली. लोकशाहीने दिलेला मतदानाचा अधिकार भारतीय जनतेने योग्य रितीने वापरला आहे. प्रसंगी इंदिरा गांधी, अटलबिहारी वाजपेयी, डॉ. मनमोहन सिंग यांना बाहेरचा रस्ता दाखवण्यातही जनता कमी पडली नाही. अशी जनता लोकशाहीच्या दृष्टीने महत्त्वाची ठरते. या जनतेनेच हे प्रजासत्ताक खऱ्या अर्थाने जिवंत ठेवले आहे.**

# प्रगल्भ प्रजासत्ताकाच्या मुळाशी...

प्रा.उल्हास बापट

आपला देश १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला; पण आपली राज्यघटना २६ जानेवारी १९५० रोजी अस्तित्वात आली. म्हणजे खऱ्या अर्थाने आपला देश या दिवशी प्रजासत्ताक झाला. भारतीय लोकशाहीमध्ये तीन दिवसांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. एक म्हणजे १५ ऑगस्ट १९४७ अर्थात स्वातंत्र्यदिन. दुसरा म्हणजे २६ नोव्हेंबर १९४७. या दिवशी घटना समितीने राज्यघटना स्वीकारली आणि तिसरा दिवस म्हणजे २६ जानेवारी १९५०. या दिवशी राज्यघटना प्रत्यक्षात आली. १५ ऑगस्ट १९४७ रोजी देश स्वतंत्र झाला त्यावेळी देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी केलेले भाषण खूप गाजले होते. मार्टिन ल्यूथर किंगचे 'आय हॅव अ ड्रीम' हे भाषण विसाव्या शतकातले सर्वोत्कृष्ट भाषण मानले जाते, त्याचप्रमाणे स्वातंत्र्य मिळाल्यावर म्हणजे १४ ऑगस्टच्या रात्री १२ वाजता पंडित नेहरूंनी संसदेच्या कॉन्स्टिट्यूशन हॉलमध्ये (या हॉलला आता सेंट्रल हॉल असे म्हटले जाते) केलेले 'ट्रिस्ट विथ डेस्टिनी' हे भाषण विसाव्या शतकातले अद्वितीय भाषण मानले जाते. त्या भाषणात त्यांनी रात्री बारा वाजता संपूर्ण जग झोपलेले असताना आपला जन्म होतोय आणि आपण स्वतंत्र हवेचा पहिला श्वास घेतोय, असे म्हटले होते. या वेळेपासून आपल्या लोकशाहीला सुरूवात झाली. ही लोकशाही गेली ७८ वर्षे अव्याहत आणि यशस्वी पध्दतीने सुरू आहे. आशिया खंड, आफ्रिका खंड तसेच दक्षिण अमेरिका हे तिसरे जग म्हणून ओळखले जाते. या तिसऱ्या जगात १३० ते १३५ देश येतात. या सर्व देशांमध्ये भारत हा लोकशाही टिकवून असणारा एकमेव देश आहे. अन्य कोणत्याही देशांमध्ये लोकशाही फार काळ टिकून राहू शकली नाही. एक तर त्या ठिकाणी हुकूमशाही आली किंवा तेथील राज्य सैन्याच्या ताब्यात गेलं. त्यादृष्टीने भारत हा एकमेव अपवादात्मक देश राहिला.

'लोकशाहीचा ऱ्हास हा तिसऱ्या जगाचा नियम आहे आणि भारत हा या नियमाला अपवाद आहे' असे अमेरिकेतील प्रसिध्द राजकीय विश्लेषक रूपर्ट इमरसन यांनी म्हटले आहे. आपल्याकडे जनतेने निवडून दिलेली अठरावी लोकसभा आहे, पंधरावे पंतप्रधान आहेत, पंधरावे राष्ट्रपती आहेत, २६ वे मुख्य निवडणूक आयुक्त आहेत, ५३ वे सरन्यायाधीश आहेत. अशी अनेक संवैधानिक पदांची नावे घेता येतील. हे सगळे एकाच राज्यघटनेखाली चालले आहे. १९४७ पासून आपण हळूहळू उत्क्रांत होत गेलो आहोत. हे लक्षात घेतल्यास भारतात दीर्घकाळ लोकशाही कायम राहण्यामागे कोणती कारणे आहेत, असा प्रश्न मनात येणे साहजिक आहे. खरे तर भारतात दीर्घकाळ लोकशाही कायम राहण्याचे यश एका ठराविक बाबीमुळे आहे असे म्हणता येणार नाही. त्यासाठी काही महत्त्वाच्या बाबी कारणीभूत आहेत. त्यांचा वेध प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने घेणे उचित ठरेल. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे या देशाच्या घटना समितीने उत्तम राज्यघटना तयार केली. तो या लोकशाहीचा पाया राहिला. त्यामुळे भारतात लोकशाही कोलमडली नाही. त्या अर्थाने अखंड लोकशाहीचे श्रेय राज्यघटनेला जाते. आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे भारताला स्वातंत्र्यानंतर सुरूवातीच्या काळात पंडित नेहरूंसारखा उदारमतवादी नेता लाभला. तिसरी महत्त्वाची बाब म्हणजे देशातील सर्वोच्च न्यायालयाने राज्यघटनेला बरोबर अर्थ लावला. नागरिकांच्या मुलभूत हक्कांच्या संरक्षणावर भर दिला. प्रसंगी सरकारवर काही बंधने घातली. त्यामुळे या देशात लोकशाही टिकून राहण्यास मदत झाली. दुसऱ्या बाजुने पाहता देशातील निवडणूक आयोगाने आजवर नि:पक्षपातीपणे आपले कर्तव्य पार पाडले. त्यामुळेच निवडणूक आयोग पक्षपाती आहे, असा आरोप झालेला नाही. जनतेचा निवडणूक आयोगावर विश्वास आहे. देशातील लोकशाही दीर्घकाळ अबाधित राहण्यामागील आणखी एक कारण म्हणजे भारतीय जनता. आजवर या जनतेने लोकशाहीने दिलेला मतदानाचा अधिकार योग्य रितीने वापरला आहे. प्रसंगी इंदिरा गांधी, अटलबिहारी वाजपेयी, डॉ. मनमोहन सिंग यांना बाहेरचा रस्ता दाखवण्यातही जनता कमी पडली नाही. जनता सरकारला दूर सारते हेही वेळोवेळी दिसून आले. अशा पध्दतीचे शहाणपण असलेली जनता लोकशाहीच्या दृष्टीने महत्त्वाची ठरते. देशाची राज्यघटना २६ नोव्हेंबर १९४९ रोजी घटना समितीमध्ये स्वीकृत करण्यात आली. त्यावेळी केलेल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, २८४ विद्वान सदस्यांनी दोन वर्षे ११ महिने आणि सात दिवस कष्ट करून ही राज्यघटना लिहीली आहे. जगभरातल्या विविध देशांच्या राज्यघटनांचा अभ्यास करून प्रत्येक राज्यघटनेतल्या सर्वोत्कृष्ट तरतुदींचा समावेश आपल्या राज्यघटनेत करण्यात आला आहे. उदाहरण द्यायचे तर अमेरिकेच्या घटनेतून आपण 'मूलभूत अधिकार' घेतले, इंग्लंडच्या घटनेतून 'संसदीय लोकशाही' घेतली, जर्मनीच्या घटनेतून 'इमर्जन्सी प्रोव्हिजन्स' घेतल्या, ऑस्ट्रेलियाच्या घटनेतून सत्ता विभाजनाच्या याद्या घेतल्या, आयर्लंडच्या घटनेतून काही तत्वे घेतली. अशी सर्वंकष राज्यघटना तयार झाल्यानंतर आपण ती स्विकारली. पण २६ नोव्हेंबर १९४९ रोजी त्यातील फक्त १६ कलमे लागू झाली.

संपूर्ण राज्यघटना (३९५ कलमे आणि ८ परिशिष्ट) २६ जानेवारी १९५० रोजी लागू झाली आणि आपण रिपब्लिक म्हणजेच प्रजासत्ताक झालो. प्रजासत्ताक राष्ट्राचा प्रमुख जनतेने निवडून दिलेला असतो. त्यामुळे आपण प्रजासत्ताक आहोत, अमेरिका प्रजासत्ताक आहे, जर्मनी, फ्रान्सही प्रजासत्ताक आहेत. पण इंग्लंड प्रजासत्ताक नाही. तिथे लिमिटेड मोनार्की म्हणजेच राजेशाही आहे. संपूर्ण राज्यघटना लागू झाल्यानंतर आजवर १०६ राज्यघटना दुरुस्त्या होऊन आता राज्यघटनेत साधारणत: ४७० कलमे आणि १२ परिशिष्टं झालेली आहेत. या वर्षी आपण ७७ वा प्रजासत्ताक दिन साजरा करत आहोत. राज्यघटना हा आपल्या लोकशाहीचा पाया आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी २०१४ मध्ये पहिल्यांदा संसदेत आले त्यावेळी त्यांनी सर्वप्रथम सेंट्रल हॉलमध्ये ठेवलेली राज्यघटनेच्या 'डेकोरेटिव्ह एडिशन'ची प्रत कपाळाला लावली आणि म्हणाले, हाच भारताचा धर्मग्रंथ राहील आणि आपल्याला त्याप्रमाणेच चालायचे आहे. आजपर्यंतचे राजकारणी प्रत्यक्षात तसे चालले की नाही हा वेगळा भाग आहे.



उपसभापतीची नियुक्ती आणि पक्षांतरबंदी कायद्याच्या बाबतीत आपल्या राजकारण्यांनी सोयीस्कर पळवाटा काढून राज्यघटनेने घालून दिलेल्या आदर्शांपासून आपण दूर जात असल्याचे दाखवून दिले आहे. पण प्रत्यक्षात कोणीही तसे करता कामा नये.

१४ एप्रिल १९७३ रोजी केशवानंद भारती खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या १३ न्यायाधीशांच्या खंडपीठाने (आजवरचे सर्वात मोठे खंडपीठ) राज्यघटना दुरुस्तीद्वारे घटना बदलता येईल पण तिची सेक्युलॅरिझम, फेडरलिझम, इक्वॅलिटी, ज्युडिशियल इंडिपेंडन्स, फ्री अँड फेअर इलेक्शन्स यासारखी मूलतत्वे बदलता येणार नाहीत, असा महत्त्वपूर्ण निर्णय दिला. हे बदलल्यास घटनादुरुस्तीही घटनाबाह्य ठरते. पण इंदिरा गांधींच्या काळात बदललेला कलम ४२ चा काही भाग, राजीव गांधींच्या काळात बदललेला कलम ५२ चा काही भाग आणि नरेंद्र मोदींनी केलेली ९९ वी घटनादुरुस्ती सर्वोच्च न्यायालयाने घटनाबाह्य ठरवली आहे.

थोडक्यात, राज्यघटना हा आपल्या लोकशाहीचा आत्मा आहे. या घटनेचे पालन करूनच गेल्या ७८ वर्षांमध्ये भारताने मोठी प्रगती केली आहे.

आजवरच्या प्रत्येक पंतप्रधानाने या प्रगतीत भर घातली आहे. नेहरूंनी लोकशाहीचा पाया रचला. इंदिराजींनी बांगलादेश युद्ध जिंकून भारताच्या सेनेची शक्ती जगाला दाखवून दिली. १९९१ मध्ये आपण दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर असताना मनमोहनसिंगांनी महत्त्वाची पाऊले ऊचलून २०१४ पर्यंत भारताला जगातल्या पहिल्या दहा आर्थिकदृष्ट्या प्रगत देशांमध्ये नेऊन ठेवले. मोदींनी देशाला दहाव्या क्रमांकावरून चौथ्या क्रमांकावर आणले. या घटनेला धरून आपण पुढे गेलो तर माझी खात्री आहे की २०१४ पर्यंत भारत नक्कीच जागतिक महासत्ता होईल. **

# 'पावनेर...!!'



धनंजय शेटये

पतेऱ्याचो धग...

थंडीचा महिना सुरु झाला होता. कडाक्याची थंडी पडायला सुरूवात झाली होती. दातावर दात कडकडत होते. पांघरुण बाजूला सारून दूर होण्याची हिंमत होत नव्हती. बाहेर दाट धुके पसरले होते. प्रभात समयी झाडांच्या फांद्यावरुन दवंबिंदूचे साठलेल्या पाण्याची टपटप चालू होती. वातावरणात मोहकता जाणवत होती. गोळवण गावच्या सभोवारच्या वनराईनं वेढलेल्या वृक्षांच्या आलिंगनात विसावा घेणार निसर्गरम्य गाव. अतिशय विलोभनीय वाटत होते. सकाळी लवकर उठायची पहिल्यापासूनची सवय होती. अगदी सहजच फेरफटका मारायला बाहेर पडलो. पदलो टेमकार पालापाचोळा गोळा करुन शेकोटी पेटवण्याच्या तयारीत होता. पालापाचोळा म्हणजे 'पतेरो' आणि त्याची शेकोटी म्हणजे 'धग' थंडीच्या दिवसामध्ये गावातील लोक थंडीच्या त्रासातून बचाव करण्यासाठी असा पतेऱ्याचा धग पेटवतात. पदल्याने मला हाक मारली,

''ये.. ये मारे.. इतक्या बेगिना उटान खय चललस?? वायचं धग घे...जाशीत कंटाळान'' नाय ओ आबानू मी रोजच ह्या टायमाक उटतय....असोच फिरान येवया म्हटला ''मी चालत चालत बोलत होतो.

''आज तरावट्याचो 'पावनेर' आसा ... पोळयो आणि ऊसळ खावकं जातलस की नाय?'' नोव्हेंबर ते डिसेंबर या महिन्यांच्या दरम्यान शेतीमध्ये हाताची पेरणी करण्याच्या सामुदायिक कामाला 'पावनेर' असे म्हणतात. भाताच्या रोपांची लावणी करण्यासाठी एका ठराविक उंचीची रोपे लागतात. त्या रोपांच्या वाफामध्ये पेरणी करावी लागते. ही पेरणी करण्यासाठी बहुतेक शेतकरी मिळून एकत्र येतात सांघिक काम करतात. तेथे मजूरीचा काही प्रश्नच शिल्लक राहत नाही. प्रत्येकाला एकमेकाच्या 'पावनेराला' जावे लागते. या पावनेराला गावातील शेतकरी आपल्या बैलजोडीला घेऊन पावनेराला यायचं असतं.'जोत' घेऊन येणारे शेतकरी पावनेरला येताना एखाद्या सहलीला जातात तेवढ्याच उत्साहात असतात.सामुदायिक काम सामुदायिक अल्पोपहार हे सर्व आपल्या जीवलग शेतकऱ्यांच्या सोबत निसर्गरम्य परिसरात...'अनलिमिटेड फुड'...



पावनेराचे खास मेनू म्हणजे खमंग झणझणीत ऊसळ आणि 'पोळया'. आता या पोळया म्हणजेच 'आंबोळ्या' होय. दक्षिण भारतीय भाषेत या पोळयांना, आंबोळ्यांना 'डोसा' संबोधले जाते.

खमंग ऊसळ आणि आंबोळ्या त्याही हव्या येवढ्या घ्यायच्या.... हे सर्व गुलाबी थंडीत शेतात पेरणी करतांना शेताच्या कडेला निसर्गरम्य परिसरात...!! एक वेगळीच मजा असते.

आज होबळात तरावट्यांच्या शेतात पावनेर होता. खमंग ऊसळ आणि पोळया शेतात घेऊन कोसले काका पोहोचले होते. शेताच्या जवळ असलेल्या वडाच्या झाडाच्या सावलीत सर्व शेतकरी जोतकार एकत्र आले. बैलांनाही काही काळ विश्रांती.सदा चसूरकराने सर्व बैलांच्या पुढ्यात गवत आणून टाकले.

''आबल्या पेज आधी खेका खातस मेल्या? ह्यो पोळयो कोण तुझो बापूस खातलो हा?? नुसत्या पेजेच्या पानयान पोटाची टीमकी फुगवू नुको... ह्या केलला उरला ना तर काकी तरावटीन रागावतली हा....'' भाई पारसेकर पाटाच्या पाण्यात पाय धुतना बोलत होता.

''नाय रे लय सोस लागलो... आणी सकाळचो तंबाखू पण बरो नाय लागललो वायच.... दुकानदारान ए वन तंबाखू हा असा सांगलल्यान...''

''अरे तेचे सगळेच वस्तू ए वन आसतत'' शंकरो मध्येच बोलला.

''आबल्या आता हयता सगळा बन कर.... कॅन्सर नाय तर हप्याल होवन मरशीत....एकदाचो ... आमका होयो आसस...समाजला'' पावनेर दणक्यात पार पडला मग रोपे मोठी होईपर्यंत 'लाट' किंवा 'सारिक' लावून पाणी द्यावे लागते. पेरणी आटोपल्यानंतर कावळे, कबुतरे, पोपट या पक्षांपासून पेरणी केलेल्या धान्याचा बचाव करण्यासाठी जोरजोरात पत्र्याचे डबे बडवावे लागतात. कधी कधी शेतकरी एखादा कावळा मारुन तो शेतातील एखाद्या काठीला बांधून ठेवला जातो. मग थोडा वेळ का असेना?? पण पाखरे दचकतात. **


# आगळा वेगळा मौलिक ग्रंथ

# ग्रेट लीगल ल्यूमिनरी

अनिल वैद्य

हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रकाशन संस्था, मुंबई यांनी प्रकाशित केलेला आगळा-वेगळा आणि मौलिक इंग्रजी ग्रंथ आहे. मराठीत त्याचे योग्य शीर्षक ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर : कायदेव्यवसाय व कायदे शिक्षणातील योगदान'' असे होईल. हा ग्रंथ सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश डॉ. यशवंत चावरे यांनी अत्यंत सखोल संशोधनातून साकारला आहे. हा ग्रंथ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे व्यक्तिमत्त्व केवळ भारतीय संविधानापुरते मर्यादित न ठेवता, एक उच्च कोटीचे विधिज्ञ, कुशल वकील आणि कायद्याच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन घडवणारे क्रांतिकारक म्हणून उलगडून दाखवतो. गौरवपर लेखनाऐवजी न्यायालयीन साक्ष, ऐतिहासिक दस्तऐवज आणि केस-लॉच्या चौकटीतून बाबासाहेबांचा विधीइतिहास मांडणे ही या ग्रंथाची सर्वात मोठी ताकद आहे.

या दोन खंडांच्या ग्रंथाला भारताचे माजी सरन्यायाधीश न्या. भूषण गवई यांची प्रस्तावना लाभली आहे. ही प्रस्तावना केवळ प्रशंसात्मक नसून, डॉ. आंबेडकरांचे वकिलीतील कौशल्य, न्यायालयीन कामकाज आणि कायदे शिक्षणातील योगदान यांना आजही अपेक्षित शैक्षणिक स्थान मिळालेले नाही, ही ऐतिहासिक उणीव हा ग्रंथ भरून काढतो, असा ठाम न्यायिक निर्वाळा त्यातून व्यक्त होतो. त्यामुळे या ग्रंथाला विलक्षण विश्वासार्हता व अकादमिक अधिष्ठान प्राप्त होते.




लेखकाच्या मनोगतातून हा ग्रंथ घडवण्यासाठी केलेली तपश्चर्या स्पष्ट होते. जुन्या न्यायालयीन नोंदी, दिवाणी व फौजदारी खटल्यांची कागदपत्रे, आदेश, युक्तिवाद, साक्षी व पत्रव्यवहार यांचे संकलन व शिस्तबद्ध विश्लेषण हे अत्यंत कष्टाचे कार्य लेखकाने न्यायाधीशाची शिस्त व संशोधकाची प्रामाणिकता जपत पूर्ण केले आहे. ग्रंथाची सुरुवात डॉ. आंबेडकरांच्या बॅरिस्टर म्हणून मुंबई उच्च न्यायालयातील नोंदणीपासून होते. करवीर संस्थानाकडून प्राप्त वकिली सनद, त्यांचे कायदेव्यवसायातील योगदान, तसेच त्यांनी हाताळलेल्या महत्त्वाच्या खटल्यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला आहे. देशाचे दुश्मन प्रकरण, रघुनाथ धोंडो कर्वे प्रकरण, तसेच महाड चवदार तळे प्रकरण या खटल्यांमधून त्यांची अभिव्यक्ती स्वातंत्र्य, सामाजिक सुधारणांची भूमिका आणि कायदेशीर तर्कशक्ती अधोरेखित होते. महाड चवदार तळे प्रकरण हा ग्रंथाचा केंद्रबिंदू असून, तो सामाजिक आंदोलनापेक्षा नागरी हक्कांचा कायदेशीर लढा कसा होता हे मूळ न्यायालयीन दस्तऐवजांच्या आधारे सिद्ध करतो.

गव्हर्नमेंट लॉ कॉलेज, मुंबई येथे प्राध्यापक व प्राचार्य म्हणून बजावलेली त्यांची भूमिका, अध्यापन पद्धती आणि विधी शिक्षणाविषयीची दृष्टी स्वतंत्र प्रकरणात मांडली आहे. एलएलबी अभ्यासक्रम पूर्णवेळ असावा, तर्कशास्त्र व मानसशास्त्र विधी शिक्षणात समाविष्ट करावे, तसेच ग्रंथालयांची शास्त्रीय रचना असावी, अशा त्यांच्या सूचनांचे आजही मोठे शैक्षणिक महत्त्व आहे. खंड १ चा उत्तरार्ध फौजदारी खटल्यांवर केंद्रित आहे. गंभीर सत्र खटले, फौजदारी अपिले व पुनर्विचार अर्जांमधून डॉ. आंबेडकरांचे फौजदारी कायद्यातील प्रभुत्व स्पष्ट होते. उलट तपासणी, पुराव्यांचे मूल्यमापन आणि प्रक्रिया-विषयक पकड यांचे प्रभावी नमुने या ग्रंथातून वकिलांना शिकायला मिळतात. दिनकरराव जवळकर मानहानी प्रकरणातील केवळ पाच-दहा मिनिटांचा पण निर्णायक युक्तिवाद, ठाण्याच्या खुनाच्या खटल्यातील आत्मविश्वासपूर्ण भूमिका, तसेच ''व्यक्तीचे चारित्र्य नव्हे तर अन्याय महत्त्वाचा'' ही त्यांची नैतिक भूमिका या सर्व उदाहरणांतून डॉ. आंबेडकर हे तत्त्वनिष्ठ वकील होते हे ठळकपणे समोर येते. त्यांनी कधीही पक्षकारांकडे फीबाबत तगादा लावला नाही, हेही त्यांच्या चारित्र्याचे द्योतक आहे.

खंड २ अधिक तांत्रिक व सखोल असून, कायद्याच्या विद्यार्थ्यांसाठी तो प्रत्यक्ष केस-लॉसारखा उपयोगी ठरतो. महाड चवदार तळे प्रकरणातील संपूर्ण न्यायालयीन नोंदी, साक्षी, आदेश, अपिले व निकाल यांमुळे सामाजिक इतिहास न्यायालयीन पुराव्यांच्या प्रकाशात नव्याने समोर येतो. एकूणच ग्रेट लीगल ल्यूमिनरी हा ''संविधानाच्या आधी न्यायालयात घडलेला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा इतिहास'' आहे. हा ग्रंथ वाचण्यासाठी नव्हे, तर अभ्यास, संदर्भ आणि न्यायासाठी वापरण्यासाठी आहे. बार असोसिएशन्स, विधी महाविद्यालये, न्यायालये आणि सार्वजनिक वाचनालयांमध्ये या ग्रंथाचा समावेश त्यांच्या बौद्धिक उंचीत मोलाची भर घालणारा ठरेल. असा दस्तऐवजाधारित विधीइतिहास लिहिणे ही इतिहासाशी प्रामाणिक राहण्याची धाडसी बौद्धिक कृती आहे. यासाठी लेखक डॉ. यशवंत चावरे यांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि त्यांच्या पुढील लेखनासाठी हार्दिक शुभेच्छा. संपर्क करा. डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे विधी क्षेत्रातील कार्य देशासमोर उजागर केले त्या साठी आमचे मित्र न्या. डॉ यशवंत चावरे सेवानिवृत्त न्यायाधीश यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करतो! त्यांच्या पुढील लेखनास शूभेच्छा व्यक्त करतो! **

**पुस्तकाचे नाव :डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रकाशन संस्था**
**लेखक : डॉ. यशवंत चावरे**
**११०१, श्री स्मरण सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित,**
**सेक्टर ११, फेज १, तळोजा, नवी मुंबई.**
**मोबाईल क्रमांक : ९४२०२१२८२७**

# "सुखरूप सुटका"





(The Great Rescue of a Lesser Sand Plover)

**डॉ. राजेंद्र चांदोरकर**

भूतदया... म्हणजे सर्व प्राणीमात्रांवर, थोडक्यात सांगायचे तर सर्व सजीवांवर करुणा ठेवणे. त्यांच्याविषयी सहानुभूती व प्रेम बाळगणे, त्यांच्या वेदना कमी करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणे. जखमी किंवा पीडित प्राणीपक्ष्यांना अन्न, पाणी, वैद्यकीय मदत व आश्रय देणे, हेच भूतदयेचे खरे स्वरूप. या संकल्पनेशी निगडित आलेला एक हृद्य अनुभव येथे नमूद करीत आहे.

वरसोली बीच हे आमचे मॉर्निंग वॉकसाठी रोजचे, हक्काचे आणि आवडते ठिकाण. समोर पसरलेला अथांग समुद्र, सोबतीला सुरुंची हिरवीगार वनराई आणि स्थलांतरित तसेच स्थानिक पक्ष्यांचे थवेहे दृश्य मनाला विलक्षण प्रसन्न करून जाते. पंचेचाळीस मिनिटांचा हा सकाळचा फेरफटका केवळ शरीरालाच नव्हे, तर मनालाही ताजेतवाने करून जातो.

समुद्राच्या पाण्यावर तरंगणारे The Great Rescue of a Lesser Sand Plover व Black Backed Sea Gulls आणि वाळूवर चपळाईने धावणारे Lesser Sand Plovers यांचे वेगवेगळ्या कोनांतून फोटो घेणे, हा या मॉर्निंग वॉकमधील एक सुखद योगायोगच असतो.

असेच काही फोटो घेत असताना आज एक अनपेक्षित आणि अस्वस्थ करणारे दृश्य दिसले. लांबून एक चिमुकला Lesser Sand Plovers वाळूवर आडवा-तिडवा होत तडफडताना जाणवला. सभोवती थोडेसे पाणी असल्याने तो कदाचित पंख भिजवत किंवा आंघोळ करत असावा, असे प्रथम वाटले. पण जसजसे आम्ही जवळ गेलो, तसतसे लक्षात आले की काहीतरी गंभीर घडले आहे.

मी स्मिताला म्हणालो, "हा चिमुकला अडकलाय आपल्याला त्याची सुटका करायला हवी."

ती म्हणाली, "ठीक आहे, पण तो नक्की कशात अडकला असेल?"

आजूबाजूला जाळे दिसत नव्हते. समुद्रात सहसा कोळी बांधवांची जाळी दिसतात, पण आज तशी काहीच चिन्हे नव्हती. जवळ जाऊन पाहिले असता लक्षात आले की, त्या सॅन्ड प्लॉव्हरचे दोन्ही पाय एका दोऱ्यात घट्ट अडकले होते. तो दोर समुद्रात दूर पसरलेल्या जाळ्याच्या एका तुटलेल्या धाग्याचा भाग होता. त्या दोऱ्यातून सुटण्यासाठी तो चिमुकला जीवाच्या आकांताने धडपडत होता पण ती धडपड निष्फळ ठरत होती.

परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन आम्ही त्याची सुटका करण्याचा प्रयत्न सुरू केला. जाळ्याचे धागे अत्यंत कडक... सुटता सुटेना! अखेरीस दातांनी ते धागे तोडत त्या चिमुकल्याला मोकळे केले. रेस्क्यू पूर्ण झाल्यानंतर तो पक्षी पुन्हा मोकळ्या हवेत उडताना आणि वाळूवर चपळपणे धावताना दिसावा, अशी तीव्र ओढ मनात होती. वेळ आली होती त्याच्या सुखरूप सुटकेची. मी आणि स्मिता, दोघांनीही त्याला अलगद हातात घेतले. त्याच्या पाठीवरून मायेचा हात फिरवला आणि त्याला मुक्त केले. मात्र, त्याक्षणी एक भयंकर सत्य समोर आले- त्याचे खरे शत्रू त्याच्यावर झडप घालण्यासाठी टपून बसले होते, याची आम्हाला कल्पनाही नव्हती.

पाच-सहा कावळे आणि तितकेच कुत्रे त्या बिचाऱ्या Lesser Sand Plovers वर तुटून पडायला सज्ज होते. एका कुत्र्याने तर झडप घालून जवळजवळ त्याला गिळंकृत करण्याचाच प्रयत्न केला. पण, प्रसंगावधान राखत मी त्याला हाकलून लावले आणि त्या पक्ष्याला पुन्हा माझ्या सुरक्षित संरक्षणात घेतले.

थोडा वेळ थांबून पुन्हा त्याला सोडले, तर दोन कावळ्यांनी त्याच्यावर हल्ला चढवला. हा जीवघेणा प्रसंगही मी यशस्वीपणे परतवला. तेव्हाच जाणवले- तो चिमुकला पक्षी अत्यंत थकलेला, घाबरलेला आणि धक्क्यात गेलेला होता. उडण्याची ताकद, चालण्याचे बळ आणि मनोबलसर्वच हरपल्यासारखे वाटत होते. त्यामुळे आमचा मॉर्निंग वॉक पूर्ण होईपर्यंत मी त्याला हातातच धरून ठेवले. त्याच्याशी बोलत राहिलो, कपड्याच्या उबेत त्याला गरम केले, थोडेसे पाणी पाजले. आजूबाजूला कुत्रे किंवा कावळे नाहीत, याची खात्री केली.तो सावरला आहे, त्याचे मनोबल परत आले आहे, याची खात्री झाल्यावरच त्या Lesser Sand Plovers ची अखेर सुखरूप सुटका केली. दिवसाची सुरुवातच सकाळी-सकाळी एका सत्कार्याने झाल्याच्या आनंदात, समाधानाने आम्ही घरी परतलो. **

## विलक्षण वाचनीय, प्रेरक

# जॉर्ज ऑर्वेल

**पुस्तक परीक्षण**
**प्रा. शाम जोगळेकर**
मो. ९२७३३४३१७७

जॉर्ज ऑर्वेल, करून जावे असेही काही... हा विशाखा पाटील लिखित चरित्रग्रंथ, पुण्याच्या राजहंस प्रकाशनने प्रकाशित केला आहे. "ऑर्वेल समजून घेताना...." मध्ये, विशाखा पाटील यांनी, जीवनाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर ऑर्वेल यांची ओळख कशी होत गेली, हे सविस्तरपणे मांडले आहे. ऑर्वेल यांच्या चरित्र ग्रंथाद्वारे, त्यांचे व्यक्तित्व आणि साहित्य यांचा संगम साधण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. जॉर्ज ऑर्वेल यांची जीवनकहाणी, पंधरा प्रकरणांतून वाचकांसमोर उलगडते. या पुस्तकाचे आगळेवेगळे मुखपृष्ठ, सुप्रसिद्ध चित्रकार सुभाष अवचट यांचे आहे.

एरिक ब्लेअर यांनी १९३२ मध्ये पहिल्या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी दोन प्रकाशकांकडे आपले हस्तलिखित पाठवले होते. परंतु ते स्वीकारले गेले नाही. तिसरा प्रयत्न यशस्वी झाला. आपल्या पुस्तकाच्या यशाची खात्री नसल्याने, पुस्तकावर 'जॉर्ज ऑर्वेल' हे लेखकाचे नाव छापण्याविषयी त्यांनी प्रकाशकांना सांगितले. त्यानंतर ते जॉर्ज ऑर्वेल याच नावाने लेखन करत राहिले. भारतातील बिहारमधल्या चंपारण जिल्ह्यातील मोतीहारी या गावात, २५ जून १९०३ रोजी, एरिक यांचा जन्म झाला.त्यावेळी त्यांचे वडील रिचर्ड, इंग्रज साम्राज्याचा पाया मजबूत करणारी नोकरी भारतात करत होते. आपण निम्न मध्यमवर्गातून आल्याचे ऑर्वेल सांगत असत. एरिक यांच्या आईवडिलांविषयी सविस्तर माहिती दिली आहे. रिचर्ड यांचे ३९ व्या वर्षी, ईडा यांच्याशी लग्न झाले. एरिक हे त्यांचे दुसरे अपत्य. एरिक म्हणजे कायमस्वरूपी राज्य करणारा. साहित्य क्षेत्रावर एरिक ब्लेअर यांनी राज्य केले, पण आपले मूळनाव बदलून! मुलांच्या शिक्षणासाठी आईने ब्रिटनला परतण्याचा निर्णय घेतला. एरिक चार वर्षांचे असताना, त्यांचे वडील भारतातून सुट्टीवर आले. एरिक यांना त्यांचा, त्यावेळी चेहराही आठवत नव्हता. मात्र वडिलांनी मुलाला कधी प्रेमाने जवळ घेतले नाही. त्यामुळे बापलेक नात्यात दुरावा निर्माण झाला आणि पुढे तो वाढतच गेला. एरिक बालपणापासून एकांतप्रिय होते. ते आपल्या कल्पनाविश्वात रमत होते. निसर्गाचा सहवास आवडत होता. पुढे वाचनाची आवड निर्माण झाली. शाळकरी जीवनाविषयी त्यांच्या आठवणी सुखद नाहीत. मात्र आपल्या हुशारीच्या जोरावर, एरिक यांनी नावाजलेल्या सरकारी विद्यालयात प्रवेश प्राप्त केला. शिष्यवृत्तीधारकांची राहण्याची सोय कॉलेजच्या आवारात होती. अवतीभवतीची मुलं खूप श्रीमंत असल्यामुळे, आलेल्या न्यूनगंडामुळे एरिक पुन्हा एकटे पडले. शिक्षकांशीही, एरिक यांच्या स्पष्टवक्तेपणामुळे, त्यांचे फारसे जुळले नाही. "मी ईटनमध्ये काहीही केलं नाही आणि फारसं काही शिकलोही नाही." असे त्यांनी लिहून ठेवले आहे. मात्र त्यांच्या भाषेवर, तेथील संस्कार नकळतपणे झाले होते.

एरिक यांनी, नंतर ऑक्सफर्डमध्ये शिकायला जाणार नाही, हे जाहीर केले. त्यामुळे पुढे काय? असा प्रश्न निर्माण झाला. नोकरी करण्याची इच्छा नव्हती. परंतु केवळ लेखनावर पोट कसं भरणार, हाही प्रश्न होता. त्यावेळची मैत्रीण जसिंथाने त्यांचे प्रेम नाकारले होते. इंडिया ऑफिसकडून घेतल्या जाणाऱ्या परीक्षेत त्यांनी उत्तम यश मिळवले. सहाय्यक पोलीस अधीक्षकपदी त्यांची निवड झाली. बोटीवरील प्रवासाचे विविध अनुभव पुस्तकामध्ये नोंदविले आहेत. बर्मामध्ये प्रशिक्षण झाल्यावर नोकरी सुरू झाली. पोलीस खात्याच्या नोकरीतील विविध अनुभव त्यांच्या मनावर कोरले गेले. लेखनातून नंतर ते वेळोवेळी व्यक्त होत गेले. बर्मातील साडेचार वर्षांच्या काळात एरिक यांची जीवनदृष्टी विकसित झाली. त्यांच्या संवेदनशील मनावर तेथील अनुभवांचे ठसे उमटले. तेथे ब्रिटिश साम्राज्याची काळी बाजू अनुभवता आली. साम्राज्यशाही व्यवस्थेचा भाग झाल्याची वेदना त्यांच्या मनावर कायमची कोरली गेली. शेवटी लेखन करण्याच्या प्रेरणेतून एरिक यांनी नोकरी सोडली. नोकरी सोडण्याच्या एरिक यांच्या निर्णयामुळे आईवडील अस्वस्थ झाले. त्यामुळे घरी राहणं अवघड होत चालले. रूथ पीटर या नवोदित कवयित्रीच्या मदतीने एरिक यांनी १९२७ च्या हिवाळ्यात लंडनमध्ये गरीब वस्तीत एक खोली मिळवली. पैशाची चिंता नव्हती. कथालेखन सुरू केले. मात्र त्यामध्ये फारशी प्रगती होत नव्हती. सहा महिन्यानंतरही त्यांचे चाचपडणे संपत नव्हते. गरिबीशी सामना करणाऱ्या लोकांविषयी कळवळा वाटल्याने, त्यांच्यामध्ये मिसळून त्यांचे अनुभव जाणून घ्यायचे त्यांनी ठरवले. त्यासाठी त्यांनी, एडवर्ड बर्टन हे नवे नाव धारण केले. त्यांच्यासोबत अन्नछत्रातील मुक्कामाचाही अनुभव घेतला. गरिबांमधील टिकून राहिलेल्या सुसंस्कृततेच त्यांना आश्चर्य वाटे. एरिक यांनी १९२८ च्या वसंतऋतूमध्ये पॅरिसमध्ये प्रयाण केले. सुरुवातीला आपल्या आवडत्या, नेली मावशीकडे मुक्काम ठोकला होता. तेथे मावशीचे पती युजीन ॲडम, या समाजवादी कार्यकर्त्यासोबत राहण्याची संधी मिळाली. 'एस्परांटो' भाषेचे ते शिक्षक होते. त्यांच्या मते, ही भाषा सर्वत्र पसरली तर जागतिक शांतता आणि सामंजस्य प्रस्थापित होईल. राष्ट्रवाद संपुष्टात येईल. त्यांच्या समाजवादी विचारांचा एरिक यांच्यावर परिणाम झाला. मात्र त्यांनी, त्यांचे सर्व विचार स्वीकारले नाहीत. एस्परांटो भाषेचा आग्रह, हा त्यांना स्वप्नाळू आशावाद वाटे. पुढे '१९८४' या कादंबरीत, 'न्यूस्पीक' या भाषेत, तिचेच प्रतिबिंब उमटले. कालांतराने एरिक यांनी आपले वास्तव्य गरीब वस्तीतील एका भाड्याच्या खोलीत हलवले. किरकोळ लेखनाद्वारे एरिक यांना थोडा मोबदलाही मिळू लागला. एरिक यांनी निबंध लेखनाचे माध्यम स्वीकारले. मात्र कादंबरी लेखन हे त्यांचे ध्येय होते. त्यासाठी ते अतोनात कष्ट घेत होते. परिणामी आजारपणही आले. हॉस्पिटलमधील विविध अनुभव त्यांच्या आठवणीत जमा झाले. तेथे बोरिस नावाच्या माणसाशी मैत्री झाली. त्यांनी लेखनाचे खूळ डोक्यातून काढून टाकण्याचा व्यावहारिक सल्ला दिला होता. बोरिस यांच्याबरोबर एका हॉटेलमध्ये वेटरचे कामही केले. दीड वर्षांच्या पॅरिसच्या मुक्कामात एरिक यांची एकूण कमाई होती चाळीस पौंड. त्यातील निम्मा वाटा लेखनाचा, तर उरलेला हॉटेलमधील तीन महिन्यांच्या मेहनतीचा होता. पॅरिसच्या वास्तव्यात एरिक गरीब झाले आणि कष्टकरीही! दारिद्र्य आणि शोषण यांचा त्यांनी अनुभव घेतला. गरिबी माणसाला शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या कशी कुजवते, हे त्यांना स्वानुभावातून समजले. शोषित कामगारांचे हलाखीचे जिणे, व्यावसायिकांची नफेखोरी वृत्ती आणि मध्यम वर्गाची उदासीनता असे समाजातील विविध स्तर लक्षात आल्याने, समाजवादाचे आकर्षण वाढले. अपयशी एरिक मलूल चेहऱ्याने घरी परतले. मुलाच्या अकाली प्रौढत्वामुळे आईला काळजी वाटली. वडिलांनी मात्र पूर्ण दुर्लक्ष केले. लंडनमध्ये आपले लेखन प्रकाशित व्हावे, यासाठी एरिक प्रयत्नशील होते. वर्षभरात चार परीक्षणे छापून आली. किरकोळ नोकऱ्या करून काही प्राप्ती झाली होती. मात्र लेखनात यश मिळण्याचे चिन्ह दिसत नव्हते. अनुभव घेण्यासाठी, अतिरिक्त मद्यपान करून काही दिवस तुरुंगाची हवा चाखली. तुरुंगाचे आतून निरीक्षण केले आणि कैद्यांच्या मानसिकतेचा अभ्यास केला. पोलीस अधिकारी असताना, त्यांनी हे जग पाहिले होते. आता ते गुन्हेगाराच्या मानसिकतेतून निरीक्षण करीत होते. अनेक नकार प्राप्त झाल्यानंतर शेवटी ८ जानेवारी १९३३ रोजी एरिक यांचे पहिले पुस्तक प्रकाशित झाले. अल्पावधीतच या पुस्तकावर अनुकूल प्रतिक्रिया आणि परीक्षणे आली. जॉर्ज ऑर्वेल या लेखकाच्या पहिल्या पुस्तकाच्या प्रतींवर 'बेस्टसेलर'चा शिक्का दिसू लागला. १९३५, ब्रिटनमध्ये ' ' ही कादंबरी प्रकाशित झाली. तिच्यावर उलटसुलट परीक्षणे आली. कोळशाच्या खाणीत काम करणाऱ्या कामगारांचा अभ्यास करण्यासाठी, त्यांनी काही काळ प्रत्यक्ष तेथे जाऊन निरीक्षणे केली. तेथील कामगारांच्या जीवनाचा सर्वार्थाने अभ्यास केला. नंतर लिव्हरपूल शहरातील गोदी कामगारांची अवस्थाही पाहिली. ती फारशी काही वेगळी नव्हती. त्यामुळे साम्राज्यशाही आणि भांडवलशाहीचा एरिक कट्टर विरोधक झाले. शेवटी ते लोकशाही समाजवादी झाले. ९ जून १९३६ रोजी एरिक यांचे आयलीन यांच्याशी लग्न झाले. दोघांचे स्वभाव मिळतेजुळते होते. समारंभाची, थाटामाटाची हौस नव्हती. वयाची तिशी ओलांडलेल्या दोघांनी पूर्वायुष्यात आलेल्या व्यक्तींविषयी एकमेकांना मोकळेपणाने आधीच सांगितलेले होते. लंडनपासून जवळच असलेल्या, वॉलिंग्टन खेड्यामध्ये त्यांनी जुने घर कमी भाड्यात मिळवले. साधेपणाने जीवन जगण्यात, बागेत कष्ट करण्यात, प्राणी संगोपनात दोघांनाही आनंद वाटत होता. त्यांनी एक छोटे दुकानही सुरू केले होते. एरिक यांचे लेखन, वाचन अभ्यासिकेत सुरू असे. उभयतांच्या जीवनातील हा परमोच्च सुखाचा काळ होता. हिटलर, मुसोलिनी यांच्या रूपाने फॅसिझमचे वादळ विविध देशांत घुसल्याचे ऑर्वेल यांना जाणवले. स्पेनच्या यादवी युद्धात ऑर्वेल यांनी आपला सहभाग नोंदविला. या युद्धाची पार्श्वभूमी आणि ऑर्वेल यांचे तेथील अनुभव, हा या पुस्तकातील भाग वाचनीय झाला आहे. या युद्धामुळे 'Animal Farm' आणि '१९८४' या भावी कादंबऱ्यांची बीजे, ऑर्वेल यांच्या मनात रोवली गेली. माणुसकीवरचा आणि सामान्यांवरचा त्यांचा विश्वास दृढ झाला. तब्येत खूपच बिघडल्याने एरिक यांना साडेपाच महिने आरोग्यधाममध्ये राहावे लागले. तेथील मन:स्थितीचे विविध अनुभव पुस्तकात नोंदविले आहेत. दुसऱ्या महायुद्धाच्या आगीमध्ये ब्रिटनही ओढले गेले. कादंबरी आणि निबंध लेखन सुरूच होते. बीबीसीच्या 'ईस्टर्न सर्विस' या प्रसारण सेवेत एरिक यांना नेमले गेले. ब्रिटिशांनी भारतीयांना न विचारता, भारताला युद्धात खेचले होते. भारतीय सैनिकांच्या आणि भारतातल्या साधनसंपत्तीच्या जोरावर ब्रिटन युद्ध खेळत होते. मात्र भारताला स्वातंत्र्याचा हक्क ब्रिटिशांनी नाकारला होता. या दुटप्पी भूमिकेला काँग्रेसने जोरदार विरोध केला होता आणि सविनय कायदेभंगाची चळवळ भारतात सुरू झाली होती. त्या विरुद्ध ही खास प्रसारण सेवा होती, हे एरिक यांनी जाणले. १८ ऑगस्ट १९४१ रोजी एरिक नोकरीत रुजू झाले होते. एरिक यांचे लेखनही सेंसॉर केले जात होते. हे समजल्याने एरिक यांची घुसमट होऊ लागली. शेवटी २४ सप्टेंबर १९४३ रोजी राजीनामा दिला. या कामामुळे एरिक यांना प्रचारतंत्राचे जग समजले.

३ एप्रिल १९४५ रोजी एरिक यांच्या पत्नीचा, आयलीन यांचा अंत्यविधी झाला. त्या आधीच्या सहा वर्षात, त्यांनी आपल्या जवळच्या कितीतरी व्यक्ती गमावल्या होत्या. क्षयरोगाची बाधा झाल्याचे कळल्यापासून एरिक यांचे मन, आशानिराशेच्या झोक्यावर हेलकावे घेत होते. आरोग्यधाममध्ये त्यांना दाखल व्हावे लागले. आपल्या निधनानंतर आपल्या दत्तक मुलाचे, रिचर्डचे कसे होईल, याची जॉर्ज यांना काळजी वाटत होती. आपल्या साहित्याची काळजी घेणारे कोणीतरी असावे असेही त्यांना वाटत होते. त्याचकाळात वारंवार भेट देणाऱ्या, सोनियाशी त्यांचे, १३.१०.१९४९ रोजी लग्न झाले. मात्र तब्येतीत फारशी सुधारणा न झाल्याने, २१ जानेवारी, १९५० रोजी, एरिक ब्लेअर यांनी चिरविश्रांती घेतली. पण जॉर्ज ऑर्वेल, त्यांच्या लेखनामुळे जिवंत राहिले. विशेषत: "Animal Farm" आणि "१९८४" या कादंबऱ्यांमुळे त्यांना जगभर प्रसिद्धी लाभली. शेवटी विशाखा पाटील लिहितात, "ज्या ज्या वेळी दुर्बळांवर अन्याय होतो, सत्याचा अपलाप होतो, सत्याचा गळा घोटला जातो, स्वातंत्र्याचा संकोच होतो, नागरिकांवर नजर ठेवली जाते, प्रचारतंत्राला जोर चढतो, युद्धखोरीला उधाण येतं, कडव्या राष्ट्रवादाची गुंगी चढवली जाते; त्या त्या वेळी हा व्रतस्थ दीप सामान्यांना दिशा दाखवण्यासाठी उभा असतो." विशाखा पाटील यांनी, या ग्रंथाद्वारे जॉर्ज ऑर्वेल यांचे गुंतागुंतीचे व्यक्तिमत्त्व, वाचकांसमोर साधार साकार केले आहे. शेवटी संदर्भ पुस्तकांची आणि जॉर्ज ऑर्वेल यांच्या साहित्याची सूची दिली आहे.

प्रा. विशाखा पाटील जे.एस.एम.वरिष्ठ महाविद्यालय, अलिबाग येथे तेरा वर्षे, इंग्रजीचे अध्यापन करीत होत्या. इंग्रजी विभागप्रमुख होत्या. त्यांचा परिचय शेवटी, त्यांच्या छायाचित्रासह दिला आहे. त्यावेळचे माझे ज्येष्ठ मित्र आणि सहकारी, प्रा.सुरेश घाटे यांना हे पुस्तक, विशाखा पाटील यांनी अर्पण केले आहे.**

**पुस्तकाचे नाव : जॉर्ज ऑर्वेल करून जावे असेही काही...**
**लेखिका : विशाखा पाटील**
**प्रकाशक : राजहंस प्रकाशन, पुणे-३०**
**फोन : (०२०) २२४७३४५९**
**आवृत्ती पहिली : जानेवारी २०२१**
**पृष्ठे : ३३६, किंमत : रू. ४७५/-**

# नकोशा होताहेत हव्याशा

**पुरुष आणि महिला ही जीवनाच्या वाहनाची दोन चाके आहेत. एका वाहनाला सुरळीत चालण्यासाठी फक्त दोन चाकेच आवश्यक नसतात, तर समान गुणही आवश्यक असतात. त्याचप्रमाणे, सामाजिक जीवनाचे वाहन सुरळीत चालण्यासाठी, पुरुष आणि महिला दोघांमध्येही समान संख्या आणि गुण असणे आवश्यक आहे. दुर्दैवाने या वास्तवाची जाणीव अनेकांना नाही. अर्थात ही परिस्थितीही बदलत आहे.**

**प्रा. अशोक ढगे**

जगातील बहुतेक भागांनी मुला-मुलींमधील फरकाबद्दल शतकानुशतके रूढीवादी विचारसरणी सहन केली आहे; परंतु लोकांची विचारसरणी आता बदलत आहे, हे एक सुखद आणि दिलासादायक चित्र आहे. 'मुलगाच हवा' असा अट्टाहास आता कमी होत आहे. मुलींनी सर्वच क्षेत्रांमध्ये आपल्या कर्तृत्त्वाची चुणूक दाखवल्यानंतर आता जग अशा टप्प्यावर आले आहे, जिथे ते मुलींकडे समान स्वारस्याने पाहते. 'गॅलप इंटरनॅशनल'ने अलिकडेच केलेल्या सर्वेक्षणात हे चित्र मांडले आहे. ४४ देशांमध्ये केलेले हे सर्वेक्षण वर्तमानाबद्दल समाधान आणि भविष्यासाठी आशा निर्माण करते. या देशांमध्ये, मुलाचे लिंग आता विचारात घेतले जात नाही आणि त्यांना मुलगा आहे, की मुलगी याचा कोणताही फरक पडत नाही. भारत, चीन, अमेरिका आणि अनेक युरोपीय देशांमधील पालक यात सहभागी आहेत. ही विचारसरणी आणि सुधारणा उपायांमुळे गेल्या २५ वर्षांमध्ये जागतिक स्तरावर ७० लाख मुलींचा मृत्यू रोखला गेला आहे. तथापि, या चित्राची दुसरी बाजू अशी आहे, की अजुनही दर वर्षी दहा लाखांहून अधिक मुलींना गर्भाशयातच मारले जात आहे. गेल्या ४५ वर्षांमध्ये गर्भाशयातच मारल्या जाणाऱ्या मुलींची संख्या पाच कोटींपेक्षा जास्त झाली आहे. यावरून दिसून येते, की लिंगभेदाचा कलंक कायमचा संपवण्यासाठी अजून बरेच काही करायचे आहे. हे भारतालाही लागू होते. विकसित देशांपेक्षा येथे आव्हाने आणि अडचणी जास्त आहेत. कमी शिक्षण, रूढीवादी पालकत्व, अंधश्रद्धा आणि गैरसमज येथे नेहमीच प्रचलित राहिले आहेत. अर्थात कालांतराने परिस्थिती सुधारते. असेच काही ताज्या राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाने दर्शवले आहे.

ताज्या अभ्यासानुसार भारतात मुलींपेक्षा मुलेच हवीत, याबाबतची पसंती १९९९ मध्ये ३३ टक्क्यांवरून आता १५ टक्क्यांपर्यंत घसरली आहे. हे खूप उत्साहवर्धक लक्षण आहे; परंतु हे समजून घेतले पाहिजे, की १५ टक्के प्रमाणदेखील खूप जास्त आहे. त्याचा परिणाम देशातील प्रति एक हजार मुलांमागे ९४३ मुलींच्या लिंग गुणोत्तरात दिसून येतो. वैद्यकीय आणि वैज्ञानिक अभ्यास दर्शवतात, की जागतिक स्तरावर जन्मलेल्या मुलांचे मुलींच्या तुलनेतील प्रमाण १०५:१०० आहे. आज काही बाह्य शक्ती निसर्गाशी छेडछाड करत आहेत. या बाह्य शक्तीवर नियंत्रण ठेवले जात नाही, तोपर्यंत मुला-मुलींमधील हे असंतुलन दूर होणार नाही. ५७ ही एक महत्त्वाची तफावत आहे. सध्याच्या सुधारणेच्या गतीने ही तफावत भरून काढण्यासाठी पंचवीस वर्षांहून अधिक काळ लागेल. या मुली जगात प्रवेश करून आनंदी आणि समृद्ध जीवन जगतील याची खात्री करण्यासाठी त्यांचे संरक्षण वाढवणे आवश्यक आहे. विश्वाच्या संतुलनासाठीही हे आवश्यक आहे. दुर्दैवाने, भारतीय लोकसंख्येतील महिलांचे प्रमाण कमी झाले आहे.

वेळोवेळी होणाऱ्या जनगणनेवरून हे स्पष्ट होते. एक किंवा दोन वगळता भारतातील प्रत्येक राज्यात महिलांच्या संख्येत घट दिसून येते. यामुळे सामाजिक असमतोलाचा धोका निर्माण झाला आहे, जो कोणत्याही बाबतीत चांगला संकेत नाही. याकडे लक्ष न दिल्यास असमतोल वाढेल.

गेल्या दशकांमध्ये केलेल्या जनगणनेचा आढावा घेतल्यास महिलांची संख्या आणि त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात सातत्याने घट होत असल्याचे दिसून येते. हरियाणा आणि पंजाबसारख्या सुशिक्षित आणि समृद्ध राज्यांमध्ये महिलांची संख्या दर हजार पुरुषांमागे ८५० पेक्षा कमी झाली आहे. हे लक्षात घेण्यासारखे आहे, की राज्य जितके अधिक शिक्षित आणि समृद्ध असेल तितके महिला लोकसंख्या प्रमाण कमी असेल. केरळ हा अपवाद आहे.

तथाकथित मागासलेल्या ईशान्येकडील राज्यांमध्ये महिलांचे प्रमाण अधिक समृद्ध राज्यांपेक्षा लक्षणीयरीत्या चांगले आहे. काही सुशिक्षित आणि समृद्ध राज्यांमध्ये विवाहयोग्य पुरुषांना महिला शोधण्यात बरीच अडचण येत आहे. या पुरुषांना आता अविवाहित राहण्याची समस्या भेडसावत आहे. यामुळे त्यांच्या पालकांना मुलांसाठी उपवर मुली शोधण्यासाठी इतर राज्यांकडे वळावे लागत आहे. ही एक सामाजिक समस्या आहे. ही समस्या काही बुद्धिजीवी, सामाजिक कार्यकर्ते आणि सरकारी अधिकाऱ्यांसाठी चिंतेचा विषय होती. तथापि, त्यांचे मुलगे अविवाहित राहतील आणि वंश नष्ट होईल, या भीतीने लोकांना या समस्येवर उपाय शोधण्यास भाग पाडले आहे. त्यांना त्याची कारणे विचारात घेण्यास भाग पाडले गेले आहे. प्राचीन काळापासून भारतीय समाजात मुलांना खूप महत्त्व दिले गेले आहे. पालकांचा विश्वास आहे, की मुलाने पिंडदान (अंतिम संस्कार) केल्याशिवाय त्यांना स्वर्ग मिळत नाही.



महागाई कमी होती, तेव्हा लोक अनेक मुलांच्या संगोपन आणि शिक्षणाचा भार सहज पेलू शकत होते. तथापि, वाढत्या महागाईमुळे कुटुंबांना आपली मुले एक किंवा दोनपर्यंत मर्यादित ठेवावी लागली आहेत. लोक मुलगी नव्हे, तर मुलगा व्हावा यासाठी विविध युक्त्या वापरत आहेत. एके काळी भूतबाधा करणाऱ्या आणि जादूटोणा करणाऱ्यांची मदत घेणारे लोक आता गर्भाशयात लिंग निर्धारण चाचण्या करण्यासाठी वैज्ञानिक साधनांचा आधार घेत आहेत. पुरुषप्रधान समाजात महिलांना या घृणास्पद प्रथेमध्ये पुरुषांसोबत सामील होण्यास भाग पाडले जाते. महिला असूनही, त्या पुरुषांना स्त्रीभ्रूणहत्येमध्ये पाठिंबा देताना दिसतात. यामुळे जोडप्यांना स्त्रीभ्रूणहत्येपासून मुक्तता मिळू शकते; परंतु त्यांना या वाईट प्रथेच्या परिणामांची माहिती नसते. ते विसरतात, की पुढील काळात त्यांच्या मुलांना लग्न करण्यासाठी मुली उपलब्ध होणार नाहीत. या कृतीचा प्रतिकूल परिणाम म्हणजे सतत कमी होत जाणारी महिला लोकसंख्या. या समस्येचे आणखी एक प्रमुख कारण म्हणजे समाजाची पितृसत्ताक मानसिकता. ही मानसिकता मुला-मुलींच्या संगोपन, शिक्षण, वाढ आणि विकासाच्या संधींमध्ये दुहेरी मानके निर्माण करते. पालक अनेकदा मुलींच्या जन्मापासूनच त्यांचे संगोपन, काळजी आणि उपचार याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे त्यांच्या बाळांचा मृत्यू होतो किंवा त्यांचे आरोग्य बिघडते. मुलींचे शिक्षण आणि उच्च शिक्षण समाजात अनुकूलपणे पाहिले जात नाही आणि म्हणूनच त्यांना घराबाहेर पडण्याची परवानगी नाही.

समाजात मुलींना ओझे मानले जाते. याचे कारण म्हणजे त्यांच्या लग्नाच्या वेळी हुंड्याची तरतूद. दुसरीकडे, मुलांना सर्व प्रकारचे स्वातंत्र्य दिले जाते. लहान वयात मुलींच्या आरोग्य आणि विकासाकडे लक्ष न दिल्यामुळे त्यांचा अकाली मृत्यू होतो. यामुळे लिंग असमतोल वाढतो. मुलींच्या अकाली मृत्यूचा परिणाम लगेच दिसून येत नाही. त्याचे परिणाम दहा ते बारा वर्षांनी दिसून येतात, जेव्हा त्याचे गंभीर स्वरूप समाज आणि सरकारसाठी चिंतेचा विषय बनते. बुद्धिजीवी आणि सरकारी यंत्रणा नंतर उपायांवर विचार करू लागतात. 'लाडली योजना', 'बेटी बचाओ-बेटी पढाओ' आणि 'कन्या विद्याधन' यासारख्या सरकारी योजना या दिशेने सरकारने उचललेले यशस्वी पाऊल आहेत. याव्यतिरिक्त सरकार विविध माध्यमांद्वारे जनजागृती करण्याचा प्रयत्न करते. मुलीच्या जन्मासाठी पालकांना प्रोत्साहन देणे आणि मुलीच्या लग्नासाठी आर्थिक मदत करणे ही या दिशेने उचललेली ठोस पावले आहेत. सरकारने लिंग निर्धारण चाचण्यांना गुन्हेगार ठरवून आणि लिंग निर्धारण चाचण्या करणाऱ्या डॉक्टरांना शिक्षा करण्यासाठी कायदेशीर तरतुदी लागू करून प्रशंसनीय प्रयत्न केले आहेत. यामुळे लोकांची मानसिकता बदलली आहे. घटते पुरुष-स्त्री प्रमाण कमी करण्यासाठी सरकारी प्रयत्न लोकांपर्यंत पोहोचण्याची गरज आहे; विशेषतः मागास आणि दुर्गम भागात. सरकार हे त्याच्या प्रसिद्धीद्वारे करत आहे. खरे तर, लोकांची मानसिकता बदलण्याची गरज आहे, जेणेकरून ते मुला-मुलींना समान वागणूक देतील. मुलींच्या जन्माला ओझे न मानता या जगात प्रवेश करण्याची संधी दिली पाहिजे.

आज समाजातील लोकांनी याचे दुष्परिणाम काही प्रमाणात ओळखले आहेत. समाजात महिलांची कमतरता, सुनेची कमतरता याची भीती, सामाजिक गुन्ह्यांमध्ये वाढ आणि बिघडत चाललेला सामाजिक असमतोल यामुळे लोकांच्या विचारसरणीमध्ये बदल झाला आहे. यामुळे मुलींच्या संख्येत काही सुधारणा झाली आहे; परंतु या दिशेने अजूनही बरीच सुधारणा आवश्यक आहे. समाजाने आज या दिशेने ठोस पावले उचलण्याची गरज आहे. अन्यथा, पुढील काही दशकांमध्ये कोणत्याही महिलेला द्रौपदी बनण्यास भाग पाडले जाईल. ही वेळ येण्याची वाट न पाहता, आपण जनजागरणाच्या दिशेने ठोस पावले उचलली पाहिजेत. **

## निवडक

### किशोरला कुस्तीत सुवर्णपदक

**पंढरपूर :** मलेशिया येथे सुरू असलेल्या आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत भारताचा पैलवान किशोर पवार याने देशाला सुवर्णपदक मिळवून दिले आहे. मलेशिया येथे इंटरनॅशनल रेसलिंग चॅम्पियनशिप (२०२६) स्पर्धा सुरू आहे. या स्पर्धेत ५७ किलो वजनी गटातून फ्री स्टाईल कुस्ती प्रकारात पैलवान किशोर पवार याने श्रीलंका, मलेशिया, थायलंड देशाच्या पैलवानांना धूळ चारत सुवर्णपदक पटकावले. पैलवान किशोर याचे आई-वडील हे शेती व्यवसाय सांभाळून कुस्ती खेळण्यासाठी प्रोत्साहन देतात. पैलवान किशोर हा कोल्हापूर येथील गंगावेश तालमीत. वस्ताद विश्वास हरगुले यांच्या मार्गदर्शनाखाली मल्लविद्येचा सराव करत आहे. भारतीय सेना प्रशिक्षक उत्तम पाटील यांचे मार्गदर्शन मिळत आहे.. पैलवान किशोर पवार हा भोसे येथील यशवंतभाऊ पाटील महाविद्यालयात शिक्षण घेत आहे. त्याच्या या यशाबद्दल संस्थेचे मार्गदर्शक गणेश पाटील, प्राचार्य संजय मुजमुले यांच्यासह सर्व शिक्षक व खेडभोसे ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

### विनोदचा रेकॉर्ड आजही कायम

**मुंबई :** कांबळीने कसोटी क्रिकेटमध्ये दणक्यात सुरुवात केली होती. कांबळीने पहिल्या ७ कसोटी सामन्यांमध्येच ४ शतकं झळकावली होती. विशेष म्हणजे यात २ द्विशतकांचा समावेश होता. कांबळीने या तडाख्यासह भारतासाठी कसोटीत वेगवान १ हजार धावा पूर्ण करण्याची कामगिरी केली होती. विनोदने १४ डावांत कसोटीत ४ आकडी धावा पूर्ण केल्या होत्या. मात्र तेव्हापासून एकाही भारतीयाला कांबळीला मागे टाकणे जमलेले नाही. मुंबईकर यशस्वी जैस्वाल कांबळीच्या या विक्रमाजवळ आला होता. मात्र यशस्वीलाही ते जमले नाही. यशस्वीने १६ डावांत १ हजार कसोटी धावा पूर्ण केल्या होत्या. कांबळीने भारतासाठी १९९१ साली एकदिवसीय पदार्पण केलं होतं. तसेच २००० मध्ये शेवटचा एकदिवसीय सामना खेळला होता. कांबळीने १०४ एकदिवसीय सामन्यांमध्ये २ हजार ४७७ धावा केल्या होत्या. तसेच कांबळीने १७ कसोटी सामन्यांमध्ये एकूण १ हजार ८४ धावा केल्या आहेत. कांबळीने या दरम्यान २ द्विशतकं, ४ शतकं आणि ३ अर्धशतकं झळकावली आहेत.




### बॅडमिंटनमध्ये भारतीयाचे आव्हान संपुष्टात



**जकार्ता :** भारतीय खेळाडूंचे इंडोनेशिया ओपन बॅडमिंटन स्पर्धेतील आव्हान शुक्रवारी संपुष्टात आले. पुरुष एकेरी विभागात लक्ष्य सेन याचा, तर महिला एकेरी विभागात पी. व्ही. सिंधू हिचा उपांत्यपूर्व फेरीत पराभव झाला. यामुळे भारताच्या विजेतेपदाच्या आशांना सुरुंग लागला. पी. व्ही. सिंधू हिच्यासमोर उपांत्यपूर्व फेरीच्या लढतीत चीनच्या चेन यू फेई हिचे आव्हान होते. चेन यू फेई हिने भारताच्या अनुभवी खेळाडूला सरळ दोन गेममध्ये पराभूत केले. पहिला गेम तिने २१-१३ असा आपल्या नावावर केला. त्यानंतरच्या गेममध्ये पी. व्ही. सिंधू हिच्याकडून थोडीफार झुंज पाहायला मिळाली. मात्र, चेन यू फेई हिने २१-१७ असा हा गेम जिंकत विजयासह उपांत्य फेरीत प्रवेश केला. पी. व्ही. सिंधूचा ४२ मिनिटांमध्ये पराभव झाला.लक्ष्य सेन याला पुरुषांच्या एकेरीत अपयशाचा सामना करावा लागला. त्याने थायलंडच्या पानीचफोन तीरारतसकुल याने लक्ष्य सेनची कडवी झुंज मोडून काढली. दोन खेळाडूंमधील लढतीत दोन्ही गेममध्ये संघर्ष पाहायला मिळाला. थायलंडच्या खेळाडूने पहिला गेम २१-१८ असा जिंकला व १-० अशी आघाडी घेतली. पुढील गेममध्ये दोन्ही खेळाडूंमध्ये आणखी संघर्ष पाहायला मिळाला, पण थायलंडच्या खेळाडूने दबावाखाली खेळ उंचावला व २२-२० असा विजय संपादन केला. लक्ष्य सेन याला ४६ मिनिटांमध्ये हार पत्करावी लागली.

### डी. गुकेशचा पहिला विजय



**नवी दिल्ली :** नेदरलँडस्मधील विज्क आन झी येथे सुरू असलेल्या टाटा स्टील मास्टर्स बुद्धिबळ स्पर्धेत पाचव्या फेरीत भारताच्या विश्वविजेत्या डी. गुकेशने आपला पहिला विजय नोंदवला असला, तरी जागतिक क्रमवारीत अग्रस्थानी असलेल्या अर्जुन एरिगेसीला पराभवाचा धक्का बसला आहे. गेल्या चार फेऱ्यापासून बरोबरीवर समाधान मानणार्या डी. गुकेशने पाचव्या फेरीत चेक प्रजासत्ताकच्या थाई दाई वान गुयेन याचा पराभव केला. काळ्या मोहर्यांनी खेळताना गुकेशने तांत्रिकदृष्ट्या उत्कृष्ट खेळ केला. त्याने आपल्या हत्तीचा त्याग करून प्रतिस्पर्ध्यावर दबाव आणला आणि ५१ चालींमध्ये विजय मिळवला. या विजयामुळे तो ३ गुणांसह संयुक्तपणे चौथ्या क्रमांकावर पोहोचला आहे. अर्जुनला धक्का या स्पर्धेत आघाडीवर असलेल्या अर्जुन एरिगेसीला स्लोव्हेनियाच्या व्लादिमीर फेडोसेव्हने पराभूत केले. अर्जुनने पांढऱ्या मोहऱ्यानी खेळताना काही जोखीम पत्करली, जी त्याच्या अंगलट आली. मध्यंतरापर्यंत अर्जुनची स्थिती कमकुवत झाली होती, ज्याचा फायदा फेडोसेव्हने घेत विजय मिळवला. या पराभवामुळे अर्जुन २.५ गुणांसह सातव्या स्थानावर घसरला आहे. इतर लढतीत भारताच्या आर. प्रज्ञानंदने हॉलंडच्या अनिश गिरीविरुद्ध आपली तिसरी बरोबरी साधली. तो सध्या १.५ गुणांवर आहे. अरविंद चिदंबरमला जर्मनीच्या विन्सेंट केमरकडून पराभव स्वीकारावा लागला. अरविंद देखील १.५ गुणांवर आहे. अजून पुनरागमन करण्याची मोठी संधी आहे.

# भारताचा न्यूझीलंडवर दणदणीत विजय

## ।। सूर्या-शिवमची बॅट तळपली ।। मालिकेत २-0 ची आघाडी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

रायपूरच्या शहीद वीर नारायणसिंह स्टेडियमवर भारताच्या इशान किशनने अक्षरशः धुमशान घातले. त्याच्या ७६ धावांच्या झंझावाताच्या जोरावर भारताने २०९ धावांचे आव्हान केवळ १६ षटकांत पार करत पाहुण्या न्यूझीलंडचा ७ विकेटनी पराभव केला.

भारतीय संघाच्या दमदार खेळीने न्यूझीलंडने दिलेल्या धावसंख्येचा सूर्यकुमार-शिवमने यशस्वी पाठलाग केला. भारतीय संघाचा सलग दुसरा विजय मिळविला. भारतीय संघाने शुक्रवारी टी-२० सामन्यात ७ गडी राखून न्यूझीलंडवर ऐतिहासिक विजय मिळवला. न्यूझीलंडने दिलेल्या आव्हानाचा सूर्यकुमार-शिवमने यशस्वी पाठलाग केला. भारताच्या आक्रमक फलंदाजीपुढे न्यूझीलंडच्या गोलंदगाजांनी गुडघे टेकले. न्यूझीलंड विरोधातील सीरीजमध्ये भारतीय संघाने सलग दुसरा विजय मिळवला आहे.

न्यूझीलंडने प्रथम फलंदाजी करताना २० षटकात ६ गडी गमावून २०८ धावा कुटल्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना भारतीय संघाची सुरुवात खराब झाली. संजू सॅमसन आणि अभिषेक शर्मा हे लवकर बाद झाले. २०९ धावांचा पाठलाग करताना भारतीय संघाची



खराब सुरुवात झाली. भारतीय संघाने ७ चेंडूच्या आतच दोन गडी गमावले होते. संजू सॅमसन पाच चेंडूत ६ धावा करून बाद झाला. तर अभिषेक शर्मा शून्य धावांवर बाद झाला. ईशान किशनने ३२ चेंडूत ७६ धावांची तुफानी खेळी खेळली. त्याने डावात ११ चौकार आणि ४ षटकार लगावले. तर सूर्यकूमारने ३७ चेंडूत ८२ नाबाद धावा केल्या. शिवम दुबेने १८ चेंडूत ३६ धावा केल्या.

न्यूझीलंडने प्रथम फलंदाजी करताना २० षटकात ६ गडी गमावून २०८ धाव केल्या. न्यूझीलंडचा कर्णधार मिचेलने सर्वाधिक धावा कुटल्या. भारतासाठी कुलदीप यादवने दोन गडी बाद केले. तर न्यूझीलंडच्या गोलंदाजांनी भारतावर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. परंतु भारतीय संघाने यशस्वी पाठलाग केला.

### इशान-सूर्यांची तुफानी खेळी

**दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी १२२ धावांची वादळी भागीदारी झाली. इशानने ३२ चेंडूंत ७६ धावा ठोकल्या, तर सूर्यकुमारने ८२ धावांची तुफानी खेळी करत विजयावर शिक्कामोर्तब केले. शिवम दुबेने अखेरची औपचारिकता पूर्ण केली. इशान आणि सूर्यानि आपल्या खेळीत ८ षटकार आणि २० चौकार खेचले. झंझावाती इशान सामनावीर ठरला.**

# मुंबई विद्यापीठाची क्रॉस कंट्री उत्साहात

**। कल्याण । प्रतिनिधी ।**

विद्यार्थ्यांच्या शारीरिक क्षमता आणि संघभावनेला प्रोत्साहन देण्यासाठी मुंबई विद्यापीठाच्या वतीने आयोजित आंतरविभागीय क्रॉस कंट्री टूर्नामेंट गोवेली येथील जीवनदीप महाविद्यालयात सोमवारी (दि.१९) दिमाखात पार पडली. डॉ. मनोज रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेली ही स्पर्धा केवळ धावण्यापुरती मर्यादित नसून विद्यार्थ्यांच्या संयम, आत्मविश्वास आणि कठोर परिश्रमाची कसोटी पाहणारी ठरली. मुंबई विद्यापीठाच्या या स्पर्धेत विविध झोनमधील एकूण ५० खेळाडूंनी (२४ मुली व २६ मुले) आपला सहभाग नोंदवला होता. या चुरशीच्या स्पर्धेत मुलांच्या वैयक्तीक गटात सूरज झोरे याने प्रथम क्रमांक पटकावला, तर स्वराज जोशी याने द्वितीय आणि संदीप जोशी याने तृतीय क्रमांक मिळवला. मुलींच्या वैयक्तीक गटात आदिती पाटील ही प्रथम क्रमांकाची मानकरी ठरली, तर खुशबू बघेल आणि काजल प्रजापती यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक संपादन केला. सांघिक कामगिरीमध्ये मुलांच्या गटात मुंबई शहर संघाने प्रथम येत चॅम्पियनशिपवर आपले नाव कोरले, तर कोकण झोनला द्वितीय आणि ठाणे झोनला तृतीय क्रमांकावर समाधान मानावे लागले. मुलींच्या सांघिक गटात ठाणे झोनने वर्चस्व गाजवत प्रथम क्रमांक मिळवला, तर मुंबई उपनगर संघ द्वितीय आणि कोकण विभाग संघ तृतीय स्थानी राहिला. मुंबई विद्यापीठ क्रीडा क्षेत्रात सातत्याने प्रगती करत असून भविष्यात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळाडू घडवण्याचा विद्यापीठाचा संकल्प असल्याचे यावेळी मान्यवरांनी सांगितले. निवड समितीचे डॉ. यज्ञेश्वर बागराव यांनी स्पर्धेच्या आराखड्याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी शशांक उपाशेटे, रवींद्र कुमार सिंग आणि रामचंद्र कदम हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जीवनदीप महाविद्यालयाचे संचालक प्रशांत घोडविंदे, प्राचार्य अशोक वाघ, उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे आणि क्रीडाप्रमुख मोहनीश देशमुख यांचे सहकार्य लाभले. प्रा. सतीश लकडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

# रोहीतला मिळणार डी.लिट पदवी

**। पुणे । प्रतिनिधी ।**

माजी भारतीय कर्णधार आणि महान फलंदाज रोहित शर्माला त्याची क्रिकेट कारकिर्द आणि उत्कृष्ट नेतृत्व कौशल्यासाठी एक मोठा सन्मान मिळणार आहे. पुण्यातील अजिंक्य डी.वाय. पाटील विद्यापीठ (एडीवायपीयू) त्यांच्या १० व्या दीक्षांत समारंभात रोहित शर्माला मानद डॉक्टरेट (डी.लिट.) प्रदान करणार आहेत.

अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठाने बुधवारी अधिकृतपणे याची घोषणा केली. हा दीक्षांत समारंभ शनिवारी पुण्यात होणार आहे. हा एक भव्य आणि स्टार-स्टडेड कार्यक्रम असून यामध्ये रोहित शर्माकडे सर्वांचं लक्ष असणार आहे.

अजिंक्य डीवाय पाटील विद्यापीठाने याबाबत निवेदन जारी केलंय. यामध्ये म्हटले आहे की, क्रिकेट चाहते त्याला महिटमॅन म्हणून ओळखतात, परंतु हा दीक्षांत समारंभ रोहित शर्माच्या आयुष्यातील एक अनोखा आणि विशेष टप्पा असणार आहे. या समारंभाचे अध्यक्षपद अजिंक्य डीवाय पाटील विद्यापीठाचे अध्यक्ष



आणि कुलपती डॉ. अजिंक्य डीवाय पाटील यांच्याकडे असणार आहे. क्रिकेटमधील अतुलनीय योगदानासाठी आणि जागतिक स्तरावर प्रेरणादायी नेतृत्वासाठी रोहित शर्माला सन्मानित केले जाणार आहे.

३८ वर्षीय रोहित शर्माने टेस्ट क्रिकेट आणि टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. त्यामुळे सध्या तो वनडे क्रिकेटमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करतोय. त्याच्या नेतृत्वाखाली भारताने ऐतिहासिक कामगिरी केली आहे.

रोहितने आतापर्यंत भारतासाठी ५०८ सामने खेळले आहेत. या काळात त्याने ४२.३३ च्या सरासरीने आणि ८७.३४ च्या स्ट्राईक रेटने २०१०९ रन्स केलेत. रोहितचा आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील सर्वोत्तम स्कोर २६४ आहे.

## पीव्ही सिंधूने रचला इतिहास



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

भारतीय स्टार महिला बॅडमिंटनपटू पीव्ही सिंधूने इंडोनेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत प्री-क्वार्टर फायनल सामन्यात डॅनिश खेळाडू लाईन होजमार्क केज़रफेल्ड्टविरुद्ध सरळ सेटमध्ये विजय मिळवून क्वार्टर फायनलमध्ये आपले स्थान निश्चित केले आहे. इंडोनेशिया मास्टर्समध्ये पीव्ही सिंधूची सुरुवात कठीण होती, ज्यामध्ये तिला पहिला सामना जिंकण्यासाठी कठोर परिश्रम करावे लागले. प्री-क्वार्टर फायनल सामन्यात सिंधूचा विजय तिच्यासाठी खूपच ऐतिहासिक होता, ज्यामुळे तिने एकेरीत यापूर्वी कोणत्याही भारतीय महिला बॅडमिंटन खेळाडूला जे जमलं नाही ते करुन दाखवले आहे. इंडोनेशिया मास्टर्स सुपर ५०० स्पर्धेत, पीव्ही सिंधूने तिचा प्री-क्वार्टर फायनल सामना फक्त ४३ मिनिटांत लाइन होजमार्क केज़रफेल्ड्टविरुद्ध जिंकला, पहिला सेट २१-१९ असा जिंकला. त्यानंतर तिने दुसरा सेट २१-१८ असा जिंकून क्वार्टर फायनलमध्ये आपले स्थान निश्चित केले. या सामन्यातील पीव्ही सिंधूचा विजय हा तिचा कारकिर्दीतील ५०० वा एकेरीचा विजय ठरला आहे.

## बँक ऑफ इंडिया, महावितरणाची विजयी सलामी



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबई खो-खो संघटनेच्या मान्यतेने आणि विद्यार्थी क्रीडा केंद्र यांच्या आयोजनाखाली सुरु झालेल्या ६२ व्या जिल्हा अजिंक्यपद खो-खो स्पर्धेने परळच्या मैदानाला जणू रणभूमीचे स्वरूप दिले. खेळाडूंची अफाट चपळाई, शेवटच्या क्षणापर्यंत रंगलेले हाय-व्होल्टेज सामने आणि एका गुणावर ठरलेले निकाल यामुळे प्रेक्षक अक्षरशः खिळून राहिले. बँक ऑफ इंडिया, मुंबई पोलीस, नेव्हल डॉक, महावितरण, रचना नोटरी व विद्यार्थी क्रीडा केंद्र या संघांनी विजयी सलामी देत पुढील फेरीत दिमाखात प्रवेश केला.

अत्यंत चुरशीच्या लढतीत बँक ऑफ इंडियाने बृहन्मुंबई महानगरपालिका संघावर १५-१४ असा अवघ्या १ गुणाने आणि २ मिनिटे शिल्लक राखून विजय मिळवला. बँक ऑफ इंडियाकडून जनार्दन सावंत, राज सकपाळ, अर्पित तिवारी, रवींद्र झोरे यांनी निर्णायक कामगिरी केली. पराभूत महानगरपालिकेकडून पीयूष घोलम, आदित्य पाटील, करण गारोळे यांनी झुंजार खेळ केला.

मुंबई पोलीस संघाने डी. डी. ॲडव्हर्टायझिंग संघावर २०-१५ असा ५ गुणांनी विजय मिळवत आपली विजयी घोडदौड सुरू केली. पोलिसांकडून अक्षय मिरगळ, विशाल गायकवाड, सोहेल कलावंत, सोहेल शेख यांनी मैदान गाजवले. डी.डी. कडून हर्षित कोळी, आकाश मटकर, साहिल जमासुतकर यांची झुंज अपुरी ठरली.

महावितरण संघाने दत्तकृपा संघावर १२-११ असा १ गुणाने विजय मिळवत सामना ५:५० मि. शिल्लक असताना संपवला. महावितरणकडून अनिकेत चेंदवणकर, प्रतिक घाणेकर, प्रतिक वाईकर यांनी प्रभावी खेळ केला. दत्तकृपाकडून कार्तिक बेर्डे, यश दुर्गावले, तेजस सनगरे यांची लढत कमी पडली.

## दीया-ममता संघा बाहेर

**नवी दिल्ली:** ममता कॅपिटल्सला महिला प्रीमियर लीग २०२६ मध्ये दुहेरी धक्का बसला आहे. दीया यादव आणि ममता माडीवाला या दोन खेळाडू दुखापतींमुळे उर्वरित हंगामासाठी बाहेर पडल्या आहेत. फ्रँचायझीने शुक्रवारी जानेवारी रोजी संघातील बदलांची पुष्टी केली, त्यांच्या जागी प्रगती सिंग, एडला श्रीजना यांची निवड केली आहे.


# तारांकित खेळाडूंची विजयी घोडदौड

## अल्कराझ, सबालेंका, गॉफ, झ्वेरेव्ह तिसऱ्या फेरीत

**। मेलबर्न । वृत्तसंस्था ।**

स्पेनचा कार्लोस अल्कराझ, जर्मनीचा अलेक्झांडर झ्वेरेव्ह, बेलारूसची आर्यना सबालेंका आणि अमेरिकेची कोको गॉफ यांनी ऑस्ट्रेलियन ओपन ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धेची तिसरी फेरी गाठली. स्पर्धेच्या चौथ्या दिवशी तब्बल १ लाख ३ हजार ७२० जणांनी कोर्टवर उपस्थित राहून लढतींचा आनंद लुटला.

ऑस्ट्रेलियन ओपन स्पर्धेच्या ११४ व्या पर्वाला रविवारपासून प्रारंभ झाला. यंदा उद्घाटन सोहळ्यासाठी टेनिसच्या दिग्गजांना आमंत्रित करण्यात आले होते. वर्षातील पहिली ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धा म्हणून ऑस्ट्रेलियन ओपनला ओळखले जाते. गतवर्षी या स्पर्धेत इटलीचा यॅनिक सिनर व



अमेरिकेची मॅडीसन कीझ यांनी जेतेपद मिळवले होते. यंदा पुरुष एकेरीत अल्कराझ, तर महिलांमध्ये सबालेंका यांना अग्रमानांकन देण्यात आले आहे.

दरम्यान, पुरुष एकेरीत अल्कराझने यॅनिक हफमॅनला ७-६ (७-४), ६-३, ६-२ अशी तीन सेटमध्ये धूळ चारली. महिला एकेरीत अग्रमानांकित सबालेंकाने झोशुन बाईवर ६-३, ६-१ असे वर्चस्व गाजवले. सबालेंकाला सलग दुसरे ग्रँडस्लॅम जिंकण्याची संधी आहे. २०२५च्या अखेरीस तिने अमेरिकन ओपनचे जेतेपद मिळवले होते. अमेरिकेच्या तिसऱ्या मानांकित गॉफने ओल्गा डॅनिलोव्हिचला ६-२, ६-२ अशी धूळ चारली.

उत्स्फूर्त प्रतिसादाने आंतरराष्ट्रीय खेळाडू भारावले | प्रशासनाने उत्कृष्ट नियोजन

# पुणे सायकल स्पर्धेचा समारोप

**। पुणे । प्रतिनिधी ।**

'आम्ही पुणेरी...', 'वो सिकंदर ही दोस्तो कहलता है..' या गाण्यावर थिरकणारी तरुणाई, पुणेकरांकडून टाळ्यांचा गजर आणि जगभरातील थेट प्रक्षेपणाच्या साक्षीने पुणे ग्रँड टूर २०२६ चा जल्लोषात आणि दिमाखात समारोप झाला. पुणेकरांच्या उदंड आणि उत्स्फूर्त प्रतिसादाने आंतरराष्ट्रीय सायकलपटूही भारावून गेले. विजेता ल्यूक मडग्वेसह अन्य खेळाडूंनी नागरिकांना स्पर्धेचे मॅस्कॉट इंदू भेट देत आनंदोत्सव साजरा केला. हा अविस्मरणीय क्षण मोबाईलमध्ये साठवत पुढील वर्षी पुन्हा स्पर्धेसाठी येण्याचे आश्वासन सायकलपटूंनी पुणेकरांना



दिले.

शहराच्या मध्यवर्ती भागात झालेल्या अखेरच्या टप्प्यानंतर पारितोषिक वितरण सोहळा पाहण्यासाठी बालगंधर्व रंगमंदिरासमोर पुणेकरांनी गर्दी केली होती. त्यापूर्वी अंतिम टप्प्याला बालेवाडीतील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात उपमुख्यमंत्री अजित पवार आणि केंद्रीय क्रीडा व युवक कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी झेंडा दाखविल्यानंतर स्पर्धेला सुरुवात झाली. विजेत्यांना अभिनेता आमिर खान यांच्या हस्ते गौरविण्यात आले. आमिर खान यांनी मराठीमध्ये घो-षणा देऊन पुणेकरांबरोबर सेल्फी घेतला. तसेच, त्याने विजेत्यांचे कौतुक केले. या वेळी केंद्रीय राज्यमंत्री खडसे, मंत्री चंद्रकांत पाटील, खा. मेधा कुलकर्णी, आंतरराष्ट्रीय सायकलिंगच्या अमिना लानाया, आशियाई सायकलिंगचे अध्यक्ष दातो अमरजितसिंग गिल, मनिंदर पाल सिंग, पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार, विनयकुमार चौबे, महापालिका आयुक्त नवलकिशोर राम, आयुक्त योगेश म्हसे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, चेतन जोशी आदी उपस्थित होते.

प्रशासनाने उत्कृष्ट नियोजन करत दर्जेदार पायाभूत सुविधा निर्माण केल्या. याबाबत केंद्र सरकारसह देश-विदेशातील सायकलपटूंनी समाधान व्यक्त केले. स्पर्धेला शहर व ग्रामीण भागातील क्रीडारसिकांनी मोठ्या उत्साहात प्रतिसाद दिला. युवक-युवती, महिला, शेतकरी, विद्यार्थी आदी सर्व घटकांचा त्यात सहभाग दिसला. आगामी ऑलिंपिक स्पर्धांचे यजमानपद भारताला मिळावे, यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी प्रयत्नशील आहेत.

विकसित भारत-२०४७ या संकल्पनेच्या पूर्ततेत क्रीडा क्षेत्राचा मोठा वाटा असेल.

देश क्रीडा क्षेत्रात सातत्याने प्रगती करताना दिसत आहे. क्रीडा क्षेत्राला सॉफ्ट पॉवरच्या माध्यमातून पुढे नेण्याचा प्रयत्न सुरू आहे. शासन व प्रायोजकांच्या सहकार्याने स्पर्धे साठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्यात आल्या असून, त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)